# वाद-विवेचन-माला

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. 222

स. ना. निबंध

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
संग्रहालय/वाचनालय शाखा.
अनुक्रम नं. 220 | विभाग निबंध | क्रमांक 96
पुस्तकाचें नांव
लेखक
सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका. पुस्तकाची खराबी करूं नका.

REFBK-0005980



वाङ्मयविशारद

६२३।१५ सदाशिव, पुणें २.

वाद-विवेचन-माला

वाद-विवेचन-माला : :: पुष्प ६ वें

# मार्क्सचा भौतिकवाद

लेखक

पां. वा. गाडगीळ

वाङ्मयविशारद

म. ग्रं. सं. ठाणे.

REFBK-0005980

प्रथमावृत्ति

२६-८-१९४०

किंमत १२ आणे

प्रकाशक
यशवंत गोपाळ जोशी,
६२३/१५ सदाशिव, पुणें २.

संपादक
श्री. पां. वा. गाडगीळ,
वाङ्मयविशारद

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन. ]

मुद्रक
श्रीपाद रघुनाथ राजगुरु,
राजगुरु प्रेस, कॉमनवेल्थ कॉलनी,
४०५ नारायण, पुणें २.

# प्रस्तावना

भौतिकवाद हा तत्त्वज्ञानाचा विषय आहे. तत्त्वज्ञानाच्या विषयासंबंधानें वाचकांचे कांहीं निश्चित पूर्वग्रह असतात. तत्त्वज्ञानांत आत्मानात्म, ब्रह्म-माया, अणुपरमाणु, द्वैताद्वैत, क्षराक्षर वगैरे, सामान्य व्यवहारांत कधींहि न येणारे शब्द व विचार चर्चिलेले असले पाहिजेत अशी वाचकांची दृढ समजूत असते. हिंदूंच्या वेदान्त ग्रंथासंबंधानेंच ही समजूत आहे असें नव्हे; आधुनिक पाश्चात्य तत्त्वज्ञांच्या ग्रंथांत सुद्धां हिंदु तत्त्वज्ञाला आत्मानात्म, व्यक्ताव्यक्त वगैरे प्रकारचे विचार पाहण्याचीच संवय लागलेली आहे. टिळकांनीं इमॅन्युएल कँट व हर्बर्ट स्पेन्सर यांसंबंधानें गीतारहस्यांत व 'केसरी'तील स्पेन्सरच्या मृत्युलेखांत लिहिलेले विचार वाचले म्हणजे कँट व स्पेन्सर हे हिंदु वेदान्त्याप्रमाणें केवळ आत्मानात्म विचारांतच रमलेले असावे असें वाटूं लागतें. तत्त्वज्ञानासंबंधीं बोलतांना आत्मानात्म विचाराच्या अथवा तत्सदृश अशा गूढ विचारांच्या परिभाषेंत बोलण्याची ही खोड कम्युनिस्ट तत्त्वज्ञांतहि कमी नाहीं. ते बीजगणिताचीही भाषा वापरून आधींच गूढ वाटणाऱ्या तत्त्वज्ञानाला आणखी गूढ करून सोडतात. 'ए उणे बी', 'ए अधिक बी', 'दोन उणे बी चा एक अधिक बी होतो' असली बीज-गणिती भाषा वापरून मार्क्सच्या भौतिकवादांतील सिद्धान्त मांडण्याचा कम्युनिस्टांचा परिपाठ आहे.

ज्या वाचकांच्या विचारास असेंच वळण लागलें आहे त्यांना या पुस्तकांत आत्मानात्म, व्यक्ताव्यक्त, ए उणे बी, वगैरे विचारास व शब्दांस पहिल्यानें अडगळीप्रमाणें दूर सारून गुलामगिरी, सरंजामशाही, भांडवलशाही, धनोत्पादन-साधनें वगैरे 'व्रात्य' विचारांचेंच स्तोम माजविलेलें आहे, हें पाहून ही तत्त्वज्ञानाची चर्चाच नव्हे असें वाटेल. पण प्रस्तुत पुस्तक मार्क्सच्या भौतिकवादाची माहिती देत असून मार्क्स हा मानवी व्यवहाराचें विवेचन करण्यासाठींच मुख्यतः तत्त्वज्ञानाची चर्चा करीत आहे असें मला वाटतें. मार्क्स हा मूळचा हेगेलचा अनुयायी होता. राज्यसंस्था ही समाजांत

मध्यस्थ राहून समाजाचा समतोल सांभाळणारी संस्था आहे असें हेगेल म्हणे. पण 'जंगलांतील लाकडें चोरून तोडून आणणाऱ्या गोरगरीबांना बंदी करणारे कायदे जर्मन सरकारनें केले, तेव्हां गरिबांना चोरून नव्हे पण सरळ मार्गानें जळणाचें लांकूड मिळण्याची सोय सरकारनें मुळींच केली नाहीं. यामुळें सरकार हें मध्यस्थ असतें व समाजाचा समतोल सांभाळतें हा हेगेलचा सिद्धान्त चूक आहे' असें मत मार्क्सनें जंगल कायद्याच्या वादांत व्यक्त करून बहुसंख्य जनतेच्या हिताच्या दृष्टीनें समाजव्यवस्था कशी बदलली पाहिजे याचा विचार त्यानें सुरू केला. मार्क्सच्या तत्त्वविचाराची प्रेरणा अशी व्यावहारिक आहे. 'जग कसें आहे याचा आजवरच्या तत्त्वज्ञांनीं खुलासा केला, पण तें बदलावें कसें हें पाहणें, तें जग हवें तसें बदलणें हें तत्त्वज्ञांचें प्रमुख कार्य आहे' ही मार्क्सच्या जीवनांतील केन्द्रकल्पना होय. ही कल्पना मूर्त स्वरूपांत आणण्यासाठींच इतिहासाचा त्यानें अभ्यास केला व मुख्यतः मानवी इतिहासाच्या क्रांतीचें कार्य माणसाच्या डोळ्यांपुढें ठेवून मानवी इतिहासाचें गतितत्त्व त्यानें संशोधिलें व क्रांतिकारकांना क्रांतीच्या पुढील धोरणाची दिशा दाखवून दिली.

कँट, स्पेन्सर वगैरे तत्त्वज्ञही केवळ आत्मानात्म विचारांत गढलेले लेखक होते हा टिळकांच्या लिहिण्यावरून होणारा समज खरा नव्हे. कँट हा नीति-तत्त्वांचीं बीजें शुद्ध बुद्धींत आहेत कीं काय याची तपासणी करीत असून तद्वारां शुद्ध बुद्धीच्या प्रेरणेचें व्यावहारिक स्वरूप काय, प्रजासत्ताक राज्य कोणत्या परिस्थितींत चांगलें, सुस्थापित राज्यसंस्थेची थोरवी किती असते, क्रांतिकारक लोक चुक्या कोणत्या करतात, राज्यसंस्था सामाजिक करार-नाम्यानें निर्माण झाली या रूसोच्या म्हणण्याचा तात्पर्यार्थ काय, वगैरे प्रश्नांचें विवेचन करतो. हर्बर्ट स्पेन्सर हा व्यक्तिस्वातंत्र्य व राज्यसंस्थेकडून व्यक्तीवर येणारें नियंत्रण यांचा अन्वय कसा बसेल, विरोध कोठें येईल, व्यक्तींचे नैसर्गिक हक्क मान्य केल्यानेंच सुसंगत समाजरचना कशी शक्य आहे वगैरे मुद्द्यांची चर्चा करतो. आत्मानात्म विचार या तत्त्वज्ञांच्या लेखनांत आला आहे तो आनुषंगिक आहे, त्यांच्या समाजरचनाविषयक विशिष्ट सिद्धान्तास पाठबळ देण्यासाठीं म्हणून त्यांनीं मांडला आहे. पण त्यांचें मुख्य प्रतिपाद्य व विवेचनाचा विषय समाजरचना हाच आहे, आत्मानात्म विचार नव्हे.

आपल्याकडे शङ्करवेदान्त व तत्त्वज्ञानाचे इतर प्राचीन पंथ, इतकेंच काय पण टिळकांचें गीतारहस्यही समाजरचनेच्या कोणत्याही प्रकारासंबंधानें पूर्णपणें तटस्थ राहून आत्मानात्म विचार करतात. शंकराचार्य संन्यासमार्गी असल्यानें समाजरचनेविषयीं बेफिकीर होते अथवा चातुर्वर्ण्य हा समाजरचनेसंबंधींचा अखेरचा प्रमाण शब्द असें ते धरून चालत होते हें ठीक असेल. पण कर्मयोग प्रतिपादन करणारे टिळकही समाजरचनेचा कोणता प्रकार माणसानें पत्करला पाहिजे अथवा निर्माण केला पाहिजे याची मुळींच चर्चा न करतां फक्त निष्कामबुद्धीची, शुद्धबुद्धीची चर्चा करतात आणि व्यवहाराची चर्चा करण्यासाठीं आरंभिलेल्या प्रकरणांत 'जशास तसें', 'शठं प्रति शाठ्यं' असल्या अगदींच भोंगळ, परसापेक्ष आणि स्वतंत्र व्यवहाराचें अनुमान काढण्यास मुळींच साहाय्य न करणाऱ्या कल्पना मांडतात याचें आश्चर्य वाटतें.

याचें कारण, टिळकांनीं कर्मयोगप्रतिपादनांची अगदीं नवी दिशा आंखली तरी संन्यासपर वेदान्ताची पकड त्यांच्या मनावरची पूर्णपणें सुटली नव्हती हें होय. यामुळें कँट, ग्रीन, स्पेन्सर वगैरे तत्त्वज्ञांच्या लेखनांतील मुख्य समाजविषयक प्रतिपादन त्यांच्या नजरेंतून सुटून आत्मानात्म विचारासारखे आनुषंगिक व अवांतर विषयच त्यांच्या मनांत मुख्यतः भरले आहेत. बेंथॅम, मिल्, वगैरेंनीं मांडलेल्या आधिभौतिक दृष्टिकोणाची ऐतिहासिक पार्श्वभूमि काय होती याची तपासणी टिळकांनीं मुळींच केली नसून आधिभौतिक सुखवादी म्हणून यांना कांहींसें निवळ तुच्छतापूर्वक झिडकारलें आहे. मार्क्स हाही बेंथॅमची चेष्टा करतो; पण समाजविकासासंबंधींची बेंथॅमच्या विचाराची पार्श्वभूमि न सोडतां समाजविकासाचीं वेगळीं तत्त्वें मांडतो. सांगण्याचा मुद्दा हा कीं ज्यांना तत्त्वज्ञान म्हटलें कीं त्यांत फक्त आत्मानात्म विचारच आला पाहिजे असें वाटतें. कोणत्याही समाजविषयक विचाराशीं तत्त्वज्ञानाचा संबंध नसतो असें ज्या वाचकांचें मत असतें त्यांचें तें मत चुकीचें असून तें त्यांनीं प्रथम सोडून दिलें पाहिजे; तरच तत्त्वज्ञानासंबंधानें योग्य प्रकारें विचार करण्याची दिशा त्यांना लागेल. निदान मार्क्सचें तत्त्वज्ञान तरी एरवीं समजणें शक्य नाहीं. तत्त्वज्ञान आणि व्यवहार हीं परस्परांपासून पूर्ण अलग असूं शकतात हा विचारच मुळीं मार्क्सला मान्य नाहीं.

प्रस्तुत पुस्तकांतील विवेचन व माहिती मार्क्सच्या भौतिकवादाची नीटशी तोंडओळख करून देण्यापुरतीच आहे. त्यावर घेण्यांत येणाऱ्या असंख्य आक्षेपांचें खंडनमंडन यांत करण्यास अवकाश नाहीं. पुष्कळसे आक्षेप मुख्य विषयाबद्दलच्या गैरसमजापासून निर्माण झालेले असतात. या विषयाचें सामान्य स्वरूप कळून घेण्यापुरतें मार्गदर्शन नवीन वाचकांना या पुस्तकापासून लाभल्यास पुढें निरनिराळ्या आक्षेपांचें निरसन ज्यांचें त्यांना करतां येण्यासाठीं अधिक अभ्यासाची आवश्यकता आहेच.

पुस्तक लिहिण्याचें कामीं 'केसरी-मराठा ग्रंथालया'नें साधन-ग्रंथांची बहुमोल मदत केली आहे. ना. ग. गोरे, व. मा. जाखडे, शाम गाडगीळ वगैरे मित्रांनीं चर्चेचे कामीं बरेंच साहाय्य केलें आहे.

ता. १५ ऑगस्ट १९४०

पां. वा. गाडगीळ

# अनुक्रमणिका


१ जगन्मिथ्यावाद ... ... ... १
२ जडवाद्यांची विश्वकल्पना ... ... ... २१
३ भौतिकवाद व मानवसमाज ... ... ... २९
४ मार्क्सची विचारसरणी ... ... ... ३४
५ मार्क्स आणि हेगेल ... ... ... ८०
६ उपसंहार ... ... ... ९२
परिशिष्ट ... ... ... १०३


---

# कांहीं साधनग्रंथ


*From Hegel to Karl Marx* —Sydney Hook
*Towards Understanding of Karl Marx* —Sydney Hook
*Basic Principles of Scientific Socialism* —A. S. Sachs
*Science in An Irrational Society* —H. Levy
*Man's Worldly Goods* —Leo Huberman
*Communist Manifesto* [Ryazanoff-Edition]–Marx-Engels

*Dialectical Materialism* —V. Adoratsky
*Dialectical and Historical Materialism* —Stalin
*Philosophy and Political Economy* —J. Bonar
*Marxism and History* —J. S. Clarke


---

# वाद-विवेचन-माला

मालेची संकल्पित योजना

| | | |
|---|---|---|
| १ | सुलभ समाजवाद—पां. वा. गाडगीळ | ०—८—० |
| २ | फॅसीझम—पां. वा. गाडगीळ | ०—८—० |
| ३ | साम्राज्यशाही—कॉ. ना. ग. गोरे | ०—८—० |
| ४ | अराज्यवाद—पां. वा. गाडगीळ | ०—८—० |
| ५ | लोकशाही—आचार्य जावडेकर | १—०—० |
| ६ | मार्क्सचा भौतिकवाद—पां. वा. गाडगीळ | ०—१२—० |
| ७ | ईश्वरवाद—आचार्य दांडेकर | ०—१२—० |
| ८ | गांधीवाद—आचार्य भागवत | ०—१२—० |
| ९ | जडवाद—तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | ०—१२—० |
| १० | राष्ट्रवाद—रावसाहेब पटवर्धन | ०—१२—० |
| ११ | कम्यूनिझम—कॉ. के. एन्. फडके | ०—१२—० |
| १२ | हिंदुत्ववाद—त्रिकाळकर्ते शि. ल. करंदीकर | १—०—० |
| १३ | मार्क्सच्या कॅपिटलचा सारग्रंथ—पां. वा. गाडगीळ | १०—०—० |

मालेंत हीं तेरा पुस्तकें प्रसिद्ध व्हावयाचीं आहेत. पहिलीं सहा पुस्तकें प्रसिद्ध झालीं असून, राहिलेलीं सात एप्रिल १९४१ पर्यंत प्रसिद्ध होणार आहेत. मालेच्या या १८॥ रुपये किंमतीच्या तेरा पुस्तकांची आज आगाऊ वर्गणी फक्त १२ रुपये.

डिसेंबर १९४० पर्यंतच १२ रुपयेप्रमाणें वर्गणीदार घेतले जातील.

प्रकाशक : यशवंत गोपाळ जोशी

६२३/१५ सदाशिव, पुणें २.

# मार्क्सचा भौतिकवाद

## जगन्मिथ्यावाद : : १

### ‘टेबल आहे’ हा भ्रम

सृष्टिविषयक अथवा मनुष्य-समाजविषयक तत्त्वज्ञानाच्या चर्चेंत आपणाला गोचर होणारी सृष्टि खरी आहे कीं, तो सारा निव्वळ भ्रम आहे हा प्रश्न मनासमोर उभा राहतोच. अनेक तत्त्वज्ञांनीं गोचर सृष्टि हा निव्वळ भ्रम होय असें या प्रश्नाचें उत्तर दिलें आहे. मी ज्यावर लिहीत आहें तें टेबल अस्तित्वांत असल्याबद्दल खात्री-लायक पुरावा मुळींच नाहीं आणि म्हणून तें टेबल नाहींच असें गृहीत धरतां येतें असें एक तत्त्वज्ञ म्हणतो. याच न्यायानें सर्व गोचर म्हणजे इंद्रियांना अनुभवास येणारी प्रत्येक वस्तु— सगळीच्या सगळी सृष्टि— हा भ्रम असूं शकेल असें सांगूनच बर्ट्रंड रसेल यानें आपल्या एका ग्रंथास सुरुवात केली आहे. या मताच्या युक्ति-वादाचें सामान्य स्वरूप असें. ज्या टेबलावर मी लिहायला बसलों आहें तें एक, दोन, दहा, शंभर हजार कितीही माणसांनीं एक-समयावच्छेदेंकरून पाहिलें तरी प्रत्येकाला त्याचा आकार निर-निराळा असल्याचें दिसून येईल. पाहण्याच्या दिशेंत अगदीं थोडा थोडा फरक केला तरी याप्रमाणें टेबलाचा आकार वेगवेगळा दिसतो. टेबल जर एकच आहे तर त्यास हे अनेक आकार कोठून आले ?

भ्रम याचा अर्थ 'ज्ञानेंद्रियांच्या अनुभवांतील विसंगति' असा करतां येईल. उदाहरणार्थ, मृगजळ नांवाचा जो भ्रमप्रकार आहे त्यांत डोळ्यांस पाण्याचें स्वरूप दिसतें; पण स्पर्शास तें अनुभवाला येत नाहीं किंवा दूर अंतरावरून डोळ्याला पाण्याचें जें रूप दिसतें तें जवळ गेलें असतां दिसत नाहीं, म्हणून मृगजळ हा भ्रम होय. अंधारांत गुळगुळीत दोरी स्पर्शाला सापासारखी वाटते; पण दिवा लावला असतां दृष्टीला दोरीच्या ठिकाणीं सापाचें रूप दिसत नाहीं. म्हणून दोरीच्या ठिकाणीं साप भासणें हा स्पर्शेंद्रियाला झालेला भ्रम असें आपण मानतों. तसेंच हातानें चाचपून, उचलून, हालवून पाहिलें असतां जें टेबल एकच एक आहे असा अनुभव स्पर्शेंद्रियाला येतो तें टेबल डोळा या ज्ञानेंद्रियाला एक आहे असें न दिसतां तेथें जर टेबलाचे अनेक आकार दिसले, अनेक टेबलें दिसलीं तर 'टेबल आहे' असें जें आपणांस वाटतें तो भ्रम असावा अशी दृढ शंका येते.

## कदाचित् असेल कदाचित् नसेल

स्पर्शेंद्रियाला चाचपणें, हालवणें, उचलणें इत्यादि क्रियांमार्फत जी वस्तु एकच आहे असा अनुभव येतो ती निरनिराळ्या दिशांकडून नेत्रेंद्रियाला भिन्न भिन्न आकाराचीच दिसली तरी ती एकच वस्तु आहे असें मानून चाचपणें, हालवणें, उचलणें इत्यादि सर्व आवश्यक व्यवहार करतां येत असल्यानें येथें स्पर्शेंद्रियाला ही वस्तु—टेबल—एकच एक आहे हा येणारा अनुभवच खरा मानला पाहिजे असें वरील शंकेचें निरसन करतां येईल, पण स्पर्शेंद्रियाला तरी—किंबहुना कोणत्याही ज्ञानेंद्रियाला एक-एकट्याला अथवा सर्व ज्ञानेंद्रियांना मिळून येणारा अनुभव हा तरी खरा आहे असें मानण्यास अवांतर पुरावा काय आहे? कोणत्याही अवांतर

पुराव्यावांचून ज्ञानेंद्रियांना येणारे अनुभव स्वयंसिद्ध मानावे इतके ज्ञानेंद्रियांचे अनुभव विश्वसनीय असतात का? या ज्ञानेंद्रियांचे बाबतींत आपणांला नित्य अनुभव आहे तो असा कीं, प्रत्येकाला येणारा अनुभव हा भ्रम असूं शकतो. कानाला कांहीं विकार झाला असतां अथवा केव्हां केव्हां चांगल्या स्थितींतही खोटेच आवाज ऐकूं येतात. त्वचेला स्पर्शाचा खोटा भास येतो. नाकाला नसतेच वास येऊं लागतात. तोंडांत कांहींच नसता तोंड आपोआप कडू अथवा गोड होतें. डोळ्यांना नसत्याच वस्तु दिसतात अथवा विद्यमान वस्तूंचे रंग विपरीत दिसतात. अशा प्रकारें प्रत्येक ज्ञानेंद्रिय भ्रमशील आहे हें आपणास ठाऊक आहे. तेव्हां त्यांची साक्ष खरी कशी मानावी? दोन भ्रम अथवा पांच भ्रम मिळून एक सत्य असें गणित कसें मांडतां येईल? एका खोट्या साक्षीदारानें केलेलें विधान केवळ तसेंच्या तसें आणखी चार साक्षीदारांनीं ठासून सांगितलें म्हणून कोणत्याहि अवांतर पुराव्यावांचून ही पांच खोट्या साक्षीदारांची साक्ष खरी मानावी काय? सारांश, माझ्यासमोर असलेलें टेबल खरेंच आहे असा अनुभव माझ्या पांचही ज्ञानेंद्रियांनीं अगदीं आग्रहानें सांगितला तरी स्वतः भ्रमशील असणाऱ्या माझ्या पांचही ज्ञानेंद्रियांना टेबलाच्या अस्तित्वाचा आलेला अनुभव निःसंशय खराच आहे असें अवांतर पुराव्यावांचून म्हणतां येणार नाहीं आणि कोणताही अवांतर पुरावा तपासण्याचें साधन आपणाजवळ पंचज्ञानेंद्रियांवांचून अन्य कांहींच नसल्यानें 'टेबल असेलही, पण कदाचित् नसेलही' अशा संशयांत पडून राहणें हेंच सत्यानिष्ठेच्या दृष्टीनें युक्त ठरतें. अर्थात् माझ्यासमोरच्या टेबलाप्रमाणें माझें पेन, कागद, त्यावरील हा मजकूर फार काय हें लिहिण्याचें काम करणारें माझें शरीर व भोंवतालचें जवळचें,

दूरचें जग हें सर्वच 'कदाचित् अस्तित्वांत असेल, कदाचित् नसेल' असें मानावें लागतें.

## स्वप्नाचा पुरावा

आणखीही एका पुराव्यावरून सृष्टीच्या अस्तित्वाबद्दल मन शंकाकुल होतें. तो पुरावा स्वप्नाचा होय. स्वप्नसृष्टि ही स्वप्नस्थितींत असतां सत्यप्रायच भासते. फक्त जागृतावस्था प्राप्त झाली म्हणजे स्वप्नांतील अनुभव मिथ्या असल्याचें कळून येतें. पण जागृति आल्यावर स्वप्नांतला अनुभव जसा मिथ्या वाटतो तसाच जागृतींतला अनुभव स्वप्नांत मिथ्या वाटतो. स्वप्नांत माझ्या हातांत असलेला रुपया जागृतीच्या अवस्थेंत नाहींसा होतो तर उलट जागृतावस्थेंतील माझें वैभव स्वप्नांत कित्येक वेळीं नष्ट होऊन मी दारोद्र भीक मागत असतों. स्वप्न हें जागृतावस्थेंत जसें मिथ्या, तशीच जागृतावस्थाही स्वप्नांत मिथ्याच असते. तेव्हां या दोन अवस्थांतील अमुक एक अवस्था निश्चितपणें सत्य आहे असें म्हणतां येत नसून दोन्हीही अवस्था मिथ्या असण्याचा खास संभव आहे असें वाटूं लागतें.

## आतां विधिनिषेध कुठला ?

एकंदर सर्व गोचर सृष्टीसंबंधानें ती मिथ्या असण्याचा संभव जर उत्पन्न झाला तर त्यापासून व्यवहाराविषयीं एक महत्त्वाचें अनुमान निघतें तें असें कीं, त्यामुळें व्यवहारांत विधिनिषेध राहत नाहीं. कौरवांनीं पांडवांचें राज्य अन्यायानें हिरावून घेतलें अथवा पोलंडवर जर्मनीनें अन्यायानें हल्ला केला, अ-नें ब-च्या स्त्रीस पळवून नेलें अथवा अ-ची स्त्री ब-बरोबर पळून गेली तर या सर्व अन्यायांचा प्रतिकार करण्याचें कारण राहतच नाहीं. कारण जग सारेंच जर भ्रम तर अन्याय-न्याय कुठून आला ? कौरव, पांडव, जर्मनी,

पोलंड, अ, ब, अ-ची स्त्री हे सर्वच जर भ्रम असूं शकतील तर, स्वप्नांत आपला अन्याय करणारावर जसा मी जागृतावस्थेंत सूड घेत नाहीं अथवा घेऊं शकत नाहीं त्याप्रमाणें या भ्रमस्वरूप जागृतावस्थेंतील अन्यायांचेंही निवारण करण्याचें मला कारण नाहीं व तें मला करतां येणार नाहीं.

हिंदु वेदान्तांत जो संन्यासमार्ग आहे त्याचें या जगद्भ्रमवादानें फार उत्तम समर्थन होऊं शकतें. लहान मुलें भातुकलीचा खेळ मांडून त्यांत पूर्ण राग-लोभानें युक्त अशा प्रकारें रममाण होतात. स्वप्नांत अनुभवलेल्या सुखदु:खानें, भीतीनें त्यांच्या चित्तवृत्ति जागृतावस्थेंतही विचलित होतात. ठेंच लागून एकादें मूल पडलें तर तें ठेंच लागलेल्या दगडावर रागावून त्याला काठीनें झोडपून काढतें; पण मोठ्या माणसांना हे सर्व भ्रम आहेत अशी खात्री असल्यानें मुलांना या सर्व बाबतींत वाटणारे विधिनिषेध मोठ्या माणसांना तसेंच वाटूं शकत नाहींत. त्याचप्रमाणें जग सत्य आहे असें मानणाऱ्यांना विधि-निषेध, सुखदु:ख, आपपर यांच्या बाधा जशा होऊं शकतात तशा त्या जग मिथ्या आहे असें मानणाऱ्यांना होऊं शकणार नाहींत हें म्हणणें कबूल करावें लागतें. ज्याला जग मिथ्या वाटलें तो स्वत:साठीं कांहीं करणारही नाहीं; इतकेंच नव्हे तर तूं 'अमुक कर' आणि 'अमुक करूं नको' असें त्याला सांगण्याचा इतरांना अधिकारही राहणार नाहीं अथवा त्या सांगण्याचा कांहीं उपयोगही होणार नाहीं. जगन्मिथ्या-पंथी माणसाला घरासमोर केर टाकूं नको म्हणून सांगितलें तर घर, केर आणि केर टाकूं नको म्हणणारा मी या सर्वांकडे तो तुच्छतेनें अथवा विनोदानें पाहील आणि सिनेमाच्या पडद्यावरील माणसांच्या आविर्भावांना अथवा शब्दांना प्रेक्षक फक्त करमणुकीचा विषय मानतात तसेंच मानील. असा माणूस विधि-

निषेधांच्या पलीकडे गेला आहे असें मानलेंच पाहिजे. 'निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः ।'

## ' व्याघ्रोऽपि मिथ्या पलायनमपि मिथ्या '

पण जग सत्य आहे असें मानणाऱ्या जगाला या जगन्मिथ्यावाद्यांची निवळ उपेक्षा करतां येईल हें मात्र खरें नव्हे. जगन्मिथ्यावादी माणसाला घरासमोर केर टाकल्याचें अथवा घरास आग लागल्याचें अथवा राष्ट्रावर परचक्र आल्याचें कांहींही वाटणार नाहीं. कारण या गोष्टी मुळांतच मिथ्या असण्याचा संभव आहे असें त्यास वाटत असल्यानें तो तटस्थ राहूं इच्छील. तरी पण जग सत्य मानणाऱ्या माणसांना वरील सर्व संकटप्रसंगीं जगन्मिथ्यावाद्यांचें नियंत्रण करावें लागेल, त्यांवर समाजोपयोगी कार्याची सक्ती करावी लागेल, त्यांस तुरुंगांत घालावें लागेल अथवा परचक्रासारख्या प्रसंगीं तटस्थ राहण्याचा गुन्हा करणारा म्हणून त्यास ठारही मारावें लागेल. अर्थात् जगन्मिथ्यावादी माणसाची जग मिथ्या असण्यावरील श्रद्धा दृढ असेल तर त्याला या सक्तीचें व शासनाचें भय वाटणार नाहीं अथवा त्याचें दुःखही होणार नाहीं. जे ढोंगी असतील त्यांची परिस्थिति मात्र कठीण असते. जग मिथ्या मानणाऱ्या एका साधुमहाराजांच्या अंगावर एकदां एक वाघ धावून आला असतां ते वाघास भिऊन पळून गेले. नंतर शिष्यानें त्यांना विचारलें, 'गुरुजी, वाघ जर मिथ्या तर आपण पळून कां गेलां ?' गुरुजी म्हणाले, 'बेट्या, अरे वाघ जसा मिथ्या तसेंच माझें पलायनही मिथ्याच आहे असें मान म्हणजे झालें ! ' गुरुजींच्या या उत्तरांतली लबाडी कोणासही सहज कळूं शकते. येथें फक्त शाब्दिक वादच उरतो. वाघ खोटा, भीति खोटी आणि पलायनही खोटें म्हटलें तरी पुढें गुरुजींना वाघापासून आपला बचाव करण्यासाठीं बंदूक (अर्थात्

खोटीच) वापरावी लागते. त्यासाठीं समाजांत कोणी तरी बंदुका करण्याचा 'मिथ्या' कारखाना काढावा लागतो. त्याचें नियंत्रण करण्यासाठीं मिथ्या राज्यसंस्थेची जरूरी उत्पन्न होते. आणि राज्य-संस्थेमार्फत 'मिथ्या' विधिनिषेधांची बजावणी होऊन साधुमहाराजां-वरही ते लादावे लागतात. आणि अखेरीस 'मिथ्या' हा शब्दच मिथ्या ठरतो.

खरोखर एकांतिक अर्थानें जग मिथ्या मानूं लागलेला माणूस फार काळ जिवंत राहणेंही अशक्य आहे. कारण पोटांत भुकेची तिडीक उठली आणि ही तिडीक, ती तिडीक उठणारें पोट व स्वत: त्याचें सर्व शरीर सगळेंच खोटें असलें पाहिजे असें जर एकदां त्याच्या मनानें घेतलें तर तो त्या क्षणापासून जागचा हालणारही नाहीं. त्याचे देहधर्म आपोआप पडल्याजागीं जसे व्हायचे तसे होत राहतील आणि अन्नपाण्याविणें त्याचा देह कांहीं दिवसांनीं जेथल्या तेथें मरून पडेल. इतक्या विदेही माणसाला जगांतील कोणतेच विधि-निषेध बंधन घालूं शकणार नाहींत हें अगदींच खरें आहे; पण अशा माणसामुळें जग सत्य मानणाऱ्यांना कधीं फारशी अडचण होण्याचेंही कारण नाहीं. 'वाघहि खोटा व पलायनही खोटें' असें मानणाऱ्या ढोंगी अथवा आत्मवंचक माणसांना मात्र शासनाचा व कर्तव्याचा लगाम घालणें समाजास आवश्यक होऊन बसतें.

गोचर सृष्टि मिथ्या नसून सत्य आहे असें मानणें हें सर्वच भौतिकवाद्यांच्या व मार्क्सच्याही भौतिकवादाच्या दृष्टीनें अत्यावश्यक आहे. मागें म्हटल्याप्रमाणें भ्रमशील अशा पंचेंद्रियांना प्रतीत होणारी सृष्टि खरीखुरी आहेच असें कोणीही निश्चयानें सांगूं शकणार नाहीं. तथापि सृष्टि सत्य कीं मिथ्या या संशयांत न राहतां ती सत्य आहे असें धरून चालणें हीच कोणत्याही भौतिकवादाची मुख्य भूमिका

आहे. पंचेंद्रियें सगळीं भ्रमशील असतील; पण ज्या कोणत्याही वस्तूसंबंधीं अथवा घटनेसंबंधीं त्यांचे अनुभव परस्परविसंवादी नसून संवादी असतील ती वस्तु अथवा घटना सत्य आहे असें धरून चालणें हेंच व्यवहारोपयोगी आहे. डोळ्याला अग्नीसारखी दिसणारी वस्तु स्पर्शाला दाहक वाटली तर ती खात्रीनें अग्नि आहे असें मानणें हेंच श्रेयस्कर. दृष्टि व स्पर्श या दोघांना अग्नीचे परस्परसंवादी अनुभव आले असतांही ते खोटे मानून अग्नि जर कोणी खिशांत घालील तर त्यास भाजून मरावें लागेल. सारांश, ज्ञानेंद्रियांच्या परस्परसंवादी अनुभवावरून जें सत्य 'भासतें' तें सत्य आहे असें मानणें हें कोणत्याही भौतिकवादाचें प्रमुख तत्त्व आहे.

## सापेक्ष मिथ्या

ज्ञानेंद्रियांना प्रतीत होणारी सृष्टि सर्व मिथ्या नव्हे, पण ती सापेक्षतेनें मिथ्या मानणाऱ्यांचा एक पंथ असतो. हिंदु वेदान्ताचा तर हा फार महत्त्वाचा सिद्धान्त आहे. यांतील 'मिथ्या' शब्दाचा अर्थ 'सापेक्ष मिथ्या' व 'सत्य' याचा अर्थ सापेक्ष सत्य असा असतो. 'अनित्य' व 'नित्य' हे अनुक्रमें याच दोन शब्दांचे पर्याय आहेत. सोन्याचा दागिना करतात. यांत सोनें हें दागिन्यापेक्षां अधिक सत्य म्हणजे सापेक्ष सत्य अथवा सापेक्ष नित्य म्हणावयाचें आणि दागिना हा सोन्याच्यापेक्षां अधिक मिथ्या म्हणजे सापेक्ष मिथ्या अथवा सापेक्ष अनित्य मानावयाचा. सोनें ही अखेरीस एक प्रकारची मातीच आहे. पिवळा रंग, चकचकीतपणा वगैरे तिचे विशिष्ट गुण हे फक्त नामरूपें म्हणजे सापेक्ष मिथ्या अथवा अनित्य असून मृत्तिका ही सापेक्ष सत्य अथवा सापेक्ष नित्य होय अशी ही विचारसरणी आहे. ही विचारसरणी अशीच कडेपर्यंत चालवून वेदान्त्यांनीं सर्वच गोचर विश्व हें नामरूपात्मक मिथ्या, अनित्य, नश्वर आहे असें म्हटलें

असून या नामरूपांच्या बुडाशीं असलेली अगोचर वस्तु जी परब्रह्म तीच काय ती पूर्ण सत्य, नित्य, अविनाशी आहे असें वेदान्त्यांचें म्हणणें आहे.

## वेदान्ताचा निष्कर्ष

वर जें पूर्ण मिथ्यावादी मत सांगितलें त्यांत ज्ञानेंद्रियांना येणारे सर्व अनुभव पूर्ण मिथ्या आहेत असेंच मानलें जातें. सापेक्ष मिथ्या-वादी म्हणजे वेदान्ती यांच्या मतें ज्ञानेंद्रियांना वस्तूंच्या नामरूपां-चेंच आकलन होतें. या इंद्रियांना फक्त वस्तूंचे गुणधर्मच दिसतात. ते खरेही आहेत; पण इंद्रियांना वस्तूचे फक्त गुणच दिसतात, अनुभवास येतात. खुद्द वस्तूचें आकलन करून घेण्याचा गुण वेदा-न्त्यांच्या मतें ज्ञानेंद्रियांत नाहीं. उदाहरणार्थ, साखर ही वस्तु घेतली तर तिचा गोडपणा जिभेला कळतो, पांढरेपणा डोळ्यांना दिसतो, भुसभुशीतपणा अथवा मऊपणा हाताला म्हणजे स्पर्शाला कळतो, तिच्यावर हात आपटला तर कांहीं तरी आवाज ऐकूं येतो, तिला कांहीं तरी वास येऊं शकतो; पण आपणांस साखर दाखवा म्हटलें तर आपण फक्त तिचे हे गुण तेवढेच दाखवितों. या गुणसमुच्चया-लाच आपण साखर म्हणतों. ते ज्यावर अधिष्ठित झाले आहेत अशी वस्तु कोणती तें आपणाला कधींच कळत नाहीं. गोडी, पांढरेपणा वगैरे ज्ञानेंद्रियांना गोचर होणारा गुण-समुच्चय हें साखरेचें ‘रूप’ व या गुण-समुच्चयाचेंच ‘नाम’ साखर. हें सर्व फक्त ‘नामरूप’ होय. तें विनाशी म्हणून अनित्य म्हणजे सापेक्ष मिथ्या असून त्याच्या बुडाशीं—या गुण-समुच्चयाचा आधार अशी—असणारी वस्तु अगोचर असते. ती फक्त साखरेच्या अथवा गुळाच्याच बुडाशीं नसून विषाच्या अथवा दारूच्या बुडाशीं तीच आहे. निर्जीवाच्या व सजीवाच्या बुडाशीं तीच आहे. सज्जनाचा व

दुर्जनाचाही तीच आधार आहे. 'येशुख्रिस्त' या 'नामरूपा'च्या बुडाशीं जी वस्तु होती तीच 'हिटलर' या 'नामरूपा'च्या बुडाशीं आहे. आणि भावी काळांतल्या कोणाही सज्जन-दुर्जनाच्या नामरूपाचा आधारही हीच वस्तु असेल; किंबहुना 'होती', 'आहे', 'असेल' असें कालवाचक वर्णन त्या वस्तूचें करतांच येणार नाहीं. ती त्रिकालाबाधित, अनादि-अनंत आणि सर्वत्र सारखीच भरलेली आहे. तिला काल, स्थल, दिशा, गुण, आकार कांहींही नाहीं. अशी ती कल्पनातीत व इन्द्रियातीत आहे, तीच परब्रह्म होय, असें वेदान्तशास्त्र सांगतें. एकादें सुंदर लोकरीचें वस्त्र समोर दिसलें तर तें नामरूप म्हणून सापेक्ष मिथ्या मानून त्याचें सापेक्ष सत्य जें सूत तें, वस्त्र उस्कटून, काढावें, नंतर सूत हें सापेक्ष मिथ्या मानून व तें पिंजून त्याचें सापेक्ष सत्य जी लोकर ती काढावी आणि मग लोकर, माती, राखुंडी हीं सर्वच अनित्य नामरूपें आहेत, त्या सर्वांच्या बुडाशीं असलेलें परब्रह्म हें एकच एक व अविनाशी आहे हें लक्षांत घेऊन ती पिंजलेली लोकर राखवड्यांत मिसळून टाकावी; हें सर्व करीत असतां अनित्याकडून नित्याकडे, असत्याकडून सत्याकडे गेल्याचा आनंद ज्याला होईल त्याच्या मनावर वेदान्त खरोखर बिंबला असें म्हणावें ! सुग्रास अन्न व चिखल हीं दोन्ही नामरूपेंच असून त्यांच्या बुडाशीं असलेलें जें अविनाशी परब्रह्म तेंच सत्य आहे असें मानणारा माणूस अन्नांत चिखल कालवून खाईल तेव्हांच तो खरा वेदान्ती म्हणावा असें तर्कशुद्ध अनुमान या मतापासून निघतें.

## वेदान्ताचा हेतु

सापेक्ष मिथ्या व सापेक्ष सत्य हें सृष्टीचें वर्गीकरण करण्यांत वेदान्तशास्त्राचा 'हेतु' सापेक्ष मिथ्या जग हें सापेक्ष तुच्छ लेखून सापेक्ष सत्य हें सापेक्ष श्रेष्ठ आहे व संपूर्ण सत्य आणि नित्य पण

अगोचर, निर्गुण, निराकार असें जें परब्रह्म तेंच तेवढें सर्वश्रेष्ठ आहे' असें प्रतिपादणें हा असतो. 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' हा वेदान्तशास्त्रांतला प्रमुख सिद्धान्त असून ब्रह्मप्राप्ति हें व्यक्तिमात्राचें ध्येय आहे असें वेदान्ताचें सांगणें आहे. हें ध्येय प्राप्त होण्यास ऐहिक सुखें हीं अपायकारक आहेत—'अमृतत्वस्यतु नाऽशास्ति वित्तेन'—म्हणून ज्या क्षणीं ऐहिक सुखाबद्दल वैराग्य उत्पन्न होईल त्या क्षणीं ऐहिक जगापासून दूर व्हावें, संन्यास घ्यावा—'यदहरेव विरजेत् तदहरेव प्रव्रजेत्'—असा वेदान्तशास्त्राचा मुमुक्षूला सल्ला आहे. यज्ञयाग करून देवांना संतुष्ट करावें व सुखोपभोग मिळवावे असें मानणारा प्राचीन आर्यांत जो एक पंथ होता त्याचा वेदान्तानें धिक्कार केला असून ऐहिक व भौतिक सुखोपभोगांच्या मागें न लागतां आध्यात्मिक सुखप्राप्ति, ब्रह्मसाक्षात्कार करून घेणें हेंच मनुष्यमात्राचें श्रेष्ठ कर्तव्य आहे असें वेदान्तशास्त्र सांगतें. ही आध्यात्मिक सुखाची अवस्था असते कशी तें वेदान्ताला शब्दांनीं सांगतां येत नाहीं. तें फक्त अनुभवगम्य आहे, पण त्याची पूर्वतयारी करण्याचे कामीं ऐहिक अथवा भौतिक उत्कर्षाची मुळींच गरज नाहीं. शरीरावांचून जीवात्म्याला परमात्मस्वरूप प्राप्त करून घेतां येत नाहीं, एवढ्यासाठीं केवळ शारीरकर्म करावें, शरीर जगविण्यापुरता योगक्षेमकारक व्यवहार करावा, त्यापलीकडे तनमनानें अनित्य जगाची उपेक्षा करून नित्य ब्रह्माच्या प्राप्तींत रमावें असें वेदान्ताचें म्हणणें आहे. भौतिक सुखप्राप्तीचा खटाटोप हा व्यर्थ आहे, सुख-दुःखें हीं नश्वर आहेत, सुख वाटणें अथवा दुःख वाटणें हा मनाचा धर्म आहे; मनोनिग्रहपूर्वक पूर्ण अनासक्ति धारण केली म्हणजे दुःख हें दुःख वाटणारच नाहीं, सर्वच सुखमय होईल, नित्य सुख हें भौतिक-स्थिति-निरपेक्ष व ब्रह्मसाक्षात्कारानें प्राप्त होणारें आहे असें

वेदान्त म्हणतो. ‘ सगळ्या मिथिलेला आग लागली तरी माझें कांहीं जळत नाहीं’ असें वेदान्तशास्त्राचा आदर्श असा जो विदेही जनक राजा तो म्हणतो. त्याच्या एका पायास एक दासी एकदां लोणी लावीत होती व दुसरा पाय सरकत सरकत धगधगत्या शेगडींत जाऊन पडला तरी त्याला त्या दोहोंचीही पर्वा नव्हती अशी एक दंतकथा सांगतात. ऐहिक जग ही एक धर्मशाळा आहे, येथील जिणें क्षणभंगुर आहे, ऐहिक जगांत जन्माला येणें हेंच दुःख-मूळ असून पुन्हा जन्मास येऊं नये यासाठीं जन्मभर खटपट करायची व त्याचा उपाय म्हणून ब्रह्मसाक्षात्कार घडवून आणावयाचा अशी वेदान्ताची शिकवण आहे.

## टिळकांचा व्यर्थ खटाटोप

ही एकंदर शिकवण खरी कीं खोटी, इष्ट कीं अनिष्ट हें कोण सांगूं शकणार ? जें दुःख भासतें तें मनोदौर्बल्यामुळें तसें वाटतें; पण मनो-निग्रह योग्य प्रकारें करतां आल्यास दुःख हेंही सुख होऊं शकेल; मग पाय शेगडींत पडला तरी त्याची पर्वा वाटणार नाहीं, ऐहिक भोगाच्या मागें न लागतां ब्रह्मसाक्षात्कारच साध्य करीत राहावें, शरीरसंरक्षणा-पुरताच ऐहिक व्यवहार करावा वगैरे विचारसरणी केवळ संन्यास-धर्मासच पोषक आहे एवढें मात्र निश्चयानें सांगतां येतें. दुःख हें केवळ मानीव आहे, गोचर जगापेक्षां अगोचर ब्रह्म श्रेष्ठ, त्याचा साक्षा-त्कार करून घेणें हेंच मानवाचें परम प्राप्तव्य इत्यादि वेदान्त शास्त्राचें प्रवचन मान्य करूनही लोकमान्य टिळकांनीं गीतारहस्यांत त्यापासून कर्मयोग सिद्ध करण्याचा जो विद्वत्तापूर्ण खटाटोप केला आहे तो सर्व व्यर्थ गेला आहे. टिळक हे गीतेंत कर्मयोग प्रतिपाद्य आहे एवढेंच सांगत नसून त्यांना स्वतःलाही कर्मयोग श्रेष्ठ वाटतो आहे. त्या-बद्दल कोणाचीही तक्रार असण्याचें कारणही नाहीं. पण ‘ब्रह्म नित्य

असून जग अनित्य आहे, ऐहिक सुखदुःखें हीं मानीव असून मनोनिग्रहानें दुःखनिरास करतां येतो, ब्रह्मप्राप्ति हेंच मानवी जीवनाचें परमसाध्य, ऐहिक व्यवहार फक्त जीवात्म्याला परमात्मप्राप्तीसाठीं शरीर उपयोगी पडावें एवढ्याचपुरता करायचा' इत्यादि ही वेदान्ताची विचारसरणी टिळकांनीं मान्य केली असल्यानें तीपासून कर्मयोगाचें अनुमान टिळकांनीं काढलें आहे तें अगदीं विसंगत वाटतें. कारण संन्यासमार्गांतही कर्म मुळींच न करावें असें सांगितलें नसून वेदान्ताचें जें ध्येय तें प्राप्त करून घेण्यास अवश्य व अपरिहार्य तेवढें कर्म करणें सुटत नाहींच, तें केलेंच पाहिजे असें संन्यासमार्गी सत्पुरुषही प्रतिपादितात. ज्याला ब्रह्मप्राप्तीची गरज पटली नाहीं तो ऐहिक व्यवहार सुखलालसेनें करीत राहिला तरी त्यानें विशिष्ट आचार व व्यवहारधर्म पाळल्यास तशा त्या वर्तनास संन्यासमार्गाचीही हरकत नाहीं. पण संन्यासमार्गाच्या दृष्टीनें हा व्यवहार गौण आहे. प्रत्येक माणसास ब्रह्मप्राप्तीची तीव्र तृषा लागली पाहिजे व केव्हां ना केव्हां, पण शक्य तितक्या लवकर, तो परमात्मप्राप्तीच्या मार्गाला लागला पाहिजे हें संन्यासमार्गाचें सांगणें आहे. टिळकांनीं वेदान्ताची ही शिकवण मान्य केली आहे. अर्थात् या मनोवृत्तीस जग ही धर्मशाळा आहे हाच युक्तिवाद सयुक्तिक वाटणार आणि 'धृति'पूर्वक व 'उत्साह'पूर्वक— परोपकारासाठीं का होईना—ऐहिक कर्म करीत राहावें हा टिळकांचा कर्मयोग विसंगतच वाटणार. परोपकारार्थ कर्म करावें म्हटलें तरी, पर म्हणजे जे दुसरे त्यांना ऐहिक जीवनापासून परावृत्त करणें हाच त्यांच्यावर मोठा उपकार असल्यानें वेदान्तशास्त्र व संन्यासमार्ग यांची शिकवण समाजास देणें व शारीरव्यवहार आत्मकल्याणास जरूर इतक्यापुरते कसेबसे चालविण्यास इतरांना साहाय्य करणें यासच परोपकार म्हणावें लागेल.

बाकी एकंदरीनें ऐहिक जीवनाबद्दल उपेक्षाबुद्धि धारण करणें हेंच वेदान्तशास्त्रास सुसंगत मानतां येईल. उदाहरण देऊन बोलायचें तर थंडी निवारण होऊन मोठें सुख वाटावें इतकें भरपूर वस्त्र करण्यासाठीं गिरण्या काढण्याऐवजीं शरीरास थंडीपासून फक्त इजा न होईल इतकें थोडेंसें वस्त्र हातमागानें विणतां आल्यास त्यांत समाधान मानावें, त्याहून अधिक थंडी असेल ती सहन करावी व स्वतःचें आणि इतरांचें चित्त गिरण्या काढण्याकडे न वेधतां आध्यात्मिक सुखाकडे लावावें हेंच स्वहित व हाच परोपकार होय असें वेदान्ताच्या विचारसरणीशीं सुसंगतपणें बोलावें लागतें. संन्यासमार्गास इतका व्यवहार मान्य आहेच. वेदान्ताची मूळ भूमिका मान्य करणाऱ्या टिळकांना याहून अधिक कर्म करायला सांगणारा कर्मयोग वेदान्ताशीं सुसंगतपणें प्रतिपादतां येणार नाहीं. संन्यासपर असें वेदान्ततत्त्व मान्य करून त्यापासून कर्मयोगाचें विसंगत अनुमान काढण्याची ओढाताण टिळकांच्याप्रमाणें श्रीकृष्णानेंही केली आहे. श्रीकृष्णास व टिळकांना कर्मयोग प्रतिपादायचा होता तर त्यांनीं स्वतंत्रपणें तो प्रतिपादायला हवा होता. त्याला वेदान्ताचा आधार घेतां येणार नाहीं.

## मार्क्सवाद हा कर्मयोगच

अर्थात् टिळकांनीं आणि श्रीकृष्णानें प्रतिपादिलेला कर्मयोग हाच मार्क्सच्या भौतिकवादाचा भावार्थ आहे असें म्हटलें तर तें फारसें चूक नाहीं. "तत्त्ववेत्त्यांनीं आजवर जग कस-कसें आहे तें सांगितलें, पण खरें कार्य जग कसें आहे तें समजून घेणें एवढेंच नसून त्यांत बदल घडवून आणणें हें होय" अशा आशयाचें मार्क्सचें एक प्रसिद्ध वचन आहे. या वचनांत व टिळकांच्या कर्मयोगांत मनुष्यकर्तृत्वाला, मनुष्ययत्नाला महत्त्व दिलें आहे. माणसापुढें जी गोचर सृष्टि पसरलेली आहे ती आहे तशीच्या-

तशीच माणसाच्या उपयोगी पडली असती, तयार कपड्यांच्या दुकानासारखी अथवा तयार अन्नाच्या खानावळीसारखी ही सृष्टि असती, तर कुणाला कांहींच करावें लागलें नसतें. मग टिळकांना कर्मयोगाचा आग्रह धरावा लागला नसता आणि मार्क्सलाही जगांत बदल घडवून आणण्याचें कार्य माणसासमोर ठेवावें लागलें नसतें. पण जग हें हवें तसें नसून तें बनवून घेण्याचें कर्मच टिळकांनीं आणि मार्क्सनें समाजापुढें ठेविलें आहे. हें कर्म करणाऱ्याच्या अंगीं अनासक्ति वगैरे जे गुण टिळकांना अवश्य वाटतात ते मार्क्सच्या शिकवणींतही अवश्य आहेत. (याची चर्चा पुढें करावयाची आहे.)

## भौतिकवाद्यांचा ईश्वरास विरोध

पण टिळकांचा कर्मयोग व मार्क्सचा भौतिकवाद यांत जो मूलभूत फरक आहे तो, वेदान्ताचा 'ब्रह्मप्राप्ति हेंच माणसाचें ध्येय मानून नश्वर सृष्टि ही गौण असल्यानें उपेक्षणीय लेखावी' हा जो सिद्धान्त टिळकांनीं मान्य केला तो मार्क्स मान्य करीत नाहीं, यांत आहे. हिंदूंच्या अध्यात्मवादाची म्हणजे वेदान्ताची मार्क्सला ओळखही नसावी. पण पाश्चिमात्य देशांत ख्रिस्ती धर्माचें म्हणून जें तत्त्वज्ञान रूढ आहे त्यांत वेदान्ताप्रमाणेंच भौतिक सृष्टि उपेक्षणीय मानून ईश्वरपरायणतेचें वैभव आणि श्रेष्ठत्व वर्णिलें आहे. पाश्चिमात्य देशांतील सर्वच भौतिकवाद्यांनीं या ईश्वरपरायणतेस विरोध करून भौतिक सृष्टीचें महत्त्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे.

ब्रह्मप्राप्तीसाठीं झटावें ही वेदान्ताची शिकवण अथवा ईश्वरपरायण असावें ही ख्रिस्ताची शिकवण या दोन्हीही 'आध्यात्मिक' शिकवणी भौतिकवाद्यांना अमान्य असून ईश्वर म्हणून कांहीं नाहींच असें म्हणूनच अध्यात्मवादावर भौतिकवाद्यांनीं हल्ला चढवला आहे.

ईश्वरावर श्रद्धा ठेवणारे जे असतात ते 'कतुमकर्तुमन्यथाकर्तुं' समर्थ म्हणजे 'कोणतीही गोष्ट करण्याला, न करण्याला व आहे त्यांत बदल करण्याला समर्थ' असा ईश्वर आहे असें मानतात. तसेंच तो न्यायी व दयाळूही आहे असें त्यांचें मत असतें. मानवजातीच्या सर्व आयुष्यांत दुःख हें जसें असह्य तसेंच अपरिहार्यही झालें आहे. त्याच्याशीं झगडतां झगडतां टेकीला आलेला मनुष्य आपल्या आटोक्यापलीकडे ज्या अनंत शक्ति आहेत त्या अदृश्य पण आपल्याच-सारख्या सजीव, स्तुतिप्रिय, रागलोभयुक्त देवता आहेत असें मानीत आला असून आपल्यापेक्षां त्या अधिक सामर्थ्यवान् असल्यामुळें त्याची आराधना करून आपलें संरक्षण करण्याचा यत्न मनुष्यानें हजारों वर्षें केला. वरुण, वायु, अग्नि, सूर्य वगैरे या सर्व शक्ति माणसाहून श्रेष्ठतर अशा देवता असून त्यांची आराधना निर-निराळ्या देशांत व धर्मांत निरनिराळ्या प्रकारें माणसानें केली आहे. या सर्व सृष्टीला जन्मास घालणारा आणि तिचें नियंत्रण करणारा, अग्नि, वरुण, वायु वगैरे सर्व देवतांवरही सत्ता गाजविणारा शास्ता कोणी तरी असला पाहिजे अशी शंका घेऊन माणसानें आपल्या कल्पना-शक्तींतून या सर्वसत्ताधारी ईश्वरास जन्मास घातलें आहे. अर्थात् आपल्या उपयोगासाठींच ईश्वर माणसाला हवासा वाटला व तो 'आहे' अशी माणसानें कल्पना केली. आपणांशीं ईश्वरानें न्यायानें वागलें पाहिजे, पण आपल्याच हातून चूक झाल्यास त्यानें क्षमाही केली पाहिजे अशी माणसाची इच्छा असल्यानें ईश्वर 'न्यायी' व 'दयाळू'ही आहे अशी दुहेरी कल्पना माणसानें केली. तसेंच सृष्टींत ज्या विलक्षण घडामोडी होतात त्या ईश्वर करतो असा दृढ समज होत गेल्यामुळें ईश्वर हा 'कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं समर्थ' असा आहे अशी सहजच कल्पना माणसानें रचली. ख्रिस्ती पुराणांत सृष्ट्यु-

त्पत्ति कशी झाली हें सांगतांना 'ईश्वर म्हणाला, प्रकाश होऊं दे, त्याबरोबर प्रकाश झाला' अशीं वर्णनें आहेत. पण भौतिकवाद्यांनीं ईश्वरासंबंधींची ही सर्व कल्पना साफ फेटाळून लावली आहे.

## सेश्वरवादावर आक्षेप

हिंदुस्थानांतील भौतिकवाद्यांची माहिती उपलब्ध नाहीं. चार्वाक म्हणून जो एक भौतिकवादी अथवा जडवादी होता असें म्हणतात, त्याची फक्त कुचेष्टा केलेली आढळते; पण शंकराचार्यांनीं जडवाद्यांच्या ईश्वरावरील आक्षेपांना जीं उत्तरें दिलीं आहेत त्यांवरून त्या वेळीं अथवा त्यापूर्वीं केव्हां तरी जडवादाचा जबरदस्त पगडा जनमनावर बसला असावा असें वाटतें. 'जगांत विषमता व निर्दयता इतकी दिसून येते कीं, अशा या अन्याय्य जगाचा निर्माता ईश्वर असणेंच शक्य नाहीं' असा एक आक्षेप शंकराचार्यांनीं शारीरभाष्यांत उद्धृत केला आहे; आणि तो खरोखर बिनतोड आहे. ईश्वर जर दयाळु, न्यायी व 'सर्वकर्तृत्व-समर्थ' असेल तर ज्वालामुखी, वादळें, रोगराई, मरण, इतर अनेक प्रकारचीं दुःखें हीं कां निर्माण व्हावीं? हीं त्यानें कां निर्मिलीं? 'हीं ईश्वराची लीला आहे' असें उत्तर अनेक साधुसंतांनीं दिलें आहे; पण खरोखर प्राणिमात्रांचीं दुःखें हीं जर त्या ईश्वराच्या क्रीडेचे विषय असतील तर तो निर्दय असला पाहिजे; म्हणजे तो 'ईश्वर' नव्हेच असें निरीश्वरवादी ऊर्फ जडवादी म्हणतात. शंकराचार्यांनीं जें उत्तर दिलें आहे तें अगदींच लंगडें आहे. ते म्हणतात, 'ईश्वर हा पावसासारखा मानावा. आपण गहूं पेरले तर पाऊस त्यापोसून आपणांस गव्हाचेंच पीक देतो.' 'करावें तसें भरावें' असें हें उत्तर आहे. पण मग कर्तुं (करण्याची) अकर्तुं (न करण्याची) व अन्यथा कर्तुं (आहे तें बदलण्याची) शक्ति जर ईश्वराची आहे तर

गहूं पेरले असतां ईश्वरभक्ताच्या इच्छेनुसार ईश्वरानें सोनें, मोतीं, राजवाडे, सुंदर स्त्रिया, कां देऊं नये? पाऊस जसा मर्यादित सामर्थ्याचा तसाच ईश्वर मर्यादित सामर्थ्याचा मानावा काय? मग तो ईश्वर कसला? त्यापेक्षां ईश्वर नाहींच म्हटलें तर?

## गीतेंतला निष्क्रिय ईश्वर

भगवद्गीतेनें या प्रश्नाचें मोठें चाणाक्षपणाचें उत्तर दिलें आहे. *'नाधत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः' (३-१५) आणि 'न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः। न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते' ॥ (३-१४) प्रभु म्हणजे ईश्वर कांहींही करीत नाहीं; जें घडतें तें 'स्वभावा'मुळें म्हणजे प्रकृतीमुळें, सृष्टिधर्मामुळें घडतें असें गीता सांगते. गीतेंत याविरुद्ध वचनेंही आहेत. अवताराचें आश्वासन, आपण स्वतः ईश्वर असल्यासंबंधानें कृष्णाचे उल्लेख वगैरे सर्व वचनें 'न कर्तृत्वं....' वगैरे वचनास विरोधी आहेत. पण त्याचीं अनेक कारणें असूं शकतील. गीताग्रंथांत मागाहून अनेक इतर पंथीयांनीं भर घातली असेल. सुसंगत, तर्कशुद्ध व अनुमानपद्धतीचें लिहिणें-बोलणें महाभारत कालानंतर पुष्कळ शतकांनीं नैय्यायिकांनीं सुरू केलें. त्यापूर्वीं पुराणें होतीं. महाभारत हें पुराणच आहे; गीता ही या पुराणाचा भाग आहे. अर्थात् तिची प्रतिपादनपद्धति पौराणिक आहे, त्यामुळें तींत विसंगति, विषयांतर व फाफटपसारा यांची रेलचेल दिसते. तथापि 'ईश्वर कांहींही करीत नाहीं', हा सिद्धांत श्रीकृष्णाच्या काळीं प्रसिद्ध असावा. स्वतः कृष्णाचें मत 'ईश्वर कांहींही करीत नसून प्रकृतिधर्माप्रमाणें सर्व सृष्ट व्यवहार होतात' असें ठाम असावें असें गीतेंत प्रकृतीचें जें महत्त्व

* 'नादत्ते' या रूढ पाठाऐवजीं पां. म. बापट यांनीं 'नाधत्ते' हा पाठ सुचविला आहे. मला तोच योग्य वाटतो. —गीतासेवक, पृ. १३०-१३१.

वर्णिलें आहे त्यावरून वाटतें. गीतेपूर्वींच्या सर्व वेदान्त ग्रंथांस हें मत मान्य असेल असें वाटत नाहीं; पण जुन्या पूज्य ग्रंथांस विरोध न करतां त्यांत नवीन अर्थ बसविण्याची जी सनातनपद्धति तिला श्रीकृष्ण बळी पडला असें दिसतें. गीतेंतला हा ईश्वर इंग्लंडच्या राजाप्रमाणें भासतो. सगळा राज्यकारभार कायद्याप्रमाणें मंत्रिमंडळ करीत असतें व राजा फक्त 'साक्षी' असतो. तसाच ईश्वर स्वतः कांहीं न करतां सनदशीर राजाप्रमाणें तटस्थ असतो व प्रकृति सर्व गोष्टी करते असें गीतेचें मत दिसतें. 'ईश्वर म्हणाला प्रकाश होऊं दे आणि प्रकाश झाला' अशा प्रकारचीं वचनें हिंदु धर्मग्रंथांतही आढळतात. पण गीतेला 'ईश्वर कांहींही करीत नाहीं, घडतें तें प्रकृतिधर्मानुसारच घडतें' हेंच मत संमत असावें असें मला वाटतें.*

गीतेनें 'ईश्वर कांहींही करीत नाहीं' ही भूमिका स्वीकारली असल्यानें गीतेंतला ईश्वर असून नसल्यासारखा आहे. पाश्चात्य जड-

* हिंदु वेदान्तास— मुख्यतः गीतेंतल्या वेदान्तास–ईश्वराचें अस्तित्वच संमत नसावें असें मला केव्हां केव्हां वेदान्त ग्रंथांत चाललेल्या चर्चेवरून वाटतें. 'परब्रह्म हें निर्गुण व निराकार आहे' या वाक्याचा अर्थ काय ? इंग्रजींत 'देअर इज नथिंग' म्हणजे 'नथिंग (कांहींही न) आहे' असें म्हणतात तशांतलाच हा 'निर्गुण निराकार ईश्वर आहे' म्हणजे 'ईश्वर नाहीं' म्हणण्याचा सभ्य अथवा सौम्य प्रकार असावा. या ईश्वराचें भजन–पूजन वेगळें कांहींच नसून 'आपलें कर्तव्यकर्म करीत राहणें हीच त्या ईश्वराची पूजा होय.' (१८-४६) असेंही गीता सांगते. पाश्चात्य आधिभौतिकवादी ईश्वर नाहींच म्हणून बेधडक सांगतात. पण गीता लोकमतास कदाचित् धक्का लावूं नये म्हणून म्हणा अथवा श्रीकृष्णाची स्वतःची कल्पना अपूर्ण असावी म्हणून म्हणा ईश्वर निर्गुण–– निराकार आहे व स्वकर्तव्य केलें म्हणजे वेगळी ईश्वराराधना करण्याची जरूरी नाहीं असें सांगते. दोन्ही युक्तिवादांचें पर्यवसान 'ईश्वर नाहीं' हेंच आहे असें मला वाटतें.

वाद्यांचा निरीश्वरवाद व गीतेचा 'नाकर्ता-ईश्वर'वाद हे फलतः सारखेच आहेत असें याप्रमाणें मानावें लागतें. 'ईश्वर कांहींच करीत नाहीं' ही गीतेची विचारसरणी जशी 'ईश्वर नाहींच' या जडवाद्यांच्या विचारसरणीशीं सदृश आहे तशीच जें घडतें तें सर्व प्रकृतिधर्मानें घडतें हें गीतेचें मतही जडवादाच्या मुख्य सिद्धांताशीं जुळणारें आहे. गीतेंत या सिद्धांताला 'गुणा गुणेषु वर्तन्ते' (गुणपरिणाम-वाद) असें म्हटलें असून हा मूळचा सांख्यांचा सिद्धांत आहे. जडवादी यालाच कार्यकारण-वाद म्हणतात. या मताप्रमाणें सर्व सृष्ट व्यवहार सृष्टींतील पदार्थमात्राच्या विविष्ट गुणधर्माप्रमाणें होत असतात. हे पदार्थ सर्वथैव जड आहेत. त्यांना भावना, वासना कांहींही नसून सर्व सृष्टि ही या जड धर्मानें अगदीं एकत्र निगडित झाली आहे. समुद्रांत कोठेंही एक मोहरीचा दाणा टाकला तर त्याच्या लाटा ज्याप्रमाणें जगाच्या सर्व किनाऱ्याला जाऊन भिडतात त्याप्रमाणें जडसृष्टींत झाडाचें एखादें पान हाललें तरी, भूमध्यापासून सूर्यमंडळापर्यंत त्याचे धक्के पोंचत असतात. अशी ही गुणपरिणामवादाची कल्पना असून गीता व जडवादी या दोघांनाही ती सारखीच मान्य आहे. गीतेचा व सांख्यांचा हा सिद्धांत हिंदूंच्या समग्र वेदान्त ग्रंथांस मान्य आहे कीं नाहीं यासंबंधानें मला ठाम मत देतां येत नाहीं. त्याचें संशोधन तज्ज्ञांनीं केलें पाहिजे; पण गीतेंतला नाकर्ता ईश्वर व गुणपरिणामवाद, आणि जडवाद्यांचा निरीश्वर सिद्धांत व कार्यकारणभाववाद या दोहोंत असलेला फरक निवळ तात्त्विक अथवा खरोखर शाब्दिक असून मथितार्थ व फलश्रुति यांत माझ्या मतें कांहींही फरक नाहीं. तेव्हां जडवाद्यांची विश्वासंबंधींची कल्पना काय आहे ती आतां थोडक्यांत समजून घेऊं.

# जडवाद्यांची विश्वकल्पना : : २

## प्रश्नचिन्हांकित निशाण

सृष्टींतील वस्तुजात, प्राणिमात्र व माणसें यांचें प्रत्येकीं जाति-वैशिष्टयसूचक असें एकेक निशाण ठरवायचें असलें तर माणसाचें निशाण प्रश्नचिन्हांकित ठरवावें लागेल. गोचर सृष्टि ही काय आहे, कशी आहे, बदलतां येईल का, कशी बदलावी वगैरे प्रश्नांनीं माणसाला भंडावून सोडलें असून विचारानें व कृतीनें नित्य जुने प्रश्न सोडवावे व नवे विचारावे असा माणसाचा क्रम हजारों वर्षें चालू आहे. मनुष्येतर प्राण्याला जिवंत राहण्याची तीव्र इच्छा असते व त्यासाठीं त्याचा प्रयत्नही असतो. 'हातांत चारा घेतलेला मनुष्य पाहिला कीं गाय त्याकडे आशेनें धावत येते व खड्ग घेतलेला मनुष्य पाहिला कीं त्यापासून भयानें दूर पळून जाते.' यावरून जिवंत राहण्याची व सुख भोगण्याची जशी इच्छा गाईला आहे असें दिसतें त्याप्रमाणें अनेकदां एक प्रकारच्याच पाहिलेल्या दृश्यावरून सृष्टीसंबंधीं कांहीं नियम बांधण्याची—सृष्टि नियमबद्ध आहे असें मानून, ते नियम शोधण्याची व त्यांचा आपल्या सुखासाठीं व जिवंत राहण्यासाठीं उपयोग करण्याची सुप्त प्रवृत्ति गाईच्या ठिकाणींही दिसते. मुंग्यांना पावसाळा लवकरच येणार हें हेरतां येतें. कोंबड्याला पहाट झाल्याचें नेमकें कळतें. सृष्टि-नियमांची सुप्त जाणीव मनुष्येतर प्राण्यांना असते व ते तिचा उपयोग करतात अशीं उदाहरणें अनेक देतां येतील. माणसालाही ही जाणीव आहेच. पण ती अधिक व्यक्त आहे. ज्याला अहंकार म्हणतात ती

भावना, म्हणजे 'मी आहें', 'जग आहे' व 'जगाचा व माझा संबंध आहे' अशा प्रकारची जाणीव, मनुष्येतर प्राण्याला कितपत आहे हें समजत नाहीं. पण माणसाला मात्र ही जाणीव तीव्र आहे. याच जाणीवेचें एक विशिष्ट अंग म्हणजे सृष्टिनियमांची सक्ती नित्य अनुभवाला येत असूनही 'मी स्वतंत्र आहें' 'मला होणारी अमुक एक इच्छा मी प्राप्त करून घेऊं शकेन' असा एक आत्मविश्वास अथवा तीव्र इच्छा माणसाला आहे. हा आत्मविश्वास अथवा ही तीव्र इच्छा प्रत्यक्ष सृष्टींत आणण्यासाठीं माणूस झटत असतो. या झगड्याच्या निमित्तानें व प्रश्नचिन्हांकित भावनेनें जगाकडे पाहण्याच्या स्वभावा-मुळें जिवंत सृष्टि व जडसृष्टि या भेदाकडे माणसाचें लक्ष तीव्रतेनें वेधलेलें आहे. "आत्मा व शरीर यांचा संबंध काय? आपल्या शरीरां-तील मानासिक शक्ति व आपल्या शरीरांतील घटक-द्रव्यें यांचा संबंध काय? इच्छास्वातंत्र्य व जड नियमांची सक्ती यांमधील सीमारेखा कुठें आहे? अमूर्त, अदृश्य असें वैचारिक जग आणि बाह्य गोचर सृष्टि यांचें नातें काय? हे प्रश्न माणसापुढें हजारों वर्षांपासून उभे असून वेळोवेळीं त्यानें तर्कानें त्या प्रश्नांचीं कांहीं उत्तरेंही दिलीं आहेत."

## माणसाच्या मनांतच आत्म्याचा जन्म

माणसाचें अथवा जनावराचें प्रेत हें प्राचीन रानटी माणसाला मोठें कोडें वाटत होतें. जो माणूस क्षणाभरापूर्वीं आपणाशीं बोलत चालत होता, प्रेम करीत होता, भांडत होता तो एकदम असा जड कां बनला? अंगाला मार लागला तरीही तो कांहीं हालचाल करीत नाहीं, खात नाहीं, पीत नाहीं, हसत-रडत-बोलत-पाहत-ऐकत नाहीं हें काय? त्याचीं सर्व गात्रें व रूप पूर्वीसारखेंच असून फक्त चलनवलन तेवढेंच कां बंद झालें? ही शंका प्रेत पाहून माणसाला

आली आणि सृष्टींत गोचर होणाऱ्या जडापासून त्यानें अगोचर असा आत्मा वेगळा काढला. तो शरीरांत असल्यामुळें जिवंतपणा असतो, तो नाहींसा होताच देह मृत, जड होतो असा तर्क माणसानें बांधला. हा आत्मा देहांतून बाहेर गेला— देह मेला— तरी स्वतः मरत नाहीं असें त्याला स्वप्नावरून वाटलें. मेलेलीं माणसें स्वप्नांत दिसतात तीं नवे देह धारण करून दर्शन देतात असा त्यानें तर्क बांधला. आपण अंथरुणावर निजलों असतां कुठें तरी दूर देशीं आपण गेल्यासारखें आपणास वाटतें हें काय ? झोपेंतहि शरीरांतला आत्मा शरीराची जिवंतपणाची व्यवस्था करून ठेवून बाहेर फिरायला जात असतो असें माणसानें या शंकेचें स्वतः उत्तर देऊन टाकलें. "आपण स्वप्नांत जें पाहतों व अनुभवतों तें खरोखर घडतें याबद्दल रानटी माणसाला मुळींसुद्धां शंका नसते. उदाहरणार्थ, आपण एखाद्या शिकारीला निघालों अथवा एकाद्या शत्रूशीं लढून विजयी झालों असें स्वप्न पाहून जागा होतांच आपण आपल्या अंथरुणावरच आहों असें जर त्यास दिसून आलें तर तो समजतो कीं, आपल्या ठिकाणीं एक अगोचर छोटा आत्मा आहे, तो हवेहूनही हलका आहे, तोच आपल्या मोठ्या आत्म्यापासून निसटून भटकायला गेला व त्यानें हे उद्योग केले. आपले मेलेले आई-बाप व मित्र त्याला स्वप्नांत भेटले तर या मृतांचे आत्मे आपल्या प्रत्यक्ष भेटीला आले होते असें तो मानतो." प्रत्येक जिवंत शरीरांत हा आत्मा असतो तोंवरच त्याचे व्यवहार चालतात, आत्मा शरीरांतून गेला कीं शरीराचे व्यवहार थांबतात; यावरून सृष्टीच्या हालचालीसही एकादा आत्माच कारण असून तो सर्व सृष्टींत भरून आहे अशी माणसानें कल्पना केली. जिवंत शरीराच्या हालचाली आत्म्याच्या इच्छेनुसार होतात यावरून सृष्टींत दिसून येणाऱ्या हालचालीही सृष्टींत

भरून राहिलेल्या आत्म्यामुळें होत असतात. जडधर्मांची सक्ती या आत्म्याच्या इच्छेवर अवलंबून नसून आत्मा हा स्वतंत्र आहे, आपला आत्मा जसा शरीरावर सत्ता चालवितो तसाच सृष्टींतला आत्माही सृष्टीचा प्रभु असला पाहिजे, त्याच्याच सत्तेनें सृष्टि-व्यवहार चालतात अशी माणसानें कल्पना केली.

## आत्मा म्हणजे काय कुणास ठाऊक!

आत्मा म्हणजे खरोखर नेमकें काय आहे याचा शोध, हजारों वर्षांपूर्वीं रानटी माणसास यासंबंधानें जी कल्पना होती त्याहून अधिक असा, आजच्या शास्त्रीय जगांतही फारसा लागलेला नाहीं. सृष्टीच्या व्यवहारांत गूढ अशा वाटणाऱ्या अनेक गोष्टींचा उलगडा आतां झाला आहे खरा. गुरुत्वाकर्षणाच्या सिद्धांतानें व इतर कांहीं नियमांच्या शोधांनीं सर्व सूर्यमालेसंबंधींचे नियम माणसानें शोधून काढले. ऊन्ह, वारा, पाऊस, ज्वालामुखी, भूगर्भाची संघटना भूगोलाची रचना व त्यांतील पालट, उद्भिज्ज, खनिज वस्तूंच्या घटना व त्यांची वाढ वगैरे किती तरी गोष्टी माणसास कळल्या. पंचमहाभूतांचे गुणधर्म समजून घेऊन अजिंक्य वाटणाऱ्या सृष्टीवर माणसानें पुष्कळ प्रभुत्व मिळविलें. ज्याला आपण जिवंत शरीर म्हणतों त्यावरही जडधर्मांचें बंधन आहे असें माणसास आढळलें आहे. जडवस्तूप्रमाणें जिवंत शरीरास आकार, वजन वगैरे आहेत. जिवंत शरीरांत चालणाऱ्या अनेक क्रिया पदार्थधर्मानें अथवा रसायनधर्मानें चालतात हें माणसास कळलें व त्यावरून रोगी शरीरांतील रोग नाहींसे करण्याचे उपाय शोधून त्यानें ते यशस्वी केले. पण अजून शरीर मेलें म्हणजे हे रासायनिक व्यवहार बंद कां पडावे, अथवा मरणें म्हणजे काय, हें कांहीं माणसाला उमगलेलें नाहीं. एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं 'आम्हांस जीव म्हणजे

काय हें समजलें' असे मानणारे भौतिक शास्त्रज्ञ होते. जडापासून जीव निर्माण होतो असें आपण सिद्ध करूं असें त्यांना वाटे. पण पुढें त्यांना तें साधलें नाहीं. आणि आतां जीव हा जडापासून होऊंच शकणार नाहीं, सजीव असेल तें मरून जड होईल, पण जडापासून जीव उत्पन्न होणार नाहीं असें शास्त्रज्ञ मानीत आहेत. जिवंत शरीराचें पोषण जडद्रव्यानें होतें, म्हणजे ज़ड द्रव्य जिवंत शरीरांत समरस होतें पण तें स्वतंत्रपणें जीव निर्माण करूं शकेल असें भौतिक-शास्त्रज्ञ* मानीत नाहींत.

## तत्त्वज्ञांचे दोन पक्ष

पण भौतिक शास्त्रज्ञांच्या या मताचा अर्थ जडापासून जीव उत्पन्न करण्याची कला त्यांना साधलेली नाहीं इतकाच होऊं शकेल. जीव जडापासून कधींच होणार नाहीं असा कांहीं त्याचा अर्थ नव्हे. तत्त्वज्ञांमध्यें जीवापासून जडाची उत्पत्ति झाली असे मानणारे व जडापासून जीवाची उत्पत्ति झाली असे मानणारे असे दोन पक्ष झाले आहेत. जीवाचें मूळ तत्त्व ईश्वर आहे, त्याच्या इच्छामात्रेंकरून सजीव-निर्जीव जगाची उत्पत्ति झाली असें ईश्वरवाद्यांचें मत आहे. ईश्वर म्हणाला, 'प्रकाश होवो, आणि प्रकाश झाला' ही बायबलांतील कल्पना याच आशयाची आहे. 'बहुस्यां, प्रजायेयं' अशी ईश्वरानें इच्छा व्यक्त केली व पूर्वीं एकच एक ईश्वरमय असलेलें ज़ग बहुविध झालें अशी कल्पना श्वेताश्वतरोपनिषदांत आहे. सृष्टीच्या आरंभीं नुसतीच इच्छाशक्ति होती. तिच्या बलानें सर्व गोचर-अगोचर सृष्टीचा पसारा वाढला असें हेगेल या तत्त्वज्ञाचें मत आहे. ईश्वर

* 'भौतिक शास्त्रज्ञ' म्हणजे पदार्थ-विज्ञान, रसायन वगैरे सृष्टिशास्त्रांतले विशेषज्ञ. 'भौतिकवादी' म्हणजे सर्व गोचर सृष्टि जडापासून झाली आहे वगैरे मानणारे तत्त्वज्ञ.

हाही, हेगेलच्या मतें, कांहीं साकार नव्हता, भावरूप (आयडिया) अथवा इच्छारूप होता म्हणून या मतास भाववाद असें म्हणतात. या भाववाद्यांतही दोन भिन्न मतें आहेत. 'ईश्वर म्हणाला प्रकाश होवो आणि प्रकाश झाला' या मताप्रमाणें सृष्टींतील सर्व व्यवहार ईश्वराच्या इच्छेनुसार अथवा लहरीनुसार होत असतात. उलट हेगेलची इच्छाशक्ति एकदां जगाचा पसारा प्रगट करूं लागली कीं मग तो कांहीं विशिष्ट नियमानुसारच करते.

## आत्मा हा जडाचा एक धर्म

भौतिकवाद्यांना जगाच्या आरंभीं ईश्वर, भाव, कल्पना वगैरे कांहीं होतें हें मान्यच नाहीं. पंचज्ञानेंद्रियें, मन आणि बुद्धि यांना प्रतीत होणारें म्हणजे गोचर असें जग तेवढेंच भौतिकवाद्यांच्या मतें खरें होय. "मनुष्य, त्याच्या डोक्यांतील भावना, कल्पना सर्व कांहीं या गोचर जगाचेच भाग होत. या जगाबाहेर अथवा त्याच्या नियमनाबाहेर कांहींही नाहीं. मनुष्याचे विचार, इच्छा, अहंकार वगैरे ज्या सर्व गोष्टी आपण आत्म्याचीं व्यक्तरूपें म्हणतों तीं व स्वतः आत्मा यांना भिन्न, स्वयंसिद्ध अस्तित्व मुळींच नसून ते जडाचे धर्मच आहेत." कांहीं पदार्थ गोड असतात अथवा कांहीं पदार्थांच्या कांहीं रासायनिक अवस्थेंत त्यांना गोडी येते, तसेंच कांहीं पदार्थांच्या विशिष्ट रासायनिक अवस्थेंत त्यांच्या ठिकाणीं आत्मा म्हणजे जीव व्यक्त होतो. आत्मा हा जडाचा एक धर्मच आहे. सजीव आणि निर्जीव हा भेद खरा आहे. पण जीव म्हणून कांहीं वेगळें तत्त्व आहे आणि तें जडांत प्रवेश करतें झालें हें म्हणणें खरें नसून जडाच्या विशिष्ट अवस्थेंत जड हें जिवंतपणाचा गुण दर्शवूं लागलें. "जिवंतपणा ही जडाची एक उच्चावस्था आहे" असें फार तर म्हणावें.

## मेंदू व आत्मा

मन, बुद्धि, अहंकार या स्वरूपांनीं व्यक्त होणारा आत्मा हा जडापासूनच निर्माण झाला आहे असें मानण्याचें महत्त्वाचें कारण असें आहे कीं, मेंदू हा जड असून त्या मेंदूमुळेंच आत्म्याचीं सर्व कार्यें होत असतात. प्राणी बौद्धिक दृष्ट्या जितका जितका अधिकाधिक उच्च दर्जाचा असेल तितका तितका त्याचा मेंदू अधिक विकसित असतो. " उत्क्रांति-क्रमांत एखादा प्राणी जितका अधिक उच्च दर्जाचा असेल तितके त्याच्या शरीराचे अवयव गुणानें व संख्येनेंही अधिक असतात. त्याच्या ज्ञानतंतूचें जाळें अधिक गुंतागुंतीचें असतें. मेंदूची रचना अधिक सूक्ष्म व नाजूक असते, मेंदूंतील जीवपेशींचा श्रमविभाग अधिक प्रमाणांत झालेला असतो. आणि भावना, इच्छाशक्ति, विचारशक्ति यांचीं कार्यें अधिक विकसित झालेलीं असतात." यावरून आत्म्याचा विकास हा सर्व जड देहाशीं अभेद्यपणें संलग्न आहे हें कळून येतें. " जे प्राणी उत्क्रांतिक्रमाच्या शेवटच्या पायरीवर असतात त्यांची ज्ञान-तंतु-संघटना एककेंद्र झालेली नसते. त्यांच्या मानसिक क्रियाही अगदीं सामान्य असतात. त्यांची हालचाल केवळ प्रतिबिंबात्मक असते. उजेड, उष्णता, दमटपणा वगैरे बाह्य प्रेरणांनींच त्यांच्यांत हालचाल उत्पन्न होते. त्यांच्या ठिकाणीं अहंकाराची उत्पत्ति झालेली नसते. निवळ जिवंतपणा त्यांचे ठिकाणीं असतो. झाडें, वनस्पति वगैरेंच्या ठिकाणीं असा निव्वळ जिवंतपणा असल्याचें आढळून येते. अगदीं प्राथमिक अवस्थेंतला हा जीव उत्क्रांतिक्रमांत विकासूं लागला कीं, त्याच्या शरीरांत श्रमविभाग सुरू होतो. मेंदू व इतर अवयव उत्पन्न होऊन विशिष्ट कार्यें करूं लागतात. अहंकार व इच्छाशक्ति यांचीं कार्यें सुरू होतात. शरीरांतील जड अवयवांच्या

विकासाबरोबरच या मानसिक अथवा आत्मिक शक्तींचा विकास होत असतो. खुद्द माणसाचे बाबतींतही लहान मुलाचा शारीरिक विकास होत जातो तसाच मानसिक विकास होत असल्याचें आढळून येतें. मेंदू ही जड वस्तूच आहे. तो जसा विकसत जाईल त्याच प्रमाणांत मानसिक शक्तींचा विकास होत असतो. प्राण्याच्या मानसिक शक्तींचा संबंध मेंदूशीं व ज्ञानतंतूंशीं जडलेला आहे. हा भौतिक शास्त्राचा महत्त्वाचा सिद्धांत होय.'' मेंदू तपासण्याचे निरनिराळे प्रयोग शास्त्रज्ञांनीं केले असून त्यांत उत्तम कलावंत, अद्वितीय विद्वान् कर्तबगार थोर पुरुष यांचे मेंदू गुणानें व परिमाणानेंही श्रेष्ठ दर्जाचे आहेत असें आढळून आलें आहे. वेडया माणसांचे मेंदू कमी दर्जाचे भरले. शिलर, बायरन, टर्जिनीव्ह वगैरे अद्वितीय बुद्धिमानांचे मेंदू पॅरिसच्या एका शास्त्रज्ञानें तपासून पाहिले होते. ते सामान्य माणसाच्या पेक्षां विशेष उच्च दर्जाचे आहेत असें त्यास आढळून आलें. मेंदू आणि मानसिक क्रिया यांचा संबंध काय हें समजून घेण्यासाठीं एका फ्रेंच शास्त्रज्ञानें पक्षी व इतर प्राणी यांच्याबर प्रयोग केले. त्यानें कांहीं कोंबडीचीं पिलें प्रयोगासाठीं घेतलीं. ठराविक काळ जाऊं देऊन दर वेळीं तो त्यांचा मेंदू थोडथोडा कापीत असे. तितक्या प्रमाणांत त्यांच्या मानसिक शक्ति कमी होत असल्याचें त्यास आढळून येई. शेवटीं खाण्यापिण्याची इच्छा व संकट-निवारणाची इच्छा याही त्यांचे ठिकाणच्या नाहींशा झाल्या. तरी पण शास्त्रीय कृत्रिमतेनें त्यांना अन्न घालून त्यांना जिवंत ठेवतां येई. मेंदू जवळजवळ नाहींसा झाला होता अशा अवस्थेंत, अगदीं प्राथमिक अवस्थेंतल्या वनस्पतीसारखें स्वरूप या पिलांना आलें होतें. यावरून जड अशा मेंदूमुळेंच जिवंतपणा, विचार, भावना, इच्छा वगैरे आत्मिक शक्ति उत्पन्न होतात हें सिद्ध होतें. डार्विनच्या विकासवादानेंही शारीरिक

विकासावरच मानसिक विकास अवलंबून आहे ही गोष्ट सिद्ध केली आहे. अर्थात् भौतिकशास्त्रज्ञांना जीवोत्पत्ति कशी झाली, जीवाचें सातत्य कशामुळें टिकतें वगैरे प्रश्नांचीं उत्तरें अजून देतां येत नाहींत हें खरेंच. तरी पण सजीव व निर्जीव सृष्टीचा आधार जड-द्रव्यच आहे हा सिद्धांत सोडावा असें भौतिकवाद्यांना वाटत नाहीं.

---

# भौतिकवाद् व मानवसमाज : : ३

## लहान मूल म्हणजे कोरा कागद

अगोचर गणला गेलेला आत्मा हा सुद्धा अखेर जड अशा मेंदूवर अवलंबून आहे असें सिद्ध केलें तरी, मानवी व्यवहाराची प्रेरणा कशी होते हा प्रश्न पुन्हा उत्पन्न होतो. मेंदू हा जड असेल पण त्याच्या ठिकाणीं उत्पन्न होणाऱ्या वासना, भावना, कल्पना या अखेरीस अमूर्तच आहेत. प्रत्येक व्यक्तीची कांहीं वासना, कल्पना असते. अनेक व्यक्तींच्या अशा वासना-कल्पना समाजांत उत्पन्न होत असतात, कांहीं परस्पर-सुसंगत असतात, कांहीं परस्पर-विसंगत असतात. त्यांच्या संघर्षानें शेवटीं एक सामाजिक वासना अथवा कल्पना निर्माण होऊन तिच्यामुळेंच धर्म, नीति, रूढि, न्याय, कायदा, राजकीय संघटना वगैरे निर्माण होतात. अशा सर्व समाजाला एक-ध्येय निर्माण होतें आणि या सामाजिक ध्येयाच्या बुडाशीं अनेक व्यक्तींचीं ध्येयेंच असतात. हीं ध्येयें, इच्छा, कल्पना अमूर्त असतात तेव्हां सगळी सृष्टि जडापासून उत्पन्न झालेली, जडावर आधारलेली

असें म्हणून अखेर मानवी व्यवहार तेवढे जडावर न आधारतां त्या बाबतींत भाववाद स्वीकारावा लागेल काय? 'नाहीं' असें भौतिकवाद्यांचें या प्रश्नास उत्तर आहे. "सामाजिक वासना, भावना, ध्येयें या सर्वांची उत्पत्ति मानवी जीवनावर आघात करणाऱ्या भौतिक परिस्थितींतूनच होतें. एकाद्या समाजाच्या ध्येयास जेव्हां नवीन स्वरूप येत आहेसें दिसतें तेव्हां तें कोणत्याही इच्छाशक्तीचा परिणाम असतें असें नसून, भोंवतालच्या भौतिक परिस्थितीच्या विकासामुळें त्या समाजाच्या ध्येयाचें रूप बदलणें अवश्य होतें.... भौतिक परिस्थितीच्या बदलण्यामुळें विचारपद्धति बदलतात, मेंदूच्या रचनेंतही पालट होतो." सारांश, "माणसाच्या अंगभूत अशा कल्पना कांहींही नाहींत. भोंवतालची परिस्थिति आणि तिच्या आघातानें विकास पावणारा समाज जसा बदलतो तसाच व्यक्तींत पालट होत असतो." असें भौतिकवाद्यांचें म्हणणें आहे.

अर्थात् व्यक्तींत व समाजांत असलेले दोष नाहींसे करून टाकण्याचा मुख्य उपाय म्हणजे त्याच्या भोंवतालच्या परिस्थितींतले दोष नाहींसे करणें हाच होय. लॉक म्हणतो, "लहान मूल हें कोऱ्या कागदासारखें असतें." कोऱ्या कागदावर खोटा दस्तैवज लिहिला तर तो कागद गुन्हेगारीचा ठरेल. त्यावर गीता अथवा बायबल लिहिलें तर तो जगद्वंद्य मानला जाईल. तसेंच लहान मुलाचें आहे. त्यावर भोंवतालच्या परिस्थितीनें जसे बरे-वाईट संस्कार होतील तसे तें अगदीं सामान्य, असामान्य, दुष्ट, सज्जन, पराक्रमी, नेभळें, बुद्धिमान, कर्तबगार, शिवाजी, नेपोलिअन, हिटलर, चर्चिल वगैरे कांहींही होऊं शकेल. विशिष्ट सामाजिक परिस्थितीच्या आघातानें विशिष्ट प्रकारच्या व्यक्ति व विशिष्ट प्रकारचे समाज होऊं शकतात.

## पालट कां होतो ?

पण या युक्तिवादावर आणखी शंका निर्माण होतात. विशिष्ट भौतिक व सामाजिक परिस्थिति निर्माण होते कशानें ? बदलते कशानें ? जगाकडे पाहिलें, तर एकच एक भौतिक परिस्थिति एकदम सर्वत्र नाहींच. पण एका काळीं असलेली भौतिक परिस्थितिही दुसऱ्या काळीं आढळून येत नाहीं. ज्वालामुखी, भूकंप, वादळें, सूर्यमालेंतील क्रांत्या यांनीं भौतिक पालट होऊन त्यांचा परिणाम मानवजातीवर झालाच आहे. जगांत माणसांचे वर्ण निरनिराळे आहेत याचीं कारणें काय याचें संशोधन अजून झालेलें नाहीं. पण समाजघटना ही जी निवळ माणसांची कृति तींत गुलामगिरीपासून लोकशाहीपर्यंत अनेक भिन्न भिन्न प्रकार एकाच वेळीं कां असावे ? ज्या युरोपांत एका काळीं एकेका शहराचीं राष्ट्रें व राज्यें असत तेथें सगळ्या युरोपचें राज्य बनविण्याची महत्त्वाकांक्षा कां निर्माण झाली ? राजा हा ईश्वरी अंश म्हणणाऱ्यांनीं राजांच्या कत्तली केल्या आणि लोकराज्यें निर्माण केलीं; व परत लोकराज्यें नाहींशीं करून हुकूमशहा स्थापन केले याचें कारण काय ?

याचें कारण मनुष्यस्वभावांत होणारे पालट असें उत्तर कांहीं भौतिकवाद्यांनीं दिलें आहे. पण मग भौतिक परिस्थितींत होणारे पालट हे मनुष्यस्वभाव बदलण्याचें कारण, कीं मनुष्यस्वभावांत होणारे पालट हे भौतिक परिस्थिति बदलण्याचें कारण ? मनुष्य-समाजघटनेंत व माणसाभोंवतालच्या परिस्थितींत पालट होतात हें कोणासही मान्य करणेंच भाग होतें. मनुष्यस्वभावाचें कारण भौतिक परिस्थिति अथवा भौतिक परिस्थितीचें कारण मनुष्य-स्वभाव यांपैकीं कांहींही खरें मानलें तरी, यामुळें होणारे पालट तरी ठराविक स्वरूपाचे असायला हवे होते. जड सृष्टीच्या गुणधर्मांची

संख्या अथवा परिमाण ठराविकच असणार. त्यांत पालट झाले तरी कांहीं कालानें पुन्हा तेच पालट होणें अवश्य होतें. वर्षारंभापासून वर्षअखेरपर्यंत निरनिराळे ऋतु येतात व जातात. झाडांना जुनीं पानें जाऊन नवीन पालवी येते. फुलें, फळें वगैरे येतात. सूर्य, चंद्र, ग्रह, नक्षत्रें यांच्या अवस्थांत पालट होतो. पण एक साल संपून दुसरें साल सुरू झालें, कीं पूर्वींच्या पालटांची सर्व पुनरावृत्ति होते. पुन्हा पानें, फुलें, फळें, येतात. पुन्हा उन्हाळा, पावसाळा, हिंवाळा येतोच. सूर्य-चंद्रादिकांच्या गति अशा अगदीं दरसाल त्याच त्याच येत नसल्या तरी दीर्घकालानें पुन्हा त्याच आल्यावांचून राहत नाहींत. एखाद्या घटनेचें 'कालचक्र' वर्षाचें असतें तर दुसऱ्या एखाद्या घटनेचें अनेक वर्षांचें असतें. पण 'कालचक्र' आहे आणि ठराविक कालानें सृष्टींत त्याच त्याच घटना पालटून पालटून येतात असें दिसतें. पण मानवसमाजाचें असें दिसत नाहीं. मानवसमाजांत नित्य नवे पालट आहेत. लोकशाही आली, गेली व पुन्हा आली असें आपण म्हणतों. तरी पण जुन्या लोकशाहीहून नवी लोकशाही शब्दसाम्याखेरीज प्रत्येक बाबतींत भिन्न आहे. स्पार्टा, अथेन्स वगैरे प्राचीन ग्रीक शहरांतील लोकशाही आणि हिंदुस्थानच्या दुपटीनें क्षेत्रफळ असलेल्या अमेरिकन राष्ट्रांतली आजची लोकशाही यांत खरोखर कांहींहि साम्य नाहीं. प्राचीन ग्रीसची शस्त्रास्त्रें आणि आजचीं हिटलरचीं शस्त्रास्त्रें यांचें गोत कांहींच लागत नाहीं. हे पालट कांहीं चक्राकार होतातसे वाटत नाहीं. मागील परिस्थितींतून पुढील परिस्थिति निर्माण झाल्यासारखी दिसते. पण फिरून उन्हाळा, पावसाळा, हिंवाळा यावा त्याप्रमाणें पूर्वींचे पालट पूर्वींच्या स्वरूपांत आलेले दिसत नाहींत.

जड धर्म हे जर सर्व निश्चित आहेत तर त्यांपासून सर्वस्वी नवीन असे परिणाम कोठून निर्माण झाले?

भौतिकवाद्यांना न सुटणारें हें कोडें सोडविण्यास मागें उल्लेखिलेला हेगेलचा भाववाद पुढें आला. सृष्टीचा व मानवजातीचा विकास होत आहे ही गोष्ट हेगेल यास मान्य होती. अर्थात् निश्चित गुणधर्मवान अशी जी जडसृष्टि तींतून विकासगुण कसा निर्माण होणार? म्हणून भौतिकवाद, जडवाद चूकच आहे असें मत हेगेल यानें दिलें. त्याच्या मतें, भाव, कल्पना, इच्छा हीच सृष्टिमूल आहे. गोचर विश्वाच्या पूर्वीही तिचें अस्तित्व असून ती अनादि आहे. तिच्यांतूनच पुढें जडसृष्टि निर्माण झाली. तींतच सजीव वस्तु व अखेर मनुष्यही निर्माण झाला. या विकासक्रमानें ही इच्छाशक्ति स्वातंत्र्याकडे धाव घेत आहे. इतिहासांत उत्पन्न होणारी अमुक अवस्था चांगली व दुसरी अमुक वाईट हें म्हणणें खरें नसून एकाद्या झाडाचें पान कडवट असतें, फळ कच्चें असतां आंबट असतें व पक्क झाल्यावर गोड होतें या त्याच्या सर्व भिन्न अवस्था प्रगतच्याच आहेत, त्याप्रमाणें समाजाच्या इतिहासांत उत्पन्न होणारी कोणतीही अवस्था क्रमप्राप्त व अपरिहार्य—इतकेंच नव्हे तर इष्टही आहे असें हेगेल मानी. त्याच्या काळीं जर्मनींत अनियंत्रित राजा होता. त्याची राजवट वाईट होती. पण हेगेलच्या या विचारसरणीवरून पाहतां ही अनियंत्रित राजसत्ताही इतिहासक्रमप्राप्त आहे म्हणून समर्थनीय आहे असें हेगेल, जाणून अथवा अजाणतां, सुचवीत होता.

पण ही विचारसरणी ईश्वरवादाचीच बिघडवून वाढविलेली आवृत्ति होती. भौतिक वादाप्रमाणें वस्तूंचे गुणधर्म समजून घेऊन माणसाला आपली परिस्थिति सुधारण्यास तरी मार्ग मोकळा होता. ईश्वरवादांत ईश्वराची भक्ति करून तरी माणसाला आपली परिस्थिति

सुधारण्याची आशा होती. पण हेगेलचा भाव अथवा इच्छा (आयडिआ, वुइल्) ही भक्ति करून पावणारी नव्हती. तिचा जो एक विशिष्ट क्रम त्याच क्रमानें ती विकासणार होती. यत्नवादाचा तेथें कांहींच उपयोग नव्हता. इतिहासांत जें जें कांहीं घडेल तें तें सर्वच क्रमप्राप्त व इष्ट असें मानल्यावर खालीं मान घालून काळाचे तडाखे खात राहणें एवढेंच कर्तव्य व भोगवटा माणसाला उरत होता. कार्ल मार्क्सच्या भौतिकवादानें मानवजातीची या हताशेंतून सुटका केली.

---

# मार्क्सची विचारसरणी : : ४

मानवजाति विकासत आहे, तिच्या घटनेची व कर्तृत्वाची प्रगति होत आहे, हें मार्क्सला उघड दिसत होतें. पण जड व निश्चित अशा सृष्टिधर्मांतून हा विकासगुण कसा निर्माण होणार ही शंका त्यालाही आलीच. या शंकेचें उत्तर देण्यासाठीं जड अशा निश्चित गुणधर्मवान् सृष्टींत जो नित्य विकास दिसतो त्याच्या तळाशीं नित्य बदलणारें काय आहे याचें त्यानें इतिहासांत खोल शिरून संशोधन केलें. आणि या नित्य विकासास माणसाचें कर्तृत्व—माणसाचें एका विशिष्ट क्षेत्रांतील कर्तृत्व—कारण आहे असें त्यास आढळून आलें. हें विशिष्ट क्षेत्र म्हणजे धनोत्पादनाचा खटाटोप हें होय.

## डार्विनचा विकासवाद

सजीव सृष्टि हा निर्जीव सृष्टीचाच एक भाग असला तरी सजीव सृष्टि व निर्जीव सृष्टि यांचें सख्य कधींच नाहीं. थंड प्रदेशांत

राहणाऱ्या अस्वलांना ईश्वरानें दाट केसांचें नैसर्गिक पांघरूण दिलें, लहान वासरां-मुलांना दूध मिळावें म्हणून ईश्वरानें त्यांच्या मातांच्या स्तनांत दूध दिलें, वाघ-सिंहांना नखें-दाढा दिल्या, हरिणाला आत्म-रक्षणार्थ ईश्वरानेंच चपळता दिली वगैरे प्रकारें सृष्टीची उपपत्ति ईश्वर-वादी सांगूं शकत असून, ईश्वर हा शहाणा, दूरदर्शी व दयाळु आहे असें सांगूं शकत होते; पण ज्वालामुखी, धरणीकंप व रोगराई यांनीं कोट्यवधि जीवांचा संहार कां होतो, वाघानें आणि सिंहानें हरिणाला पकडून खावें आणि गाई-म्हशींचें दूध वाघ-सिंहांना न आवडतां त्यांचें मांसच आवडावें असें करण्यांत ईश्वराची दया, शहाणपण अथवा दूरदर्शीपणा यांपैकीं कोणता गुण दिसून आला याचें उत्तर ऐश्वरवाद्यांना सयुक्तिक असें देतां येत नसे. चार्ल्स डार्विन या प्राणिशास्त्रज्ञानें या शंकेचें निर्भीड उत्तर दिलें. ईश्वराची अडगळ त्याच्या विचारसरणींत मुळींच नव्हती. पण मग उत्तरध्रुवाजवळील कडक थंडीच्या प्रदेशांतल्या अस्वलांच्या अंगां-वर त्यांच्या संरक्षणास अवश्य असें दाट केसांचें जाड कातडें कोठून आलें? ईश्वरावांचून हें कोण करील? डार्विन म्हणाला, ज्याच्या अंगावर दाट, राठ केसांचें जाड कातडें आहे असा अस्वल त्या कडक थंडींत, त्या आच्छादनामुळें जिवंत राहिला व म्हणून आपणांस पाहण्यास मिळाला; पण या थंडीच्या तडाख्यांत पुरेसें आच्छादन नसलेले किती तरी जीव जन्मतांच मेले. ज्वालामुखीचा स्फोट जसा केवळ सृष्टिक्रमानें झाला त्याचप्रमाणें लक्षावधि जीव उत्तरध्रुवाजवळ थंडीच्या कडाक्यानें मेले. जाड केसांचें अस्वल तेवढें जगलें ही 'निसर्गा-ची निवड' (नॅचरल सिलेक्शन) होय; जो निसर्गाशीं झगडण्यास समर्थ ठरतो तो टिकतो (सर्व्हायव्हल् ऑफ दि फिटेस्ट); हाच जड-निसर्गाचा सिद्धांत येथें प्रभावी ठरला आहे. प्राणिमात्रांची जगण्या-

साठीं धडपड चाललेली असते. त्यासाठीं त्याला निसर्गांतून पोषक द्रव्य घ्यावें लागतें व विध्वंसक परिस्थितीशीं झगडावें लागतें. पोषक द्रव्यें मिळविणें व विध्वंसक परिस्थितीस तोंड देणें यासाठीं कराव्या लागणाऱ्या झगड्यांत कोट्यवधि जीवांचा नित्य फडशा पडत असतो. डार्विनच्या मतें, झगड्यांत पराभूत होणाऱ्या प्राण्यांचा संहार होत असतांच प्रतिकूल अवस्थेशीं झगडून पोषक द्रव्यें मिळविण्यासाठीं अवश्य अशीं इंद्रियें ज्या प्राण्यांना निर्माण होतात, त्या प्राण्यांची त्या इंद्रियांमुळें उच्च उच्चतर जातींत उत्क्रांति होत जाते. याच उत्क्रांतिक्रमांत प्राण्यास मेंदू उत्पन्न होऊन मन, बुद्धि, अहंकार वगैरे मानसिक अथवा आत्मिक गुण निर्माण होतात.

डार्विननें प्राण्यांच्या विकासक्रमाचा हा सिद्धांत मानवजातीपर्यंत आणून सोडला. मार्क्सनें तोच सिद्धांत मानवी व्यवहारास लावून मानवविकासाचा सिद्धांत मांडला. येथें हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, मार्क्सला डार्विनचा विकासवाद मुळींच माहीत नसतांही त्याच्याच-सारखी विचारसरणी त्यानें स्वतंत्रपणें मानवसमाजास लावून दाखविली. डार्विनचा विकासवादावरील 'ऑरिजिन् ऑफ् दि स्पेसीज्' ( जीवकोटीचें मूळ) हा ग्रंथ सन १८५९ त प्रथम प्रसिद्ध झाला. त्याच सालीं मार्क्सचा ' क्रिटिक ऑफ् पोलिटिकल इकॉनमी ' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला असून त्याच्या प्रस्तावनेंतच मार्क्सनें आपला भौतिकवादाचा सिद्धान्त मांडला आहे. ( परिशिष्ट [ १ ] पहा ). त्यापूर्वीं दहा वर्षें लिहिलेल्या 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो', 'पॉव्हर्टी ऑफ फिलॉसफी' वगैरे ग्रंथांतही मार्क्सनें आपला हा सिद्धान्त मांडण्यास सुरुवात केली होती.

## मनुष्य व मनुष्येतर

मनुष्येतर प्राण्याला सृष्टीशीं झगडण्यास दांत, दाढा, चोंचा,

पंख वगैरे नैसर्गिक अवयव असतात. पण माणूस हा शारीरिक अवयवांनीं सृष्टीशीं झगडण्याचे कामीं अगदींच दुबळा आहे. पण उलट, सृष्टींत त्याच्या चरितार्थास अवश्य असणाऱ्या वस्तु इतर प्राण्यांना जशा आयत्या सिद्ध अवस्थेंत मिळतात तशा माणसास मिळत नाहींत. जनावरें गवत खातात, पक्षी फळें किडे खातात, पण माणसास शेतांत अन्न पिकवून तें शिजवून मग खातां येतें. शरीराची दुर्बलता माणूस आतां बुद्धिबलानें भरून काढतो. एकेक व्यक्ति या नात्यानें माणूस हा सृष्टीपुढें अगदीं दुबळा आहे. म्हणून माणूस कळप करून राहतो व समुदायानें सृष्टीशीं झगडतो. मनुष्येतर सृष्टींतही हरणें, हत्ती वगैरे जनावरें, कळप करून राहतात खरीं; पण या जनावरांचा कळप म्हणजे नुसता घोळका असतो, तर माणसांच्या कळपांत संघटना असते. संघटनाबल ही एक नवीच शक्ति माणसानें निर्माण केली आहे. वाघ, सिंह आपापली शिकार व्यक्तिशः आपणच मारून खातात. पण हरणें कळप करून राहिलीं तरी त्यांचें गवत व्यक्तिशः त्यांना मिळवितां येतें. वाघापासून अथवा सिंहापासून हरणें कळप करून आपलें संरक्षण करूं शकत नाहींत. आणि संघटित कळप करून शत्रूवर हल्ला करणें तर मनुष्येतर प्राण्यांना फारसें साधलेलें नाहीं. माणसानें बुद्धिबलानें हें संघटनाबल मिळविलें आहे. इतकें कर्तृत्व साधण्यापूर्वीं लक्षावधि मानवजात सृष्टीशीं झगडतां झगडतां ठार झाली आहे. सृष्टीवर प्रभुत्व गाजविण्याचें व सृष्टीला चरितार्थाचे कामीं लावण्याचें कर्तृत्व ईश्वरानें अथवा हेगेलच्या 'कल्पने'नें सर्व माणसांना दिलेलें नसून, ज्यांच्या ठिकाणीं हें कर्तृत्व आलें नाहीं ते मानववंश नष्ट झाले. तसेंच, एकदां असलेलें हें कर्तृत्व ज्यांच्या ठिकाणीं पुढें राहिलें नाहीं तेही मानववंश पुढें नष्ट झाले.

## अति-प्राचीन माणूस

अगदीं प्राचीन काळापासून माणसांच्या जमावानें शिकारीची पद्धतशीर कोंडी करून शिकार ठार करण्याची कला संपादिली. जिवंत प्राण्याचें मांस हेंच माणसाचें फार प्राचीन काळीं अन्न होतें. अशा अन्नाची शिकार करण्याचे निमित्तानेंच प्रथम माणसानें आपल्या टोळ्यांची संघटना केली. या शिकारीच्या निमित्तानें टोळ्या-टोळ्यांचीं भांडणें होत. शिकार म्हणून मारलेला एक डुक्कर कोणीं मारला व त्याचें प्रेत कोणाच्या मालकीचें या मुद्द्यावर हिमालयाच्या अरण्यांत अर्जुन व एक भिल्ल यांचे दरम्यान युद्ध झाल्याची कथा महाभारतांत आली आहे. अशीं टोळ्यांचीं युद्धें यशस्वीपणें करतां यावीं यासाठीं टोळ्या आपले नेते निवडीत अथवा एखादा उत्तम लढवय्या टोळींतील सर्वांवर प्रभाव गाजवून आपण नेता होत असे. या टोळ्या फिरत्या असत. चांगली शिकार ज्या प्रदेशांत असे त्या प्रदेशांत त्या राहत. तेथील शिकार संपली कीं तो मुलख सोडून जात. शिकार चांगली असेल असे प्रदेश आपल्या वहिवाटींत असावे अशासाठींही टोळ्याटोळ्यांचे लढे होत. सारांश, युद्ध ही 'संस्था' अतिप्राचीन आहे व तिचें एक शास्त्र अतिप्राचीन कालापासून निर्माण होऊन विकासत आहे; हें खरें असलें तरी, चरितार्थ-संपादनाचें एक महत्त्वाचें साधन म्हणजे धनोत्पादनाचा एक प्रकार याच नात्यानें त्याचें अस्तित्व व प्रगति घडली आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

'मनुष्य हा हत्यार करणारा प्राणी आहे' असें डॉ. फ्रॅंक्लिननें म्हटलें आहे यांत फार अर्थ आहे. शिकार करण्यासाठीं, झाडावरील फळें पाडण्यासाठीं, शत्रूवर हल्ला करण्यासाठीं माणसानें झाडांच्या फांद्यांचा, दगडांचा वगैरे उपयोग केला. हेच दगड अणकुचीदार घासून, त्यांना

भोंकें पाडून व त्यांत झाडाच्या फांद्या घालून कुऱ्हाडी, भाले यांसारखीं प्रहार करण्याचीं हत्यारें माणसानें तयार केलीं. वाघसिंहाप्रमाणें नुसत्या शरीरावर सृष्टीशीं झगडण्यासाठीं समर्थ अशीं इंद्रियें माणसास नव्हतीं. ती उणीव माणसानें हत्यारें करून भरून काढली. पण हत्यारें करणें एवढेंच माणसाचें वैशिष्ट्य नसून, वर सांगितल्याप्रमाणें नेता निवडून अथवा पत्करून व त्याच्या नेतृत्वाखालीं संघटना आणि शिस्त पत्करून राजकीय समाज निर्माण करणें हेंही माणसाचें वैशिष्ट्य आहे असें ॲरिस्टॉट्लनें फ्रँक्लिनच्या फार पूर्वीं दर्शविलें आहे. हत्यारें करणें व राजकीय संघटना स्थापणें या दोन्ही गोष्टी माणसाच्या धनोत्पादन-प्रकाराचाच भाग होत असें मार्क्स सांगतो.

या धनोत्पादन-कार्यांतच माणसांचीं आर्थिक नातीं उत्पन्न होतात असें मार्क्सचें मत आहे तें फार महत्त्वाचें आहे. नेता व अनुयायी हें निर्माण झालेलें नातें याच प्रकारचें आहे. जी शिकार सर्व टोळीनें अथवा त्यांतील कांहीं व्यक्तींनीं करावयाची तिचा उपभोग सर्व टोळीनें घ्यावयाचा, टोळींतील असमर्थांनाही तिचा उपभोग घेतां येत असे, म्हणजे उत्पन्न धनावर त्या वेळीं भोगवट्याचे बाबतींत सामुदायिक मालकी असे. 'धनोत्पादनाचे श्रम ज्यांना जितके शक्य असतील तितके त्यांनीं करावे आणि उत्पन्न झालेल्या धनाचा उपभोग ज्याला जितका घेतां येईल तितका त्यानें घ्यावा ' हें कम्युनिझम्चें प्रसिद्ध तत्त्व त्या अतिप्राचीन काळीं अमलांत असावें असें दिसतें. धनाची सामुदायिक मालकी हें उत्पादन-नातें परस्पर-माणसांत या वेळीं होतें. उत्पादन-प्रकारास हें नातें अवश्य होतें म्हणून यास उत्पादन-नातें ( प्रॉडक्शन्-रिलेशन ) म्हणावयाचें. अशा टोळ्यांच्या समाजांत विवाहसंस्था व्यवस्थित झालेली नव्हती. अनेक स्त्रिया व अनेक पुरुष यांचे संबंध सरमिसळ असत. पण स्त्रियांच्या

पायीं टोळयांत अंतःकलह होऊं लागल्यानें टोळीच्या नेत्याला कांहीं तरी शिस्त हळूहळू निर्माण करावी लागली असली पाहिजे.

**मालकी हक्काचा जन्म**

शेतीचा शोध ज्या काळीं व ज्या मुलुखांत लागला, तेथील टोळ्या त्या काळीं स्थिर स्वरूपाचें जीवन घालवूं लागल्या असाव्या. शिकारी टोळ्यांचे वेळेपेक्षां या शेतीच्या वसाहतींतलें जीवन अधिक विरळ होणें स्वाभाविक होतें. ज्या शेतीच्या क्षेत्रांत जेवढ्या जमावाची गुजराण होई तेवढींच माणसें त्या क्षेत्रांत राहणें स्वाभाविक होतें. या काळांत स्त्रियांवर पुरुषानें स्वामित्व स्थापून विवाहसंस्था निर्माण केली. शेतीच्या उत्पादनाच्या प्राथमिक अवस्थेंत शेतीची उत्पादन-कला मागसलेली असल्यानें पीक कमी येई. यामुळें शिकार व शेती या दोहोंवरही माणसास गुजराण करावी लागे. मारलेली शिकार व उत्पन्न केलेलें धन खाऊन, वापरून फस्त करावें लागे. हत्यारें, बीं-बियाणें जतन करून ठेवावीं लागत. पण त्यांचा सामुदायिक वापर या प्राथमिक अवस्थेंत अवश्यच होता. पण शेतीची जसजशी प्रगति होत गेली तसतशा टोळ्या फुटत गेल्या आणि वैवाहिक बंधनांनीं युक्त अशीं कुटुंबें निमार्ण झालीं. उपभोगिल्यानंतर उरूं लागलेल्या धनावर तें पुन्हा हवें तेव्हां उपभोगण्याचा हक्क माणसास हवाहवासा वाटूं लागला. यामुळें धनाच्या मालकीची संस्था निर्माण झाली. सामुदायिक मालकीच्या जागीं खाजगी मालकी उत्पन्न झाली. हा पालट उत्पादन-नात्यांतच झाला. आणि तो उत्पादन-प्रकाराच्या गरजेमुळेंच उत्पन्न झाला होता. शेतींत केलेल्या मेहनतीचा भोगवटा आपला आपणांस मिळावा या इच्छेनें जमिनीच्या मालकीची कल्पना निर्माण झाली. आणि कांहीं जमिनी खाजगी मालकीच्या, तर बाकीच्या सार्वजनिक

मालकीच्या, अशी वांटणी एकेका वसाहतींत सुरू झाली. वैवाहिक बंधनांनीं निर्माण झालेल्या कुटुंबांना या मालकीच्या जमिनी मिळूं लागल्या. गुरांचीं खिल्लारें पाळण्याच्या पद्धतीनें या मालकी संस्थेची दृढता आणखी वाढली.

## संस्कृतीचें मूळ कोणतें

दया, प्रेम, आपुलकी, न्याय, चालीरीति, वगैरे जीं मानवी संस्कृतीचीं चिन्हें, तीं या काळांत हळूहळू वाढत होतींच. पण धनोत्पादनाच्या मुख्य कर्मास उपकारक होईल अशा प्रकारें त्यांची उत्पत्ति, वाढ, ऱ्हास व नाश होत असे. "राजकीय, सामाजिक व नैतिक संस्था व व्यवस्था यांना धनोत्पादनाच्या शक्तींनींच विशिष्ट आकार येत असतो. व्यक्तीच्या व समाजाच्या इच्छा आणि वासना यांना उत्पादन-शक्तींना अनुकूल असेंच स्वरूप प्राप्त होतें. व्यक्तींच्या ज्या इच्छा व समजुती धनोत्पादनशक्तीस अपायकारक असतात, त्या नाश पावतात. धनोत्पादनास अनुकूल अशी ज़ी भौतिक परिस्थिति असते, तींतच मनुष्य जगतो व अर्थात् त्याचेच छाप त्याच्या मेंदूवर उमटतात. माणसाच्या मानसिक वातावरणावरही या उत्पादन-परिस्थितीचा परिणाम घडत असून त्याच्या चालीरीति, श्रद्धा, प्रयत्न ध्येयें या सर्वांवर त्याच्या परिस्थितीचा ठसा उमटलेला असतो. ही परिस्थिति माणसाच्या धनोत्पादन-प्रकारानें धनोत्पादनाच्या कार्यास आवश्यक अशी बनविलेली असते. मनुष्याच्या अंतःकरणांत असलेली दयाबुद्धि ही कांहीं तो ईश्वराचा पृथ्वीवरील प्रतिनिधि आहे म्हणून त्याच्या ठिकाणीं निर्माण झालेली नाहीं. सृष्टीशीं झगडण्यासाठीं माणसांचें जें परस्पर-सहकार्य होणें अवश्य आहे त्यासाठीं दया व न्याय या गुणांची आवश्यकताच आहे. प्रत्येकाला त्याच्या श्रमाचें फळ नित्रस्तपणें भोगतां आलें पाहिजे ही इच्छा व तदनुसार रूढि,

कायदा वगैरे समाजांत उत्पन्न होऊन मान्यता पावतात. माणसांच्या सवयी, चालीरीति, रूढि, राजकीय संस्था या सर्वांना आर्थिक उत्पादनास अनुकूल अशा प्रकारें उत्पत्ति, स्थिति, आकार, ऱ्हास व नाश पत्करावा लागतो.''

गुलामगिरी ही मानवी इतिहासांत मोठी हीन अवस्था होय असें आज आपण मानतों. माणसानें माणसाला गुराढोरांप्रमाणें विकत घ्यावें, विकावें, चाबकानें मारावें, हा प्रकार मानवी श्रेष्ठपणाला हीनता आणणाराच आहे. मानवी श्रेष्ठतेला कलंक लावणारी जी 'युद्ध' नांवाची आणखी एक संस्था, तिनेंच गुलामगिरीला जन्म दिला असें इतिहास सांगतो. युद्धामध्यें पकडून आणलेले जे कैदी त्यांना गुलाम म्हणून राबविण्यांत येई व त्यांची खरेदी-विक्री होई. पण खरोखर गुलामगिरी ही केवळ युद्धामुळेंच उत्पन्न झाली असें नव्हे. आर्थिक उत्पादन-प्रकारांतूनच ती जन्म पावली. त्याच्याशींच ती निगडित होती आणि आर्थिक दृष्ट्या निरुपयोगी व अपायकारक ठरली तेव्हांच गुलामगिरी नाश पावली, हें इतिहास थोडा सूक्ष्मपणें पाहिल्यास कळून येईल. 'युद्धसंस्था' ही धनोत्पादनाच्या खटा-टोपांतूनच कशी जन्मास आली हें वर सांगितलेंच आहे. हीं युद्धें झालीं म्हणजे प्रतिपक्षाचे जे कैदी पकडले जात, त्यांना पोसण्यास पुरेसें अन्न नसल्यानें त्यांच्या सररहा कत्तली करण्याचीच चाल प्राचीन काळीं होती. पण पुढें शेतीची मशागत व गुरें पाळण्याचा धंदा यांत सुधारणा झाली तेव्हां दरेक माणूस आपल्या कष्टांनीं आपल्या गरजेहून अधिक धनोत्पादन करण्यास समर्थ झाला. तेव्हां लढाईत सापडलेल्या कैद्यांना ठार न मारतां, गुराप्रमाणें त्यांना चाबकानें मारून अथवा धाक दाखवून त्यांना धनोत्पादनकार्यास जुंपण्यांत येऊं लागलें. या गुलामगिरीनें मानवाची धनोत्पादक

शक्ति पुष्कळच वाढली व तिचा माणसाच्या संस्कृति-उत्कर्षासही फायदा झाला. ग्रीसची सर्व संस्कृति व वैभव या गुलामगिरीवर आधारलेलें होतें.

## गुलामगिरी ही सुव्यवस्था ?

गुलामगिरी हा समाज-सुव्यवस्थेचा आधारस्तंभ होय असें विचित्र मत ॲरिस्टॉटल्नें ठासून प्रतिपादिलें आहे. " आज दोन हजार वर्षांच्या अंतरावरून आपणांस विचित्र व क्रूर दिसणारें हें मत ॲरिस्टॉटल्सारख्या तत्त्वज्ञानें सांगावें यांतील रहस्य उकलून पाहिलें पाहिजे. या रहस्याचा उलगडा असा:—यंत्रपूर्वकालीं धनोत्पादनाचीं हत्यारें हीं बरींच अपूर्णावस्थेंत होतीं. त्या कालीं जिवंत राहण्याची तरतूद करण्यासाठीं मनुष्यास सृष्टीशीं फार कष्टानें झगडावें लागे. जिवाला यातना होतील इतकें झगडण्यास कोणी झाला तरी स्वखुषीनें कसा तयार होईल ? म्हणून बलानें व शहाणपणानें अधिक समर्थ अशीं थोडीं माणसें दुर्बल व मूर्ख अशा पुष्कळांस सक्तीनें संपत्ति उत्पन्न करण्याचे कामीं राबवीत ! हाच गुलामगिरीचा इत्यर्थ आहे. या बहुसंख्य गुलामांनीं निर्माण केलेल्या संपत्तीपैकीं त्यांना काम करण्यास व भावी पिढीचे गुलाम निर्मिण्यास सामर्थ्य राहील एवढी बेताची हिणकस संपत्ति गुलामांना वाटल्यानंतर, उरलेली उच्च दर्जाची संपत्ति गुलामांना सक्तीनें राबवणारे शहाणे व ग्रीक नागरिक यांच्यांत वांटली जाई. ग्रीक नागरिकांत धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, राज्यशास्त्र यांचा उदय झालेला असून असा उदय हेंच आज आपण आध्यात्मिक, मानसिक अथवा बौद्धिक उन्नतीचें व सांस्कृतिक उत्कर्षाचें लक्षण मानतों. ग्रीक नागरिकांच्या या उन्नतीचें कारण असें होतें कीं, कष्टानें देह जमिनीवर गळून पडेपर्यंत गुलाम शेती वगैरे उत्पादनाचे कष्ट

करीत व या कष्टाचीं गोड फळें ग्रीक नागरिकांना कष्टाशिवाय व हुकमतीच्या जोरावर उपभोगण्यास मिळत. यामुळें चांगल्या दर्जाचें अन्नवस्त्र, हुकमत अथवा प्रभुत्व गाजविण्याची सोय व जरूरी आणि निष्काळजीपणानें स्वस्थ बसतां येईल अशी पुष्कळशी फुरसत या गोष्टी ग्रीक नागरिकांना मिळत. (१) सुबत्ता, (२) प्रभुत्व आणि (३) फुरसत या त्रयीनेंच सांस्कृतिक उन्नति होत असते; आणि सृष्टीशीं झगडून संपत्त्युत्पादन करणें जेव्हां अतोनात कष्टाचें काम होतें तेव्हां बहुसंख्यांनीं असे अतोनात कष्ट करून अल्पसंख्यांना संस्कृतीची ही साधनत्रयी पुरविल्याशिवाय अल्पसंख्यांना तो संस्कृतिविकास मिळणें अशक्यच होतें. ग्रीकांची संस्कृति अशा प्रकारें गुलामगिरीवर आधारलेली होती. म्हणून संस्कृतीचा उत्कर्ष होण्यास गुलामगिरी अवश्य आहे असें ॲरिस्टॉटल्नें प्रतिपादिलें."

यावरून गुलामगिरी ही एक सुधारलेला धनोत्पादन-प्रकार म्हणूनच अस्तित्वांत आली व तिनें मानवसंस्कृतीच्या उत्कर्षांत भर घातली हें उघड दिसतें. पुढें कालांतरानें गुलामगिरी नाश पावली. पण ख्रिस्ती धर्म व राजकीय लोकशाही यांच्या शिकवणीमुळें माणसाची ध्येयदृष्टि बदलली म्हणून गुलामगिरी नष्ट करण्यांत आली, असें जें प्रतिपादण्यांत येत असतें, तें खरें नसून आर्थिक उत्पादनप्रकार या नात्यानेंच गुलामगिरी मागें पडून नाश पावली असें थोड्या विचारांतीं दिसून येतें.

## ख्रिस्तावर सूड

गुलामगिरीवर ख्रिस्तानें फार मोठा हल्ला चढवला. सर्व माणसें ईश्वराचीं लेंकरें आहेत व या अर्थानें सर्व माणसें सारख्या दर्जाचीं आहेत असें त्याचें म्हणणें होतें. ख्रिस्ती धर्माचा प्रसार युरोपांत खूप

झपाट्यानें झाला. पण ख्रिस्ताची शिकवण अमलांत कोणीच आणीत नव्हतें. 'एका गालफडांत कोणीं मारली तर दुसरें गालफड पुढें करावें' या ख्रिस्ताच्या शिकवणुकीचे अनुयायी ख्रिस्ताचा क्रॉस दंडावर व छातीवर बांधून, इतरांचीं दोन्ही गालफडें फोडीत होते. ख्रिस्ताच्या मृत्यूमागून सहाशें वर्षांनंतरही रोम या ख्रिस्ती साम्राज्याच्या राजधानींत गुलामांचा फार मोठा बाजार भरे. त्या बाजारांत ख्रिस्ताचा प्रतिनिधि म्हणजे पोप ( ग्रेगरी दि ग्रेट ) हा स्वतः गुलाम खरेदी करण्यासाठीं जाई. एलिझाबेथच्या काळीं ब्रिटिश जहाज कंपन्यांनीं आफ्रिकेंतून नीग्रोंना पकडून आणून त्यांना अमेरिकेंत गुलाम म्हणून विकण्याचा व्यापार फार मोठ्या प्रमाणांत वाढविला होता. १५०८ पासून १८६० पर्यंतच्या साडेतीनशें वर्षांत दीड कोटि आफ्रिकन नीग्रोंना अमेरिकेंत नेऊन गुलाम म्हणून विकण्यांत आलें. त्यांना नेतांना प्रवासांत जवळजवळ इतकींच माणसें मेलीं. लिव्हरपूल, भावी काळांत जें इतकें भरभराटलें, त्याचें प्राथमिक भांडवल गुलामांच्या व्यापारावरच उभारलें होतें. जॉन हॉकिन्स हा ब्रिटिश जहाज़वाला गुलामांचा व्यापार करूनच कोट्याधीश झाला. गुलामांची नेआण करण्याच्या त्याच्या जहाजांच्या एका तांड्याचें नांव 'जीजस् ख्राइस्ट' होतें. गुलामगिरी नाहींशी करा म्हणणाऱ्या ख्रिस्ताचें नांव त्याच्याच अनुयायांनीं गुलामांचा व्यापार करणाऱ्या जहाजांना दिलें! यापेक्षां ख्रिस्ताचा त्याच्या अनुयायांनीं अधिक क्रूर असा कोणता सूड उगविला असता ?

युरोपांत प्रॉटेस्टंट व रोमन कॅथॉलिक या ख्रिस्ती धर्मपंथांत जेव्हां झगडे सुरू झाले तेव्हां फ्रान्स व हॉलंड येथील प्रॉटेस्टंट विणकर, रोमन कॅथॉलिक राज्यकर्त्यांच्या छळास कंटाळून इंग्लंडांत आले. तेव्हांपासून इंग्लंडांत स्वदेशी धंद्यांत बरकत येऊं लागली. आणि

गुलामांच्या व्यापारांतलें भांडवल देशी कारागिरीकडे वळून हळूहळू गुलामांच्या व्यापाराला ओहोटी लागली. इंग्लंडांत 'रेफर्मेशन' ऊर्फ प्रॉटेस्टंट धर्मपंथाच्या स्थापनेची जी चळवळ झाली तीही इंग्लंडांत व्यापारीवर्गाचें वर्चस्व वाढूं लागल्यामुळेंच झाली.

## गुलामगिरी गेली, सरंजामशाही आली

सरंजामशाहीच्या उदयामुळेंही गुलामगिरी मागें पडली. ही सरंजामशाही ही ख्रिस्ती धर्माच्या शिकवणुकीनें जन्मास आली नव्हती. शेतीची सुधारणा झाली, नवीन नवीन मुलख शेतीच्या कक्षेंत आले तेव्हां व्यक्तीच्या कष्टानें व्यक्तीच्या चरितार्थाच्या गरजेहून अधिक धन निर्माण होऊं लागलें; तेव्हां हे कष्ट सक्तीनें करून घेण्यासाठीं, शत्रूच्या पकडलेल्या सैनिकांची कत्तल करण्याऐवजीं त्यांना गुलाम म्हणून राबविण्यांत येऊं लागलें, ही गुलामगिरीची जन्मकथा मागें सांगितलीच. याच क्रमानें पुढें गुलामगिरी नाशही पावली. जो कष्ट करील त्याला त्याच्या धनांतला वांटा मिळेल; त्यांतून त्यानें संचय केल्यास त्याच्या भोगवट्याचा हक्क त्यालाच राहील अशी खात्री असल्यास मनुष्य अधिक उत्साहानें काम करतो हा अनुभव गुलामांच्या मालकांना येऊं लागला. लढाईंत मालकासाठीं लढून त्याला विजय मिळवून देऊन अनेक गुलामांनीं आपलें स्वातंत्र्य संपादन करून घेतलें व मालकांकडून मशागतीसाठीं जमिनी मिळविल्या. या जमिनींत हे माजी गुलाम स्वतांच्या फायद्यासाठीं जें धन निर्मीत तें गुणानें व परिमाणानें श्रेष्ठ असून त्यामुळें एकंदर समाजाचें धन वाढे व व्यापारधंद्यास बरकत येई; यामुळें हळूहळू अधिकाधिक नापिक जमिनी वहिवाटींत आणणें अवश्य व शक्य होऊं लागलें. तेव्हां गुलामांच्या मालकांनीं गुलामांना शारीरिक स्वातंत्र्य देऊन वंशपरंपरा आपले शेतकरी

नेमले. या जमीन-मालकांच्या जमिनींत सुपीक व नापीक जमिनी असत. पैकीं शेतकऱ्यानें आठवड्यांतून कांहीं दिवस सुपीक जमिनीवर कष्ट करून त्यांतील सर्व धन मालकास द्यावें आणि या कष्टाच्या मोबदला आठवड्यांतील उरलेले दिवस मालकाच्या नापीक जमिनींत कष्ट करून त्यांतील सर्व धन स्वत:साठीं ठेवावें, अशी प्रथा या जमीन-मालकांनीं पाडली. यामुळें स्वतंत्र झालेला हा गुलाम जास्त कष्ट करूं लागला आणि एकंदर समाजाची व जमीन-दारवर्गाचीही संपत्ति वाढली. माणसाच्या उत्पादन-सामर्थ्याच्या वाढीच्या क्रमांत गुलामगिरी हा उत्पादन-प्रकार व मालक-गुलाम हें उत्पादन-नातें जन्मास आलें आणि तेंच सामर्थ्य आणखी वाढतां वाढतां मालक-गुलाम या नात्याची चौकट वाढीच्या वेगांत तुटली. गुलाम-गिरी नाश पावली आणि सरंजामशाही म्हणजे सरंजामदार-भूदास हे उत्पादनसंबंध निर्माण झाले.

## अमेरिकेंत गुलामगिरी कशी नष्ट झाली

गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत अमेरिकेंतील ( यू. एस्. ए. ) उत्तरे-कडलीं संस्थानें व दक्षिणेकडलीं संस्थानें यांमध्यें घनघोर रणसंग्राम होऊन उत्तरेकडील संस्थानांचा विजय झाला व उत्तर-दक्षिण विभागां-चें लोकशाहीप्रधान असें एकराज्य होऊन गुलामगिरी नष्ट कर-ण्यांत आली. या वेळचा अमेरिकेचा अध्यक्ष आब्राहाम लिंकन हा गुलामगिरी नष्ट करणारा थोर पुरुष म्हणून इतिहासानें गौरविला आहे. पण ही यादवी व गुलामगिरीचा नाश यांचे बुडाशींही आर्थिक उत्पादन-प्रकारांचा कलह असल्याचें दिसून येतें. युरोपिअन जहाज कंपन्या आफ्रिकेंतून नीग्रो लोकांना अमेरिकेस नेऊन गुलाम म्हणून विकीत त्याचप्रमाणें युरोपांतील असंख्य गोरे लोकही प्रत्यहीं या ज़हाजांतून अमेरिकेस वसाहतीस जात. युरोपीय

वसाहतवाल्यांनीं प्रथम पूर्व व उत्तर भागांत वसाहत केली व नंतर ते प्रथम दक्षिणेकडे व मागाहून पश्चिमेकडे पसरत चालले. युरोपीय गोरे मजूर जसे जसे मूळ वसाहतवाल्यांना भरपूर मिळूं लागले, तसतसे काळ्या व अडाणी नीग्रोंची उत्पादनक्षमता कमी असल्यानें उत्तरेकडील वसाहतवाल्यांनीं दक्षिणेकडील वसाहतवाल्यांना हे नीग्रो गुलाम विकून टाकले. हे गुलाम खरेदी करून या दक्षिण-वाल्यांनीं कापसाच्या धंद्यांत नवी यंत्रसामुग्री घातली. वाहतुकीची सुधारणा करून गुलामांच्या श्रमावर कापसाचीं प्रचंड शेतें आपल्या मालकीचीं केलीं. दक्षिणेंतील संस्थानांतल्या एकषष्ठांशाहून कमी लोकांनीं सगळीं जमीन लुबाडून आपलीच सत्ता सर्व दक्षिणभर स्थापली होती. उत्तरेकडील संस्थानांत हळूहळू गुलाम नाहींसेच झाले व स्वतःचें घर व स्वतःची शेती असलेलीं हजारों कुटुंबें तेथें निर्माण झालीं. तेथें वयांत आलेल्या सर्वांना मताधिकार मिळाला. उलट दक्षिणेंतील बड्या शेतीवाल्यांनीं व गुलामांच्या मालकांनीं सर्व राजकीय सत्ता आपल्याच काबूंत ठेवली. हळूहळू दक्षिणेंतील बडे जमीन-मालक आणि उत्तरेंतील लहान लहान मालक शेतकरी यांच्या कापूस-मालांत, रेल्वेनें मालवाहतूक सर्वत्र होऊं लागल्यामुळें, चढाओढ सुरू झाली. आणि मोठ्या जमीन-मालकानें सहजच लहान मालकाला खुल्या बाजारांत मागें रेटलें अथवा खाऊन टाकलें. हे उत्तरेकडचे व दक्षिणेकडचे शेतकरी पश्चिमेकडे पसरत चालले तसतशा अधिक सुपीक जमिनी बड्या जमीन-मालकांनीं बळकावल्या; आणि नापीक जमिनी उत्तरेकडील लहान शेतकऱ्यांना पत्कराव्या लागल्या. या चढाओढींत दक्षिणेंतला बडा शेतकरी गुलामगिरीच्या जोरावर अधिकाधिक श्रीमंत होऊं लागला, तर उत्तरेंतला लहान शेतकरी अधिकाधिक गरीब होऊं लागला. उत्तर व दक्षिण यांचे दरम्यान आलेली ही तेढ बिनतोड

होऊन अखेर तिचें पर्यवसान युद्धांत झालें व उत्तरेचा विजय होऊन अमेरिकेंत गुलामगिरी नष्ट करण्यांत आली. उत्तरेकडील संस्थानांनीं दक्षिणेंतील बडी जमीनदारी नष्ट करण्यासाठीं, तिचा आधार अशी जी गुलामगिरी ती नष्ट केली.

गुलामगिरी-नाशाचें कारण अशा प्रकारें दोन आर्थिक उत्पादन-प्रकारांच्या झगड्यांत होतें. अर्थात् लिंकन व त्याच्यासारखे अनेक थोर पुरुष गुलामगिरीच्या विरुद्ध होते हें खरें; पण लिंकनचा यादवी-लढ्यांतला मुख्य कटाक्ष गुलामगिरीनाश हा नसून, दक्षिणेकडील संस्थानें गुलामगिरी टिकविण्यासाठीं मध्यसरकारचा अंमल झुगारून देण्यास तयार झालीं होतीं, त्यांना मोडून काढून एका मध्यसत्तेखालीं अमेरिकेचें संयुक्तराज्य स्थापणें हा होता. ही गोष्ट उत्तरेकडील संस्थानांच्या पाठिंब्यानेंच करावयाची असून, उत्तरेकडच्या संस्थानांना आर्थिक फायद्यासाठीं गुलामगिरी मोडायची होती. उत्तरेचा विजय झाल्यानें लिंकन व उत्तरेकडील संस्थानें या दोघांचेही हे हेतु सिद्ध झाले. पण लिंकनचा गुलामगिरी-नाशाबाबत आग्रह नव्हताच. लिंकन लिहितो, “ गुलामगिरी नष्ट करणें शक्य न झालें तर संयुक्त-राज्यही टिकवावयाचें नाहीं अशा मताचे जे लोक आहेत त्यांचें माझें जमणार नाहीं. या युद्धांत माझा मुख्य हेतु गुलामगिरी टिकविणें अथवा नष्ट करणें हा नसून, संयुक्तराज्य टिकविणें हा आहे. गुलामगिरी मुळींच नाहींशी न करतां संयुक्तराज्य टिकवितां आलें असतें तरीही मीं तें टिकविलें असतें.” गुलामगिरीच्या नाशासंबंधानें “ गुलामगिरी ही कुणाच्याही उपदेशानें अथवा मतप्रसारानें नष्ट झाली नसून आर्थिक कारणांनींच ती नष्ट झाली ” असें जॉन मोर्ले या सुप्रसिद्ध पंडिताचेंही मत आहे. ( ‘ डॉक्ट्रिन ऑफ लिबर्टी ’ )

## भांडवलशाहीची जन्मकथा

सरंजामशाहीचा उदय आर्थिक उत्पादनपद्धतीच्या सुधारणेच्या क्रमांतच कसा झाला हें मागें संक्षेपानें सांगितलेंच आहे. नंतरचा सरंजामशाहीचा अस्त व भांडवलशाहीचा उदय ही क्रांति मानवी इतिहासांत फार प्रचंड मानली गेली आहे. ही क्रांतिही केवळ बौद्धिक जागृति व लोकशाहीचा ध्येयवाद यामुळें झाली असें सांगण्याचा इतिहासलेखकांचा परिपाठ असतो. रोजर बेकन व फ्रॅन्सिस बेकन हे फार मोठे भौतिकवादी इंग्लंडांत होऊन गेले. त्यांनीं धार्मिक श्रद्धा ही मानवी पीछेहाटीचें व बुद्धिमूढतेचें फार मोठें कारण आहे असें प्रतिपादून सृष्टिधर्मांचें संशोधन करण्यासाठीं प्रत्यक्ष प्रयोग करावे आणि सृष्टिधर्मांचें संशोधन करून ते माणसानें आपल्या भौतिक उत्कर्षाचे कामीं लावावे असें मत प्रतिपादलें. पुढील काळांत इंग्लंड-फ्रान्समध्यें रूसो, व्हॉल्टेर, मॉंटेस्कू, स्मिथ, बेंथॅम, मिल वगैरे तत्त्ववेत्ते झाले. त्यांनीं लोकशाही व व्यक्तिस्वातंत्र्य यांचा पुरस्कार केला; इंग्लंडांत व युरोपांत धार्मिक जागृतीचें युग सुरू होऊन लोक विवेकवादी व भौतिकवादी बनले. वैचारिक क्रांतीमुळेंच जगाचा हा सर्व पालट झाला हें अंशत: खरें असलें तरी विशिष्ट आर्थिक उत्पादन-प्रकाराच्या पार्श्वभूमीमुळेंच ही सर्व वैचारिक व सामाजिक क्रांति होऊं शकली हें इतिहास-निरीक्षणानें समजूत घेण्यासारखें आहे. सरंजाम-शाहींत आर्थिक विकास होतां होतां सरंजामदार-भूदास हे उत्पादन-संबंध या विकासास अपुरे पडून ते मोडले व भांडवलदार-मजूर हे नवे उत्पादन-संबंध आर्थिक विकासास अनुकूल म्हणून अस्तित्वांत आले. युरोपांत व जगांत गेल्या पांचशें वर्षांत झालेल्या या आर्थिक घडामोडींचें संक्षिप्त दिग्दर्शन येथें करूं.

पंधराव्या शतकाच्या मध्यापर्यंत लहान लहान खेडीं, त्यांत लहान लहान उद्योगधंदे व मालाची ऐनजिनसी देवघेव असा उत्पादन-प्रकार इंग्लंड, फ्रान्स व युरोपांतलीं इतर राष्ट्रें यांत होता. अनेक खेड्यांचे समूह हे एकेका सरंजामदाराच्या अखत्यारींत असत. या सरंजामदारांचीं म्हणजे जमीनदारांचीं कुळें जमिनीस वंश-परंपरा बांधलेलीं असत, म्हणून त्यांना भू-दास म्हणत. या सरंजामदारांचीं सैन्येंही होतीं. अशा अनेक सरंजामदारांचा प्रमुख म्हणजे राष्ट्रीय राजा हा सर्वांत बडा सरंजामदार असे. सरंजामदार हे नेहमीं आपसांत भांडत व राजाशींही भांडत. त्यांचीं स्वतंत्र सैन्यें असल्यानें राजावर त्यांचा वचक असे. पण परचक्रनिवारणासाठीं राजा हा नेता म्हणून त्यांना अवश्य वाटे व त्यास ते नष्ट करीत नसत.

## उत्पादन-विकासामुळें सरंजामशाहीचा नाश

हळूहळू खाणींतून धातु काढण्याच्या कलेंत, कापड विणण्याच्या कलेंत, नौकानयनांत, घड्याळें करण्याचा कलेंत वगैरे सुधारणा होत होती. छापण्याची कला युरोपांत आली. खगोल शास्त्रांतले मोठमोठे शोध लागून पृथ्वी गोल असल्याबद्दल शास्त्रज्ञांची खात्री झाली. व्हेनिसचे व्यापारी पूर्वीं पूर्व-भूमध्य समुद्रांतून आशिया खंडांतला माल आणून युरोपांत विकीत आणि गबर होत. त्यांच्याशीं पश्चिम-भूमध्य समुद्रांतले, अटलांटिक किनाऱ्यावरचे लिस्बन वगैरे ठिकाणचे जे पोर्तुगीज व्यापारी त्यांची स्पर्धा सुरू झाली. आणि पृथ्वी गोल आहे अशी खात्री झाल्यामुळें आशिया खंडास जाण्याचा स्वतंत्र मार्ग पश्चिम गोलार्धावरून काढण्याचे प्रयत्न अनेक खलाशी-वीरांनीं केले. याच प्रयत्नांपैकीं अमेरिकेचा शोध लावण्याचा कोलंबसाचा यशस्वी प्रयत्न इतिहासप्रसिद्ध आहे. वॉस्को-ड-गामानें आफ्रिकेस

वळसा घालून हिंदुस्तानचा किनारा गाठला आणि फर्डिनंड मॅगेलन यानें पॅसिफिक समुद्र ओलांडून पृथ्वीप्रदक्षिणा पुरी केली.

या समुद्रयानांनीं व नवीन मुलुखांच्या आणि त्यांना जाणाऱ्या नवीन वाटांच्या शोधांनीं बाजारांचें क्षेत्र अधिक वाढलें. अमेरिका खंडांत बोलिव्हिआ आणि मेक्सिको येथें सोन्याच्या व रुप्याच्या प्रचंड खाणी सापडल्या. या सोन्या-चांदीचा फार मोठा ओघ युरोपांत आला. आणि ऐनजिनसी देवघेवीऐवजीं नाण्यांची देवघेव होऊं लागली. यामुळें व्यापारास फार मोठें उत्तेजन मिळालें. हळूहळू जमीनदारवर्ग आपल्या जमिनींचा खंड पैशांत घेऊं लागले. शेतमालाला नगद मिळूं लागल्यानें जमीनदारवर्गाला शेती किफायतशीर वाटून लहान जमीनदार स्वतः शेतकरी होऊं लागले. शेती व गुरें पाळणें या धंद्यांतही विलक्षण प्रगति होऊन, खेड्यांतील लहान शेतकऱ्यांची जागा हळूहळू भांडवलदार शेतकऱ्यांनीं घेतली. खंडानें जमिनी घेऊन व भाड्यानें मजूर घेऊन जमिनी कसणारे भांडवलदार शेतकरी निर्माण होऊं लागले. इंग्लंडांतील अनेक खंडकरी यामुळें बेकार झाले. इंग्लंडांतील सरंजामशाहीचा मोड होण्यास या व्यापारप्रगतीनें फार मदत झाली. सरंजामदार हे आपापलीं सैन्यें घेऊन नेहमीं लढत यामुळें देशांत सदा अंदाधुंदी असे; ही परिस्थिति व्यापारधंद्यास अगदीं प्रतिकूल होती. म्हणून इंग्लंडांतील व्यापारी वर्गांनीं इंग्लंडचा राजा सातवा हेन्री यास सरंजामदारांचीं सैन्यें खालसा करून स्वतः अनियंत्रित राजा होण्याचा सल्ला दिला. या सरदारांचें राजावरील नियंत्रण या वेळीं कमी होऊन तो अनियंत्रित झालाही. राज्यशास्त्राच्या दृष्टीनें सकृद्दर्शनीं ही पीछेहाट अशी वाटते. पण अंदाधुंदी माजविणाऱ्या सरंजामदारांचीं सैन्यें राजानें खालसा केल्यानें देशांत स्वस्थता होऊन व्यापारधंद्यास फायदा झाला

म्हणून त्या वेळीं इंग्लंडची ही प्रगति झाली हें लक्षांत ठेवलें पाहिजे. पुढें राजांची सत्ता नियंत्रित करून भांडवलदारांनीं आपली सत्ता कशी स्थापली तें पुढें येईलच.

## हस्तव्यवसायाकडून यांत्रिक उत्पादनाकडे

या काळीं युरोपांत धंद्यांचे संघ असत त्यांना गिल्ड्स म्हणत. ज्या धंद्याचा संघ असेल त्या संघाखेरीज इतरांना त्या धंद्यांत शिरकाव करून घेण्यास बंदी असे. या धंदेवाल्यांजवळ शिकाऊ उमेदवार असत. त्यांचेकडून जवळजवळ फुकटांत खूप काम करून घेऊन धंदेवाले त्यांना पिळून घेत. हे संघ अगदीं जुन्या-पुराण्या पद्धतीनें धंदे करीत असून नवीन होणाऱ्या व्यापारवाढीस माल पुरविणें त्यांना उरकेना. हळूहळू व्यापाराच्या बरकतीनें गबर होऊं लागलेला धनिकवर्ग या धंद्यांत हात घालण्यासाठीं पुढें घुसला. सरकारकडून त्यांनीं गिल्डचे कायदे शिथिल करून घेतले. आणि स्वतःच्या पैशांनीं हत्यारें व जागा खरेदी करून मजुरांकरवीं धनोत्पादन करण्यास सुरुवात केली. अनेक मजूर एका भांडवलदाराच्या नेतृत्वाखालीं आल्यानें येथें श्रमविभागास अवसर मिळाला आणि सामुदायिक पद्धतीनें धन अधिक सुबक व स्वस्त निपजूं लागलें. इंग्लंड, हॉलंड व फ्रान्स या देशांत ही छोटी म्हणजे हस्तव्यवसायाची भांडवलशाही १६ व्या शतकाच्या मध्यापासून सुरू झाली. १८ व्या शतकाच्या मध्यानंतरही ही भांडवलशाही एकसारखी भरभराटत होती. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धांत यांत्रिक शोध लागूं लागले. वॅट, हार्ग्रीव्ह्ज्, रिचर्ड आर्कराइट, सॅम्युअल क्रॉम्प्टन, एडमंड कार्टराइट, जॉन हॉरॉक्स वगैरे यंत्रज्ञांनीं यांत्रिक धनोत्पादनांत क्रांति करून टाकली. वॅटच्या वाफेच्या पंपानें खाणींतून पाणी उपसून काढण्याचे कामांत नवेंच युग निर्माण केल्यानें लोखंड व कोळसा यांचा उपसा फार

वळसा घालून हिंदुस्तानचा किनारा गाठला आणि फर्डिनंड मॅघेलन यानें पॅसिफिक समुद्र ओलांडून पृथ्वीप्रदक्षिणा पुरी केली.

या समुद्रयानांनीं व नवीन मुलुखांच्या आणि त्यांना जाणाऱ्या नवीन वाटांच्या शोधांनीं बाजारांचें क्षेत्र अधिक वाढलें. अमेरिका खंडांत बोलिव्हिआ आणि मेक्सिको येथें सोन्याच्या व रुप्याच्या प्रचंड खाणी सापडल्या. या सोन्या-चांदीचा फार मोठा ओघ युरोपांत आला. आणि ऐनजिनसी देवघेवीऐवजीं नाण्यांची देवघेव होऊं लागली. यामुळें व्यापारास फार मोठें उत्तेजन मिळालें. हळूहळू जमीनदारवर्ग आपल्या जमिनींचा खंड पैशांत घेऊं लागले. शेत-मालाला नगद मिळूं लागल्यानें जमीनदारवर्गाला शेती किफायतशीर वाटून लहान जमीनदार स्वत: शेतकरी होऊं लागले. शेती व गुरें पाळणें या धंद्यांतही विलक्षण प्रगति होऊन, खेड्यांतील लहान शेतकऱ्यांची जागा हळूहळू भांडवलदार शेतकऱ्यांनीं घेतली. खंडानें जमिनी घेऊन व भाड्यानें मजूर घेऊन जमिनी कसणारे भांडवल-दार शेतकरी निर्माण होऊं लागले. इंग्लंडांतील अनेक खंडकरी यामुळें बेकार झाले. इंग्लंडांतील सरंजामशाहीचा मोड होण्यास या व्यापारप्रगतीनें फार मदत झाली. सरंजामदार हे आपापलीं सैन्यें घेऊन नेहमीं लढत यामुळें देशांत सदा अंदाधुंदी असे; ही परिस्थिति व्यापारधंद्यास अगदीं प्रतिकूल होती. म्हणून इंग्लंडां-तील व्यापारी वर्गांनीं इंग्लंडचा राजा सातवा हेन्री यास सरंजाम-दारांचीं सैन्यें खालसा करून स्वत: अनियंत्रित राजा होण्याचा सल्ला दिला. या सरदारांचें राजांवरील नियंत्रण या वेळीं कमी होऊन तो अनियंत्रित झालाही. राज्यशास्त्राच्या दृष्टीनें सकृद्दर्शनीं ही पीछेहाट अशी वाटते. पण अंदाधुंदी माजविणाऱ्या सरंजामदारांचीं सैन्यें राजानें खालसा केल्यानें देशांत स्वस्थता होऊन व्यापारधंद्यास फायदा झाला

म्हणून त्या वेळीं इंग्लंडची ही प्रगति झाली हें लक्षांत ठेवलें पाहिजे. पुढें राजांची सत्ता नियंत्रित करून भांडवलदारांनीं आपली सत्ता कशी स्थापली तें पुढें येईलच.

## हस्तव्यवसायाकडून यांत्रिक उत्पादनाकडे

या काळीं युरोपांत धंद्यांचे संघ असत त्यांना गिल्ड्स म्हणत. ज्या धंद्याचा संघ असेल त्या संघाखेरीज इतरांना त्या धंद्यांत शिरकाव करून घेण्यास बंदी असे. या धंदेवाल्यांजवळ शिकाऊ उमेदवार असत. त्यांचेकडून जवळजवळ फुकटांत खूप काम करून घेऊन धंदेवाले त्यांना पिळून घेत. हे संघ अगदीं जुन्या-पुराण्या पद्धतीनें धंदे करीत असून नवीन होणाऱ्या व्यापारवाढीस माल पुरविणें त्यांना उरकेना. हळूहळू व्यापाराच्या बरकतीनें गबर होऊं लागलेला धनिकवर्ग या धंद्यांत हात घालण्यासाठीं पुढें घुसला. सरकारकडून त्यांनीं गिल्डचे कायदे शिथिल करून घेतले. आणि स्वतःच्या पैशांनीं हत्यारें व जागा खरेदी करून मजुरांकरवीं धनोत्पादन करण्यास सुरुवात केली. अनेक मजूर एका भांडवलदाराच्या नेतृत्वाखालीं आल्यानें येथें श्रमविभागास अवसर मिळाला आणि सामुदायिक पद्धतीनें धन अधिक सुबक व स्वस्त निपजूं लागलें. इंग्लंड, हॉलंड व फ्रान्स या देशांत ही छोटी म्हणजे हस्तव्यवसायाची भांडवलशाही १६ व्या शतकाच्या मध्यापासून सुरू झाली. १८ व्या शतकाच्या मध्यानंतरही ही भांडवलशाही एकसारखी भरभराटत होती. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात यांत्रिक शोध लागूं लागले. वॅट, हार्ग्रीव्हज्, रिचर्ड आर्कराइट, सॅम्युअल क्रॉम्प्टन, एडमंड कार्टराइट, जॉन हॉरॉक्स वगैरे यंत्रज्ञांनीं यांत्रिक धनोत्पादनांत क्रांति करून टाकली. वॅटच्या वाफेच्या पंपानें खाणींतून पाणी उपसून काढण्याचे कामांत नवेंच युग निर्माण केल्यानें लोखंड व कोळसा यांचा उपसा फार

झपाट्यानें होऊं लागला. वाफेची ही शक्ति पुढें खाणींप्रमाणें कापड-गिरण्यांतही वापरण्यांत येऊं लागली. एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं वाफेच्या शक्तीचा गिरण्यांत सर्वत्र वापर होऊं लागला. पुढें समुद्रांतील व जमिनीवरील वाहतुकीसाठीं वाफेचा उपयोग होऊं लागून १८१९ सालीं पहिली प्रायोगिक रेल्वे निर्माण झाली आणि १८१९ सालीं पहिली वाफेची बोट अमेरिकेहून अटलांटिक ओलांडून युरोपला आली. इंग्लंडांत १८२५ त पहिली सार्वजनिक रेल्वे झाली. १८३० मध्यें फक्त ५७ मैल रेल्वे इंग्लंडांत होती. १८४०त ८४३ मैल झाली. १८५० त ६६३० मैल झाली.

धनाचें उत्पादन व वाहतूक यांचे बाबतींत यंत्रें व शास्त्रीय शोध यांचा उपयोग होऊं लागल्यापासून मानवी जीवनांत फार मोठी क्रांति झाली. " यंत्रांच्या शोधापूर्वीं त्या त्या भूमींतील कच्च्या मालाचा तेथेंच पक्का माल करून विकणें शक्य होतें. इंग्लंडांत मेंढ्या पाळून जी लोकर काढण्यांत येई तिचेंच कापड काढण्यांत येई. जर्मनींतील तागापासून जर्मन तागाचें कापड होई. फ्रेंच रेशमापासून फ्रेंच कोष्टी रेशमी वस्त्रें विणीत. ईस्ट इंडीज् बेटांतील कापसापासून तेथें कापसाचीं वस्त्रें विणलीं जात. पण वाफेच्या गिरण्या सुरू झाल्यापासून जागतिक प्रमाणावर धनोत्पादनाचा श्रमविभाग होऊं लागला. कच्चा माल जागतिक बाजारांतून येऊं लागला, पक्का माल जागतिक बाजारांत जाऊं लागला, आणि धनाची देवघेव आंतरराष्ट्रीय प्रमाणावर सुरू झाली. एकोणिसाव्या शतकांतच गहूं, कापूस, पेट्रोल तांबें हे पदार्थ उत्तर अमेरिकेंतून युरोपांत येत. कॉफी, मांस वगैरे दक्षिण अमेरिकेंतून येत. गहूं, ज्यूट, कापूस, तांदूळ, चहा आशियांतून येई." सारांश, डबक्यांतल्या

माशाप्रमाणें लहान लहान क्षेत्रांतच हजारों वर्षे घोटाळणारा माणूस या यांत्रिक उत्पादनप्रकारानें साऱ्या जगाचा नागरिक बनविला.

## प्रगति कशानें झाली

ज्या भांडवलदारवर्गानें आर्थिक उत्पादनांत ही प्रचंड क्रांति केली त्यानें राष्ट्रीय स्वातंत्र्य, लोकशाही, खुला व्यापार, व्यक्तिस्वातंत्र्य, व्यवसायस्वातंत्र्य, समता व बंधुभाव या नीतितत्त्वांचा मोठ्या जोरानें पुरस्कार केला होता. "गुलामगिरी व सरंजामशाही यांनीं मानवी जीवन पशुतुल्य लेखलें. यामुळें सामाजिक प्रगति खुंटली; पण भांडवलदारवर्गानें माणसाला व्यक्तिस्वातंत्र्य व व्यवसायस्वातंत्र्य, समतोल व तांतडीचा न्याय, समता व बंधुभाव हे 'जन्मसिद्ध' हक्क मिळवून देण्यासाठीं सरंजामशाहीशीं झगडा केला. यामुळें अर्थोत्पादनांत माणसाचें कर्तृत्व अफाट वाढलें, व संपत्ति आणि संस्कृति यांचा लाभ बहुसंख्य समाजास मिळाला; मानवी विचारांत नैतिक प्रगति झाली व त्यामुळेंच ही आर्थिक प्रगति झाली," असें भाववाद्यांचें अथवा अध्यात्मवाद्यांचें मत असतें. पण गुलामगिरी व सरंजामशाही यांचा उदय व अस्त ज्याप्रमाणें आर्थिक उत्पादनप्रकाराच्या विकासक्रमांत झाला त्याप्रमाणें व्यक्तिस्वातंत्र्य, व्यवसायस्वातंत्र्य, समतोल व तांतडीचा न्याय, समता व बंधुभाव, लोकशाही या सर्वांच्या उदयास आर्थिक उत्पादनप्रकाराचा हा विकासच कारण आहे असें आपणांस दिसून येईल.

व्यापारीवर्ग जसजसा पुढें येऊं लागला तसतशीं मोठमोठीं शहरें निर्माण होऊन तीं भरभराटीस येऊं लागलीं. आठशें वर्षांपूर्वी युरोपीय राष्ट्रांनीं ख्रिस्ताची जन्मभूमि जेरुसलेम मुसलमानांपासून जिंकून घेण्यासाठीं भूमध्य समुद्रांतून सैन्यें नेऊन अनेक धर्मयुद्धें केलीं, तीं क्रूसेड्स या नांवानें प्रसिद्ध आहेत. या ख्रिस्ती राष्ट्रांना

जेरुसलेम मिळालें नाहींच; पण त्यांच्या सैन्यांना लागणारी रसद जे व्यापारी पुरवीत त्यांनीं खूप नफा मिळवून दक्षिण युरोपांत मोठमोठीं शहरें थाटलीं. पुढें नौकानयनाची वाढ, अमेरिकेचा व इतर जगाचा शोध, तिकडून युरोपांत आलेला सोन्यारुप्याचा ओघ या सर्व कारणांनीं व्यापारी व्यवसायाला चलती आली आणि शहरें वाढूं लागलीं. शहरें वाढल्यामुळें सुव्यवस्थित राज्यकारभाराचें महत्त्व फार वाढलें. " शहरांतल्या या व्यापाऱ्यांना स्वतांचीं कोर्टें स्थापलीं जाऊन त्यांमार्फत न्याय मिळावा असें वाटलें. खेड्यांतून सरंजामदारांचीं जीं कोर्टें असत तेथें न्याय लवकर होत नसे. नवीन आर्थिक भरभराटीनें भराभर बदलणाऱ्या व्यापारी समाजास हा चेंगट न्याय मानवणारा नव्हता. नव्या आर्थिक जगांत उत्पन्न होणाऱ्या नव्या नव्या अडचणींचा निर्वाह या जुनाट कोर्टांनीं होणारा नव्हता. उदाहरणार्थ, गहाणवटाचा दस्तैवज करणें, उधारपत्र देणें-घेणें आणि धंद्यासंबंधींचे अनेक कायदे करणें यांची सरंजामदाराला काय माहिती होती ? कांहींच नव्हती. आणि समजा, असली तरी तो त्या सर्व माहितीचा आपल्याच फायद्यासाठीं उपयोग करणार ! ( खेड्यांत सरंजामदार हाच सर्व जमिनीचा मालक आणि तोच न्यायाधीश असे. अर्थात् तो निःपक्षपाती असत नव्हता. ) म्हणून शहरवासी व्यापाऱ्यांना व्यापाऱ्यांच्या हिताहिताचा विचार करून माहितीपूर्वक न्याय देतील अशीं कोर्टें स्थापायचीं होतीं. फौजदारी कायदाही शहरवासी व्यापाऱ्यांना आपल्याला सोईवार असा करायचा होता. खेड्यांत शांतता व सुव्यवस्था राखण्यास जेवढा फौजदारी कायदा पुरे असे तेवढा वाढत्या उद्योगधंद्यांच्या शहरांत पुरा पडणें अशक्य असे." म्हणून या व्यापारीवर्गांनीं सरंजामदारांविरुद्ध राजास पाठिंबा देऊन शहरांत व व्यापारधंद्यांच्या क्षेत्रांत सुव्यवस्थित राज्यकारभार

आणि समतोल व तांतडीचा न्याय या गोष्टी सुरू केल्या. यांत शुद्ध न्यायबुद्धीपेक्षां आर्थिक व्यवहाराची गरज हेंच मुख्य कारण होतें हें सहज कळून येईल.

## व्यवसायस्वातंत्र्य

शहरें वाढलीं, तसे खाटीक, सैंपाकी (म्हणजे भाकऱ्या करून विकणारे), मेणबत्त्या करणारे कारागीर, कोष्टी वगैरे धंदेवाले शहरांत उत्पन्न झाले. पुष्कळ वर्षेंपर्यंत हे धंदे एकेकट्या अथवा थोडथोड्या व्यक्ति करीत. त्यांनीं गिल्ड म्हणजे संघ स्थापले होते व ठराविक माणसांनाच या धंद्यांत शिरकाव करून घेतां येई. पण व्यापाराचें क्षेत्र वाढलें तसे हे संघ माल पुरविण्याच्या दृष्टीनें अपुरे पडूं लागले असें मागें सांगितलें आहे. एका लहानशा आणि स्थिर स्वरूपाच्या बाजारास माल पुरविणें निराळें आणि साऱ्या राष्ट्राच्या बाजारास माल पुरविणें निराळें. दाराशीं येऊन मालाची मागणी करणाऱ्या गिऱ्हाइकास माल पुरविण्यासाठीं हे संघ पुरे होते. पण बाजार हे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रमाणावर वाढल्यानंतर माल करणें व विकणें या कामांची विभागणी झाली. आणि व्यापारी वर्ग हा माल खपविणारा या नात्यानें त्याचें वर्चस्व वाढलें. हे व्यापारीच आतां हळूहळू कारागीर नोकर नेमून विक्रीसाठीं लागणारा माल निर्माण करूं लागले. पण यास धंदेवाल्यांच्या संघांचा विरोध होऊं लागला. म्हणून या व्यापारी वर्गानें वर सांगितलेल्या व्यवसाय-स्वातंत्र्याच्या तत्त्वाचा प्रसार सुरू केला. प्रथम प्रथम हे व्यापारी ऊर्फ प्राथमिक भांडवलवाले संघाच्या अधिकारक्षेत्राबाहेर जाऊन धंदे उभारूं लागले. पण व्यापाऱ्यांच्या या सामुदायिक उत्पादन-पद्धतीनें धनोत्पादन वाढत होतें. राजांना यामुळें भरपूर कर मिळूं

लागला. तेव्हां त्यांनीं धंदेवाल्यांच्या संघांत नव्या माणसांना येण्यास बंदी करणारे जे कायदे होते ते हळूहळू शिथिल करून, पूर्ण व्यसायस्वातंत्र्य जनतेला बहाल केलें. फ्रान्समध्यें अठराव्या शतकाच्या अखेरीस झालेल्या क्रांतीनंतर कारागीरसंघांचे कायदे अजीबात रद्द करण्यांत आले.

व्यवसायस्वातंत्र्याच्या या कायद्यांचा परिणाम सरंजामशाहीवर जो झाला तो भांडवलशाहीस अतिशय अनुकूल असा झाला. पैशाचा व्यवहार वाढल्यामुळें पैसा हें धनसंचयाचें फार मोठें साधन उपलब्ध झालें; आणि व्यापाऱ्यांनीं भांडवलदार होऊन जी नफेबाजी सुरू केली तीमुळें सरंजामदारवर्गांत आपले सरंजाम व जमिनी विकून टाकून स्वतः धंद्यांत पडण्याची अथवा व्यापाऱ्यांना भांडवल पुरविण्याची ईर्षा उत्पन्न झाली. जमिनींच्या या क्रय-विक्रयांत शेतीवरील कुळांचीही खरेदी-विक्री होत असे. कारण शेतकरी हा सरंजामदाराच्या जमिनीस वंशपरंपरा बांधलेला होता. (तो भू-दास होता.) त्यामुळें शेतकऱ्यांचे हाल होऊं लागले. शेतकऱ्यांची लोकसंख्या वाढत चालली तसतशी नुसत्या शेतीवर गुजराण होणें सगळ्यांनाच शक्य होईनासें झालें. शहरांत नवीनच उदयास येऊं लागलेल्या भांडवलदारवर्गास नवीन नवीन मजुरांची गरज होती. खेड्यांतील शेतकरीवर्गास नवीन रोजगार हवा होता. व्यवसायस्वातंत्र्याच्या कायद्यांनीं व्यवसायसंघाचे कायदे जसे रद्द केले व कोणासही कोणताही व्यवसाय करण्याची मोकळीक दिली त्याप्रमाणें शेतकऱ्यासही जमिनीच्या बंधांतून मोकळें केलें. या व्यवसायस्वातंत्र्याच्या तत्त्वामुळें नवीन वर्धिष्णु अशा भांडवलदारवर्गास भरपूर मजुरांचा पुरवठा होऊं लागला. या मजुरांत रोजगारीसाठीं चढाओढ लागे. यामुळें मजुरीचे दर कमी होत व भांडवलदाराचा फायदा होई. भांडवलदारवर्गानीं

ज्या व्यवसायस्वातंत्र्याचा पुरस्कार केला तें त्यांच्या दृष्टीनें नैतिक तत्त्व असण्यापेक्षां आर्थिक फायद्याचें तत्त्व होतें हें यावरून कळून येईल.

## धार्मिक स्वातंत्र्य

धार्मिक स्वातंत्र्याच्या चळवळीच्या बुडाशींही महत्त्वाचीं आर्थिक कारणें होतीं. पोपचें साम्राज्य सर्व ख्रिस्ती राष्ट्रांवर चालत असल्यामुळें राज्यकर्ते व पोपचे जागोजागचे धर्माधिकारी यांचे खटके उडत. सरंजामदारांनाही राजाची सत्ता जाचत असल्यामुळें ते राजांचे विरुद्ध धर्मगुरूंचें नेहमीं साहाय्य घेत. पुढें पृथ्वी सपाट आहे, आशिया, आफ्रिका व युरोप हीं तीन खंडें म्हणजेच सारें जग वगैरे बायबलांतील कल्पना खुळचट आहेत असें नौकानयनांतील प्रगतीनें सिद्ध केलें. पैसा खुळखुळूं लागून भांडवली धंदा बरकतीचा होऊं लागल्यानें सावकारी करूं नये या ख्रिस्ती धर्मांतील निर्बंधाचें पावित्र्य नष्ट झालें. धर्मगुरूंचें खाजगी वर्तन अतिशय निंद्य असल्यानें समाजांत त्यांच्याबद्दल पूज्यभाव कमी होऊं लागलाच होता. छापण्याच्या कलेचा प्रसार होऊन लॅटिनमधील बायबल स्वदेशी भाषांत युरोपियन लोकांना वाचायला मिळूं लागल्यानें धर्मगुरूंची प्रतिष्ठा कमी झाली. धर्मगुरूंतही वरिष्ठ धर्मगुरु स्वतः चैनींत, अज्ञानांत व अनाचारांत राहून खालच्या दर्जाच्या धर्मगुरूंना वाईट रीतीनें वागवीत, यामुळें त्यांच्यांतही द्वंद्व उत्पन्न झालें. धर्ममंदिरांच्या मोठमोठ्या इस्टेटी धर्मगुरूंनीं केल्या होत्या. पापी व दुरात्मे अशा सरंजामदारांकडून जमिनी व पैसे घेऊन परलोकांत पापाची शिक्षा होणार नाहीं अशीं माफीपत्रें हे धर्मगुरु विकीत असत. शेतकऱ्यांकडून धर्मगुरूंच्या सांभाळासाठीं 'टाइथ' नांवाचा बराच मोठा कर घेतला जाई. धार्मिक बुद्धीनें अथवा खाजगी फायद्यासाठीं धर्मगुरूंचा पाठिंबा मिळावा म्हणून सरंजामदार धर्मगुरूंना पैसे व

जमिनी देत. या कारणांनीं धर्ममंदिरांच्या इस्टेटी वाढत्या होत्या. या धर्मगुरूंचा पाडाव करण्याचे कामीं राजे व भांडवलदार यांचें सहकार्य झालें. इंग्लंडांत आठव्या हेन्रीनें रोमचा पोप आपल्या घटस्फोटास मान्यता देत नाहीं असें पाहून पोपचा अंमल झुगारून दिला व आपणच मुख्य धर्मगुरु अशी द्वाही फिरविली. पोपच्या सत्तेचें राजाच्या राष्ट्रीय सत्तेवर जें दडपण होतें तें यामुळें नाहींसें झालें. धर्मगुरूंजवळ धर्ममंदिरांच्या नांवावर असलेल्या जमिनी होत्या त्यांवर भांडवलदारांचा डोळा होताच. राजालाही या इस्टेटी फुकटांत खाण्याचा लोभ अनावर होता. म्हणून आठव्या हेन्रीनें धर्ममंदिरांच्या इस्टेटी खालसा करून त्या भांडवलदारांना विकल्या आणि या सर्व खटाटोपास धार्मिक स्वातंत्र्याची चळवळ हें गोंडस नांव मिळालें. वस्तुतः भांडवली उत्पादनप्रकाराच्या झंझावातानेंच धर्मसत्तेचें हें प्राचीन वस्त्र फाटून गेलें. धार्मिक सुधारणेच्या चळवळीस नैतिक प्रेरणा मुळींच कारण नव्हती असें नाहीं; पण तिला यश आलें तें आर्थिक कारणांनींच आलें.

## अप्रतिबंध व्यापार विरुद्ध संरक्षण

अप्रतिबंध व्यापाराचें तत्त्वही असेंच नैतिक तत्त्व म्हणून भांडवलदारांकडून प्रतिपादण्यांत येऊं लागलें होतें. स्वताच्या मालकीच्या पैशानें ज्याला जो माल जास्तींत जास्त स्वस्त मिळेल तो त्यानें घेऊन त्याचा उपभोग घ्यावा हें स्वातंत्र्य व समता या दृष्टीनें इष्टच नव्हे का? राज्यकर्त्यांनीं निरनिराळ्या धंद्यावरील निर्बंध जसे दूर केले तसे मालाच्या आयात-निर्यातीवरील प्रतिबंध दूर करून धनोपभोगाचे बाबतींतही समता स्थापन करावी अशी ही मागणी होती. या सार्वजनिक हितबुद्धीच्या दिसणाऱ्या मागणीमागेंही भांडवलदारांचा वैयक्तिक अथवा वर्गीय स्वार्थ होताच. सोळाव्या शतकाचे

अखेर प्रसिद्ध ईस्ट इंडिया कंपनीला पूर्वेकडील व्यापाराचा मक्ता इंग्लंडच्या एलिझाबेथ राणीनें दिला ही गोष्ट इतिहासज्ञांना माहीत आहे. अगदीं प्रारंभावस्थेंत असलेल्या भांडवलदारांना परदेशी भांडवलदारांशीं चढाओढींत टिकून राहावयाचे असल्यानें त्यांना स्वदेशांतच चढाओढ सोसावी लागूं नये म्हणून ही मक्तेदारी सुरू करण्यांत आली होती. अनेक कंपन्या अशा मक्तेदाऱ्या मिळवून गबर होत. चढाओढ नसल्यानें त्यांच्यांत अनीतीचा बुजबुजाट झाला. नवीन नवीन उदयास येणाऱ्या धनिकांना या मक्तेदारांच्या तटबंदीमुळें पुढें येण्यास वाव मिळेना. सरंजामदारांच्या सत्तेचा राजांनीं मोड केला खरा, पण पुढें सरंजामदार हे राजाच्या पक्षास जाऊन उदयिष्णु अशा भांडवलदारवर्गास अनियंत्रित राजसत्तेच्या बलावर दडपण्याचा प्रयत्न करूं लागले. राजांनीं मक्ते दिलेल्या मक्तेदार कंपन्या या राजाच्या अनियंत्रित सत्तेस साहाय्य करीत. यामुळें मक्तेदारीविरुद्ध ओरड सुरू झाली. अठराव्या शतकाच्या अखेरीस यांत्रिक उत्पादन वाढूं लागल्यानें तर, आयात-निर्यात व उत्पादन यांवरील निर्बंध असह्य झाले. ज्या देशांत जो माल पिकण्यास अथवा तयार होण्यास नैसर्गिक अनुकूलता आहे त्या देशांत तोच माल बनविणें व जेथें त्याच्या निपजेस प्रतिकूलता असेल तेथील लोकांनीं तो स्वतः न पिकवितां खरेदी करणें हेंच एकंदर जगाच्या व व्यक्तीच्या आर्थिक हिताचें असून, मानव प्राणी यामुळें जास्तींत जास्त धनवान् व सुखी होईल असें ॲडॅम स्मिथ या ब्रिटिश तत्त्वज्ञाचें मत होतें. ॲडॅम स्मिथ हा मानवजातीच्या कल्याणाच्या शुद्धबुद्धीनेंच बोलला असेलही; पण त्याच्या मतास ब्रिटिश भांडवलदारांनीं उचलून धरलें म्हणून तें पुढें प्रसार पावलें. इंग्लंडचें कापड, आगगाड्या वगैरे यांत्रिक माल परदेशांत विकून

ब्रिटिश भांडवलदारांना गबर व्हावयाचें होतें. उलट कारखानदारी व लोकसंख्या वाढल्यामुळें आणि शेतीपेक्षां कारखानदारींतच माणसांचे श्रम अधिक खर्चीं पडूं लागल्यामुळें स्वदेशांतील धान्य अपुरें पडून विदेशी धान्य आयात करण्याची गरज भांडवलदारांना तीव्र भासत होती. म्हणून धान्याच्या आयातीवरील कर उठविण्यासाठीं अप्रतिबंध व्यापारवाल्यांनीं इंग्लंडांत शंभर वर्षांपूर्वीं फार मोठी चळवळ करून गव्हावरील आयातकर उठविला. इंग्लंडांत धान्य फार मोठ्या प्रमाणांत येऊं लागल्यामुळें त्याच्या मोबदल्यांत इंग्लंडांतला यांत्रिक कारखानदारीचा मालही बाहेर देशांत भराभर खपूं लागला. आणि अप्रतिबंध व्यापाराच्या या तत्त्वामुळें जागतिक संपत्ति आणि संस्कृति वाढली असली तरी मुख्यत: ब्रिटिश भांडवलदारांची चलती होऊन ब्रिटिश भांडवली उत्पादनप्रकारास अफाट यश आलें.

इंग्लंडखेरीज बाकीच्या जगास हें खुल्या व्यापाराचें तत्त्व पटलें नाहीं. जगाचें सुख व संपत्ति वाढविणारें हें तत्त्व त्रिकालाबाधित सत्य आहे असेंच ॲडम स्मिथला वाटत होतें. पण त्यानें प्रथम फक्त ब्रिटिश भांडवलदारांचें कल्याण झालें. जर्मनीसारख्या राष्ट्रांत या तत्त्वास प्रतिकार सुरू झाला. ब्रिटिश कारखानदारीचा सुबक माल जर्मनींत येऊन स्वस्त भावांत विकूं लागला. यामुळें जर्मनींत कारखानदारी वाढणें अशक्य होऊं लागलें. निवळ शेतीचा माल काढणारें राष्ट्र अखेर मागासलेलें राहतें आणि कारखानदारी राष्ट्र बलवान् होऊन शेतीप्रधान राष्ट्रावर प्रभुत्व स्थापतें ही अक्कल जर्मन भांडवलदारांस फार लवकर आली. त्यांनीं विदेशी कारखानदारी मालास प्रतिबंध करण्यासाठीं आयात जकाती उभारून त्यांच्या संरक्षणाच्या आड जर्मनीनें आपली कारखानदारी उभारली आणि आर्थिक भरभराटीच्या व सामर्थ्याच्या बाबतींत जर्मन राष्ट्र इंग्लंडशीं

तोडीस तोड झालें. ॲडॅम स्मिथ ज्याप्रमाणें अप्रतिबंध व्यापार हें मानवजातीच्या कल्याणास कारण होणारें त्रिकालाबाधित तत्त्व आहे असें म्हणे, तसेंच जर्मन तत्त्वज्ञ फेड्रिच लिस्ट हा संरक्षित व्यापार हें मानवी कल्याणाचें त्रिकालाबाधित तत्त्व आहे असें म्हणे. पण दोन्हीही तत्त्वें त्या त्या देशांत भांडवलदारी उत्पादनाच्या उत्कर्षास त्या त्या वेळीं उपयोगी पडलीं इतकाच त्याचा अर्थ आहे. इंग्लंडांत आतां अप्रतिबंध व्यापार हा राष्ट्रीय हितास अपायकारक मानला जाऊं लागला असून, जर्मन लोकांना जर्मन मालास मात्र चोंहोकडे मुक्तद्वार असावें आणि जर्मनीच्या राजकीय व आर्थिक सत्तेनेंच जगाचें कल्याण होईल असें वाटतें.

## लोकशाही

ब्रिटिश, फ्रेंच व अमेरिकन भांडवलशाहीनें प्रतिपादिलेलें फार मोठें नीतितत्त्व म्हणजे लोकशाही हें होय. सर्व माणसें ईश्वराचीं लेंकरें त्या नात्यानें सर्वांचा दर्जा सारखा असतो, या ख्रिस्ती धर्माचें व्यक्त स्वरूप म्हणजेच ही लोकशाही असा तिचा अनेक तत्त्वज्ञांनीं गौरव केला आहे. पण हिलाही धनोत्पादनप्रकारानें उत्पन्न केलेली आर्थिक स्वार्थाची प्रेरणाच कारण आहे. सरंजामदार व पोप यांची सत्ता झुगारून देऊन, सोळावें शतकभर जो भांडवलदार वर्ग इंग्लंडांत राजाश्रयाखालीं बलवान् होत होता, त्याचें सतराव्या शतकांत राजाशींच भांडण सुरू झालें. आणि जी राजसत्ता भांडवलदार वर्गाचा आश्रय करून सरंजामदार व धर्मगुरु यांशीं झगडत होती, तीच सतराव्या शतकांत सरंजामदार वर्ग व धर्मगुरु यांच्या साह्यानें भांडवलदार वर्गाशीं झगडूं लागली. "ब्रिटिश धनिक वर्गास लहरी राजापासून आपल्या संपत्तीचें रक्षण करणें इष्ट वाटून, राजाच्या राजसत्तेस पायबंद घालण्याचा खटाटोप या धनिकवर्गानें सतत

शंभर वर्षे केला. पिम्, हॅम्डन, ऑलिव्हर क्रॉम्वेल, हे पहिल्या चार्लसविरुद्ध लढणारे पार्लमेंटचे पुढारी मोठमोठे भांडवलदार शेतकरी होते. व्यापारधंद्याच्या वाढीस राजाच्या लहरी कारभारानें अडथळा येतो, राजा कर्जें बुडवितो व प्रजेवर भारी कर बसवून ते वाईट कामीं खर्च करतो ही यांची मुख्य तक्रार होती. यासाठीं पहिल्या चार्लसशीं पार्लमेंटनें सशस्त्र सामना देऊन त्यास फाशीं दिलें. पुढें त्याचा मुलगा दुसरा जेम्स यास पदच्युत करून व तिसऱ्या विल्यमला प्रजेसंबंधींच्या कर्तव्यबंधनांनीं बांधून घेऊन त्यांनीं राज्यावर बसविलें. तिसऱ्या विल्यमच्या वेळीं राजास कर्ज देण्याच्या निमित्तानें धनिक वर्गानें प्रसिद्ध 'बँक ऑफ इंग्लंड' स्थापन केली. तेव्हांपासून 'बँक ऑफ इंग्लंड'चें, सावकाराचें कुळावर असतें तसें, वर्चस्व इंग्लंडच्या राजावर व राज्यकारभारावर पडूं लागलें. आज सव्वादोनशें वर्षांनंतरही हें वर्चस्व कायम आहे. सतराव्या शतकांत धनिक वर्गात राजकीय महत्त्वाकांक्षा उत्पन्न होण्याचीं कारणें सांगतांना जॉन स्ट्राची म्हणतो, 'या वेळीं व्यापारधंद्यांत मोठ्या क्रांतीची वेळ आली होती. मालाची देवघेव वाढली. धंद्याच्या पोटशाखा बळावल्या. एकंदर पैदासही यामुळें वाढली. संपत्ति एकेकट्याच्या हातांत पुष्कळ पुष्कळ साचूं लागली. यामुळें लहरी राजांचा बेदरकार कारभार अपुरा व उत्कर्षास विघातक वाटूं लागला. कार्यक्षम असें राज्यकारभाराचें यंत्र, न्यायनिपुण न्यायाधीश, करारांची सक्तीनें व निःपक्षपातीपणानें बजावणी, स्वदेशाबाहेर दरारा बसवून व्यापारवाढीस अनुकूलता उत्पन्न करील आणि स्वदेशांतील असंतुष्ट वर्गास भरडून काढील असें तयार खडें सैन्य, या सर्वांची गरज या धनिक वर्गास तीव्रतेनें भासूं लागली.' असें समर्थ राज्ययंत्र धनिक वर्गानें राजास लगाम घालून बनविलें." हें नियंत्रित राजसत्तेचें राज्ययंत्र जनतेच्या

नांवानें बनविण्यांत आलें असलें तरी खरी सत्ता धनिक वर्गाच्याच हातीं होती. याच धनिक वर्गास पुढें जनतेची आपल्याविरुद्ध उठावणी होईल अशी भीति अठराव्या शतकाच्या अखेरीस वाटूं लागली. त्या वेळीं फ्रान्समध्यें राज्यक्रांतीचें वादळ उठून ब्रिटिश समाजघटनेसही त्यानें जबरदस्त धक्का दिला. तेव्हां इंग्लंडांत क्रांति होऊं नये म्हणून ब्रिटिश सरकारनें दडपशाहीचे अनेक कायदेही मंजूर केले.

पुढें नेपोलिअनचा पाडाव झाल्यानंतर यांत्रिक उत्पादन वाढूं लागलें तशी इंग्लंडांत शेती मागें पडून, यांत्रिक उत्पादनाची भांडवलशाही सुरू झाली. आणि कारखाने जेथें वसले तेथें वस्ती भराभर वाढूं लागली. शेतीचे कित्येक मुलूख ओस पडले. या बदलत्या वस्तींत पार्लमेंटचे जुने मतदार-संघ निरुपयोगी ठरूं लागले होते. एकाद्या मतदारसंघांत एक अथवा दोन माणसें राहत. तेच मतदार असून पार्लमेंटचे प्रतिनिधि म्हणून तेच निवडून येत व राज्यसत्ता बळकावून बसत. उलट ज्या कारखानदारीच्या शहरांतून लक्षावधि कामगारांची वस्ती असे तेथें मतदारही नव्हते व प्रतिनिधीही नव्हते. ही स्थिति बदलून लोकशाहीची वाढ करण्यासाठीं इंग्लंडांत १८३२ सालीं पार्लमेंटच्या सुधारणेचा कायदा करण्यांत आला. यामुळें मोठमोठ्या कारखानदारी शहरांतील नागरिकांना मताधिकार मिळून त्यांच्या पाठिंब्यावर कारखानदारी भांडवलदारांना राज्यसत्तेवर प्रभुत्व मिळालें. अशा प्रकारें लोकशाहीच्या वाढीच्या पांघरुणाखालीं कारखानदारी भांडवलदारांची राज्यसत्ता इंग्लंडांत दृढमूल झाली.

## कामगार चळवळ कां झाली ?

यानंतर इंग्लंडांत कामगारसंघटनेची फार मोठी चळवळ होऊन ती उत्तरोत्तर यशस्वी होत गेली. तिची कारणमीमांसाही बोधप्रद

५

शंभर वर्षे केला. पिम्, हॅम्डन, ऑलिव्हर क्रॉम्वेल, हे पहिल्या चार्ल्सविरुद्ध लढणारे पार्लमेंटचे पुढारी मोठमोठे भांडवलदार शेतकरी होते. व्यापारधंद्याच्या वाढीस राजाच्या लहरी कारभारानें अडथळा येतो, राजा कर्जें बुडवितो व प्रजेवर भारी कर बसवून ते वाईट कामीं खर्च करतो ही यांची मुख्य तक्रार होती. यासाठीं पहिल्या चार्ल्सशीं पार्लमेंटनें सशस्त्र सामना देऊन त्यास फाशीं दिलें. पुढें त्याचा मुलगा दुसरा जेम्स यास पदच्युत करून व तिसऱ्या विल्यमला प्रजेसंबंधींच्या कर्तव्यबंधनांनीं बांधून घेऊन त्यांनीं राज्यावर बसविलें. तिसऱ्या विल्यमच्या वेळीं राजास कर्ज देण्याच्या निमित्तानें धनिक वर्गानें प्रसिद्ध 'बँक ऑफ इंग्लंड' स्थापन केली. तेव्हांपासून 'बँक ऑफ इंग्लंड'चें, सावकाराचें कुळावर असतें तसें, वर्चस्व इंग्लंडच्या राजावर व राज्यकारभारावर पडूं लागलें. आज सव्वादोनशें वर्षांनंतरही हें वर्चस्व कायम आहे. सतराव्या शतकांत धनिक वर्गांत राजकीय महत्त्वाकांक्षा उत्पन्न होण्याचीं कारणें सांगतांना जॉन स्ट्राची म्हणतो, 'या वेळीं व्यापारधंद्यांत मोठ्या क्रांतीची वेळ आली होती. मालाची देवघेव वाढली. धंद्याच्या पोटशाखा बळावल्या. एकंदर पैदासही यामुळें वाढली. संपत्ति एकेकट्याच्या हातांत पुष्कळ पुष्कळ साचूं लागली. यामुळें लहरी राजांचा बेदरकार कारभार अपुरा व उत्कर्षास विघातक वाटूं लागला. कार्यक्षम असें राज्यकारभाराचें यंत्र, न्यायनिपुण न्यायाधीश, करारांची सक्तीनें व निःपक्षपातीपणानें बजावणी, स्वदेशाबाहेर दरारा बसवून व्यापारवाढीस अनुकूलता उत्पन्न करील आणि स्वदेशांतील असंतुष्ट वर्गास भरडून काढील असें तयार खडें सैन्य, या सर्वांची गरज या धनिक वर्गास तीव्रतेनें भासूं लागली.' असें समर्थ राज्ययंत्र धनिक वर्गानें राजास लगाम घालून बनविलें." हें नियंत्रित राजसत्तेचें राज्ययंत्र जनतेच्या

नांवानें बनविण्यांत आलें असलें तरी खरी सत्ता धनिक वर्गाच्याच हातीं होती. याच धनिक वर्गास पुढें जनतेची आपल्याविरुद्ध उठावणी होईल अशी भीति अठराव्या शतकाच्या अखेरीस वाटूं लागली. त्या वेळीं फ्रान्समध्यें राज्यक्रांतीचें वादळ उठून ब्रिटिश समाजघटनेसही त्यानें जबरदस्त धक्का दिला. तेव्हां इंग्लंडांत क्रांति होऊं नये म्हणून ब्रिटिश सरकारनें दडपशाहीचे अनेक कायदेही मंजूर केले.

पुढें नेपोलिअनचा पाडाव झाल्यानंतर यांत्रिक उत्पादन वाढूं लागलें तशी इंग्लंडांत शेती मागें पडून, यांत्रिक उत्पादनाची भांडवल-शाही सुरू झाली. आणि कारखाने जेथें वसले तेथें वस्ती भराभर वाढूं लागली. शेतीचे कित्येक मुलूख ओस पडले. या बदलत्या वस्तींत पार्लमेंटचे जुने मतदार-संघ निरुपयोगी ठरूं लागले होते. एकाद्या मतदारसंघांत एक अथवा दोन माणसें राहत. तेच मतदार असून पार्लमेंटचे प्रतिनिधि म्हणून तेंच निवडून येत व राज्यसत्ता बळकावून बसत. उलट ज्या कारखानदारीच्या शहरांतून लक्षावधि कामगारांची वस्ती असे तेथें मतदारही नव्हते व प्रतिनिधीही नव्हते. ही स्थिति बदलून लोकशाहीची वाढ करण्यासाठीं इंग्लंडांत १८३२ सालीं पार्लमेंटच्या सुधारणेचा कायदा करण्यांत आला. यामुळें मोठमोठ्या कारखानदारी शहरांतील नागरिकांना मताधिकार मिळून त्यांच्या पाठिंब्यावर कारखानदारी भांडवलदारांना राज्यसत्तेवर प्रभुत्व मिळालें. अशा प्रकारें लोकशाहीच्या वाढीच्या पांघरुणाखालीं कार-खानदारी भांडवलदारांची राज्यसत्ता इंग्लंडांत दृढमूल झाली.

## कामगार चळवळ कां झाली ?

यानंतर इंग्लंडांत कामगारसंघटनेची फार मोठी चळवळ होऊन ती उत्तरोत्तर यशस्वी होत गेली. तिची कारणमीमांसाही बोधप्रद

आहे. सरंजामदार व भांडवलदार यांचा विरोध होता हें मागें सांगितलेंच आहे. या सरंजामदारांची सत्ता एकसारखी कमी होत गेली. तथापि, उमरावसभेच्या रूपानें ते आपली सत्ता शक्य तों संभाळून असत. यांत्रिक कारखानदारी जसजशी वाढूं लागली तसतशी भांडवलदारांनीं कारखान्यांत मजुरांची अतिशय निर्दय पिळवणूक चालविली; आणि कामगार व कारखानदार यांचा विरोध तीव्रतर होऊं लागला. तेव्हां कारखानदारांच्या सत्तेला कैची लावण्यासाठीं उमरावसभेनें कामगारांची बाजू घेऊन कामगारसंघटनेस उत्तेजन दिलें. कामाचे तास कमी करणें, कामगारांची राहण्याची परिस्थिति सुधारणें वगैरे अनेक प्रकारचे कायदे लॉर्ड शॅफ्ट्सबरी यांसारख्या उमरावांच्या प्रयत्नानें झाले. शॅफ्टसबरी हा वर्गस्वार्थाच्या दृष्टीनें हे काम करीत नसून परोपकारबुद्धीनेंच करीत असावा हें संभवनीय आहे. पण त्यास यश आलें तें उमराववर्गाच्या पाठबळामुळें आलें आणि उमराववर्गास भांडवली उत्पादनाबद्दल व भांडवलदारवर्गाबद्दल द्वेष वाटत असल्यानेंच त्यानें कामगारसंघटनेस मदत केली हा मुद्दा महत्त्वाचा आहे. गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत पार्लमेंटच्या मतदानाचा अधिकार दोनदां अधिकाधिक विस्तृत करून अधिकाधिक कामगारवर्गास मताधिकार देण्यांत आला. या दोनही सुधारणा मुख्यतः उमरावसभेच्या प्रेरणेनेंच झाल्या.

फ्रान्समध्यें भांडवलवाल्यांच्या या 'लोकशाही'स फारच खडतर मार्ग चालावा लागला. १७८९ पर्यंत फ्रान्समध्यें अत्यंत प्रतिगामी अशी राजवट होती. त्यानंतर क्रांति झाली. नवी लोकशाहीप्रधान घटना अमलांत आली. पण अधिकारच्युत वर्गानें परक्यांची मदत बोलावून क्रांतीचा पाडाव करण्याचा घाट घालतांच अंदाधुंदी माजली. तींतून नेपोलिअन हा हुकुमशहा पुढें आला व त्यानें लोक-

शाही बुडविली. सरंजामशाही जी एकदां उध्वस्त झाली ती मात्र पुन्हा कधींही अस्तित्वांत आली नाहीं. पण नेपोलिअननंतर राज्यसत्ता धनिकांच्या हातींच गेली. एकोणिसाव्या शतकांत फ्रान्समध्यें राजसत्ता व प्रजासत्ता असे पालट अनेकदां झाले, पण राजसत्ता धनिकांच्या हातीं सदैव होती.

इंग्लंडशीं अमेरिकेनें लढून स्वातंत्र्य प्राप्त करून घेतलें. त्यानंतर तेथें पूर्ण प्रजासत्ताक राज्य अस्तित्वांत आलें, पण तें फक्त गोऱ्या लोकांसाठींच. खुद्द वॉशिंग्टनच्या मालकीचे अनेक गुलाम होते. पश्चिमेकडील मुलूख अमेरिकेंतले गोरे वसाहतवाले व्यापूं लागले तेव्हां तेथले मूळचे जे ताम्रवर्णी रहिवाशी त्यांनीं यांना जागोजाग विरोध केला. पण बंदुकीच्या गोळ्यांनीं या ताम्रवर्णींचा फडशा करीत गोऱ्या लोकांनीं अमेरिकेंत वसाहत वाढविली. पुढें लिंकनच्या वेळीं गुलामगिरी नाहींशी करण्यांत या अमेरिकन प्रजासत्तावाल्यांचा आर्थिक स्वार्थ कोणता होता हें मागें सांगितलेंच आहे. अमेरिकेंत लोकशाहीच्या नांवाखालीं आज धनिकांचीच सत्ता आहे ही गोष्ट कोणीच—अमेरिकेचे अध्यक्ष रूझवेल्टसुद्धां— अमान्य करीत नाहींत. भांडवलवाल्यांचीं लोकशाही वगैरे सर्व उच्च नीतितत्त्वें अशा प्रकारें आर्थिक स्वार्थबुद्धीनें प्रेरित अशींच होतीं हें खरें असलें तरी, या भांडवली उत्पादनानें, विशेषतः यांत्रिक उत्पादन-प्रकारानें मानवजातीचें अफाट कल्याण केलें आहे हेंही ध्यानांत ठेवलें पाहिजे.

## मानवविकास कसा होतो

माणसानें गुलामगिरी पद्धतीचा धनोत्पादन-प्रकार म्हणून अवलंब केला त्यामुळें मानवसमाजाच्या आर्थिक उन्नतीसच नव्हे तर सांस्कृतिक उन्नतीसही मदत झाली हें ॲरिस्टॉटलचें मत पूर्वी सांगितलेंच आहे. मानवजातीच्या उन्नतीस अवश्य असणारी सुबत्ता,

प्रभुत्व आणि फुरसत ही साधनत्रयी ग्रीक नागरिकांना गुलामगिरी पद्धतीनें दिली. यामुळें ग्रीक नागरिकांची उन्नति झाली असें तेथें म्हटलें आहे. याच मुद्द्याचा येथें आणखी थोडा खुलासा करूं. मानवी जीवनाला अवश्य अशी सामुग्री सृष्टींत उपलब्ध झाली नसती तर माणूस सृष्टींत जगूंच शकला नसता. पण ही जीवन-सामुग्री माणसास सृष्टींत आयती तयार अशी मिळाली नाहीं. शिकार, शेती, हस्तव्यवसाय, यांत्रिक कारखानदारी वगैरे नाना-प्रकारें सायास करून माणसानें चरितार्थ-साधन सृष्टींतून तयार केलें. त्यासाठीं भाला, बरची, तिरकमठा, नांगर, हातमाग, गिरणी वगैरे 'हत्यारें' जशीं माणसानें केलीं त्याचप्रमाणें कुटुंबसंस्था, राज्य-संस्था, गुलामगिरी, सरंजामशाही, भांडवलशाही, लोकशाही वगैरे भिन्न भिन्न उत्पादननार्थी असलेल्या समाजघटनाही माणसानें बनविल्या. हें सर्व करतांना कमींत कमी श्रमांत जास्तींत जास्त चरितार्थसाधन मिळविणें हें माणसाचें ध्येय होतें. पण अगदीं प्राचीन काळापासून हजारों वर्षें या बाबतींत माणसास फार थोडें यश आलें. शरीर थकेपर्यंत सर्व माणसांनीं शारीरिक कष्ट करावे तेव्हां जीव जगण्यास कशीबशी पुरेशी साधन-सामुग्री मिळत असे. ॲरिस्टॉटल्च्या काळीं गुलामगिरी रूढ होती. अर्थात् गुलामांना शरीर थकेपर्यंत चाबकाच्या रट्ट्याखालीं राबावें लागे. पण त्यामुळें ॲरिस्टॉटल्च्या गुलामांनीं मिळविलेल्या धनावर ॲरिस्टॉटल्ला जगतां येऊन स्वतः जिवापाड शारीरिक श्रम करावे लागत नसत. जनावराचे शारीरिक श्रम कमी झाले तर त्यांचें शरीर मदड राहतें, आणि कर्तृत्वाच्या दृष्टीनें जनावर हीनदशेस जाऊं लागतें. पण माणसाला शारीरिक श्रम कमी होऊन जी फुरसत मिळाली तिचा उपयोग माणसाला आपल्या बौद्धिक व सांस्कृतिक उन्नतीचे कामीं करतां आला.

अर्थात् ऐदीपणानें ही फुरसत माणसानें वायां घालविली असती तर हिंदुस्तानांतील संस्थानिकांप्रमाणें अखिल मानवजात मूर्ख, उन्मत्त व कर्तृत्वहीन झाली असती. पण तिला असें ऐदी-पणानें राहणें शक्य नव्हतें. गुलामांनीं जिवापाड कष्ट केल्यामुळें गुलामांच्या मालकांना ते शारीरिक कष्ट करावे लागले नाहींत खरे. पण गुलामांना कामास लावणें, त्यांच्यावर सक्ती करणें, त्यांना शासन करून त्यांच्यावर वचक बसविणें, त्यांचीं हत्यारें व कामें करण्याच्या पद्धति सुधारणें, उत्पन्न झालेल्या संपत्तीचा विनिमय यथायोग्य होईल, उत्पादनाचा व्यवसाय यथायोग्य चालेल अशा प्रकारें समाज-व्यवस्था व शासन-संस्था उभारून त्या चालविणें हीं बौद्धिक कामें गुलामांच्या मालकांना म्हणजे ॲरिस्टॉटल्च्या वर्गबंधूंना करावीं लागत. हीं कामें फारशीं शारीरिक कष्टाचीं नसून बौद्धिक कष्टाचीं असत. यांना आपण प्रभुत्वाचीं कामें असें म्हणूं. कारण गुलामांचा मालक म्हणजे प्रभु असा जो हा वर्ग त्याला आपलें प्रभुत्व कायम ठेवण्यासाठींच हीं कामें करावीं लागत. अथवा यामुळें माणसाच्या बुद्धीस कसरत मिळे व तिचें कर्तृत्व वाढे. चतुर, प्रबळ व चलाख घोडा खेळविण्याचें, त्याला शिकविण्याचें काम ज्या घोडेस्वाराला करावें लागतें त्याचें स्वतांचें कर्तृत्वही घोड्याला तयार करतांना वाढत असतें. हातांच्या मुठींत स्प्रिंगचीं डंबेल्स रोज दाबून कसरत केली तर हाताचे स्नायु मजबूत, चलाख व सुंदर होतात हा नेहमींचा अनुभव आहे. स्प्रिंगच्या अंगीं जो स्थितिस्थापकतेचा जोरदार गुण आहे त्याच्याशीं झगडण्याच्या कसरतीमुळें—त्यावर प्रभुत्व स्थापन करण्याच्या खटाटोपामुळें स्नायूंची शक्ति व सौंदर्य वाढतें. नाठाळ घोड्यास आवरण्याच्या व शिकविण्याच्या म्हणजे त्याच्यावर 'प्रभुत्व' स्थापन करण्याच्या खटाटोपामुळें घोडेस्वाराचें शारीरिक व बौद्धिक

कर्तृत्व वाढतें. बैल हा घोड्यापेक्षां ताकतींत व नाठाळपणांत कमी असल्यानें त्यावर प्रभुत्व स्थापणें घोड्यावर प्रभुत्व स्थापण्यापेक्षां सोपें असतें. घोडा आणि बैल यांत हा जो फरक तोच त्यांच्या मालकांत—त्यांच्यावर प्रभुत्व स्थापणारांत दिसून येतो. बैल हाकणारा माणूस हा घोडेस्वारापेक्षां बुद्धीनें व शारीरिक चपळाईनें हीन असतो, हा अनुभव सर्वत्र आहे. प्रभुत्व-स्थापनेच्या खटाटोपानें माणसाचें शारीरिक व बौद्धिक कर्तृत्व वाढतें असा याचा अर्थ होय. संस्कृति म्हणजे काय याची व्याख्या कोणी कोणतीही करो, शारीरिक व बौद्धिक कर्तृत्वाची वाढ ही संस्कृति-विकासास आवश्यक अशी भूमिका आहे हें कोणीही कबूल करील. म्हणून चरितार्थ-साधनें गुलामांच्या हातून उत्पन्न करून त्यांची वांटणी करणें व हा उत्पादन-विनिमयाचा व्यवहार सतत चालू ठेवणें, यासाठीं गुलामांवर प्रभुत्व स्थापन करण्याचा खटाटोप माणसानें केला. यामुळें या प्रभुवर्गाला सुबत्ता प्राप्त झाली व फुरसतही मिळाली आणि या सुबत्तेचा व फुरसतीचा उपयोगही माणसानें गुलामांवर म्हणजे उत्पादन-पद्धतीवर म्हणजे पर्यायानें सृष्टीवर प्रभुत्व गाजविण्यासाठीं केला. सृष्टीवर अधिकाअधिक प्रभुत्व स्थापण्यासाठीं त्यानें आपलीं हत्यारें अधिकः कर्तबगार केलीं. आणि याच क्रमांत गुलामगिरी, सरंजामशाही, भांडवलशाही, वगैरे अधिकाधिक कार्यक्षम अशा समाज-संघटनाही निर्माण केल्या. यांत्रिक उत्पादन व भांडवलशाही समाजपद्धति यांनीं माणसास सुबत्ता, फुरसत व प्रभुत्व या सर्वांचाच अधिक लाभ करून दिला असून त्याच्या संस्कृतिविकासास अधिकाधिक भरती आली आहे.

## यांत्रिक उत्पादनाचा पराक्रम

या प्रगतीस यांत्रिक व शास्त्रीय उत्पादनानें केलेली मदत विशेष

मोठी आहे. भांडवली उत्पादन याचा अर्थ एका भांडवलदारानें आपल्या पैशानें जमीन, हत्यारें, कच्चा माल वगैरे भांडवल उभारून पगारी मजुरांकरवीं माल निर्माण करणें व तो विकून नफा मिळविणें हा प्रकार. यामुळें संपत्तीचें केंद्रीकरण होतें. भांडवलदारवर्ग सधन व सत्ताधारी होत होता. बहुसंख्य समाजाचें जीवित रोजगारी मिळण्याच्या दृष्टीनें मूठभर धनिकांच्या कैचींत येत होतें. एकेकट्या कारागिराचे धंदे टिकणें अशक्य झालें होतें. यांत्रिक उत्पादन सुरू होण्यापूर्वीच्या हस्तव्यवसायी उत्पादनांत फारसा फरक न करतां केवळ धनोत्पादन-साधनें धनिकांच्या मालकींत येऊन व श्रम-विभागाचें तत्त्व या धंद्यांत शिरून भांडवलशाही सुरू झाली. पण सृष्टीवरील प्रभुत्व, धनोत्पादन, राज्यसत्ता, समाजसंघटना व विध्वंसक युद्धें या सर्वांचेंच आज जें भव्य व भयानक स्वरूप बनलें आहे तें यांत्रिक उत्पादनानें बनलें. हस्तव्यवसायी भांडवलशाहींत यंत्रशक्तीचा प्रवेश होऊन हस्तव्यवसाय पुढें मोडला तसा जर तो मोडला नसता, "कोळसा, वाफ, यंत्र हीं माणसाच्या हातीं लागलीं नसतीं, तर रोमन साम्राज्याच्या अखेरच्या काळांत ज़शी सामाजिक व आर्थिक प्रगति झाली तशीच आतांही झाली असती. जमिनी नष्ट झालेले शेतकरी, मजुरांचीं खिल्लारें, मोठ्या इस्टेटी, मोठ्या बँका, आणि समाजविध्वंसक अशी भांडवलाच्या केन्द्रीकरणाची पद्धति हे सर्व प्रकार पुन्हा आले असते. कारखाना म्हणजे सामुदायिक उत्पादन निर्माण झालें तें यंत्रामुळें नव्हे तर श्रमविभागामुळें. कपडे शिवणें, कार्डबोर्डच्या पेट्या करणें, खुर्च्या, बाकें, टेबलें, पलंग वगैरे सुतारकाम, रंगीत नकाशे, पुस्तकांतलीं चित्रें वगैरे प्रकारचीं कामें भांडवलदार लोक आपल्या कारखान्यांत हस्तव्यवसायी कारागीर नोकरीस लावून करून घेत व त्यावर नफा मिळवीत. ऑगस्टस

सीझरच्या काळीं रोममध्यें 'कारखाने' होतेच. उदाहरणार्थ, पुस्तकें विकणारे दुकानदार आपल्या दुकानांत नकला करणारांची रांगची रांग लिहिण्यास बसवून एका माणसास मोठ्यानें मजकूर वाचण्यास सांगत आणि सांगितलेला तो मज़कूर नकलकार उतरून घेत. मग या नकलांच्या म्हणजे ह्या पुस्तकांच्या अनेक प्रति म्हणून विकल्या जात.'' बायबलाचा प्रसार मुख्यत: याच उपायानें झाला. यांत्रिक युगापूर्वींचे श्रम एकत्रित करण्याचें व शक्ति वापरण्याचें माणसाचें साधनच तोकडें होतें. " जुन्या जगाची शक्ति ही फक्त माणसाच्या शरीराची होती. माणसाचे स्नायु ही काय ती त्याची शक्ति. हीं माणसें अजाण व मनानें दुबळीं अथवा गुलाम असत. बैल, घोडा हीच काय ती माणसाहून मोठी अशी शक्ति. एकादा मोठा खडक फोडायचा असला तर तो माणसांना आपल्या हातांनीं फोडावा लागे. शेत नांगरायचें तर माणसें आणि बैल यांना तें नांगरावें लागे. रोमन साम्राज्याचीं भूमध्य समुद्रांतून जाणारीं जहाजें हजारों गुलामांकडून वल्हविलीं जात. माणसांची प्रचंड संख्या याप्रकारें निवळ घाम गाळणाऱ्या शारीरिक कष्टांत गुंतलेली असे.'' अशा या परिस्थितींत माणसांचें दळणवळणही फार थोडें असून विहिरींतल्या बेडकाचे संकुचित जिणें हाच बहुसंख्य समाजाचा भोगवटा असे. बैलासंगतीं शरीर थकेपर्यंत राबणें, बैलाइतकाच बुद्धीचा उपयोग करणें आणि जवळ ज़वळ बैलाइतकाच संस्कृतिविकास करून घेणें बहुसंख्य समाजास शक्य होतें. ॲरिस्टॉटल् ज्या संस्कृति-विकासाचे गोडवे गातो तो संस्कृतिविकास अगदीं थोड्या अशा प्रभु वर्गासच उपलब्ध होई. बहुसंख्य समाज शरीरानें माणूस पण मनानें व संस्कृतीनें बैलाशीं बराच सदृश होता.

यांत्रिक उत्पादनानें हजारों वर्षांचें हें जीवन अजीबात पालटून

टाकलें आहे. अतिपरिचयानें या प्रचंड पालटाचें स्वरूप लक्षांत भरत नाहीं. आगगाड्या, तारायंत्र, टेलिफोन, मोटारी, विमानें, फोटोग्राफी, छापण्याची कला, चित्रपट, बोलपट यांनीं आतां एका गांवाचा माणूस प्रांताचा, देशाचा इतकेंच नव्हे तर खंडाचा व जगाचाही नागरिक झाला आहे. यंत्रानें आणि वाफेच्या व विजेच्या शक्तीनें अन्न, वस्त्र, आश्रय, आरोग्य, सुख, आनंद व संस्कृति यांच्या विकासाचीं साधनें माणसाजवळ अफाट वाढलीं आहेत. पूर्वीं माणूस चरितार्थ-संपादनाचे कामीं अतिशय दुर्बल व हताश असा आडमुठ्या सृष्टीपुढें उभा होता; पण आतां तीच सृष्टि त्याची गरज भागविण्यासाठीं त्याचेपुढें हात जोडून उभी आहे. माणसाचें कर्तृत्व या यंत्रशक्तीनें अफाट वाढविलें. अशोकापासून अकबरापर्यंत हिंदुस्तान एकराष्ट्र करण्याचे प्रयत्न अनेक राजांनीं केले, ते सारे फुकट गेले. आणि इंग्रजांना मात्र यश आलें, हें कसें? हें यश इंग्रजांना आलें नसून त्यांच्या व्यापारवाढीला व आगगाडीला आलें. इंग्लंड व स्कॉटलंड कित्येक वर्षें लढलीं; पण पुढें व्यापारवाढीनें एकराष्ट्र बनलीं. अनेक संस्थानांचें बनलेलें पण आपापसांत भांडणारें जर्मन राष्ट्र आगगाडीच्या जन्मानंतर एकजूट झालें आणि याच व्यापारानें व आगगाडीनें, पूर्वीं आपापसांत भांडणारे हिंदुस्तानांतील प्रांत एकजूट केले. यांत्रिक उत्पादनानें शस्त्रयुद्धाची कला फार मोठ्या प्रमाणांत वाढविली हा तिचा एक ठळक विशेष होय. मराठ्यांचा व दिल्लीच्या बादशहाचा पराभव आपापसांतील चुरशीमुळें, कर्तृत्वहीन माणसें पुढें आल्यामुळें, वगैरे अनेक कारणांनीं झाला असें आपण मानतों व तें कांहीं अंशीं खरेंहि दिसतें. पण पेशवाई अथवा मोंगलाई हींच राज्यें पाश्चिमात्यांच्या हल्ल्यापुढें कोलमडलीं असें नसून तुर्कस्तान, अफगाणिस्तान, चीन वगैरे जगांतलीं इतर राज्यें व संस्कृति पाश्चिमात्यां-

च्या हल्लयापुढें कोसळून पडल्या. याचें कारण अधिक कारीगार हत्यारें व अधिक कार्यक्षम संघटनाशक्ति हीं होत. बैलाचा प्रभु व घोड्याचा प्रभु या दोहोंत बैलाचा प्रभु हा मदड व अबुद्धिमान् असून घोड्याचा प्रभु हा चपळ व बुद्धिमान् असतो असें मागें म्हटलेंच आहे. ती गोष्ट येथेंही लक्षांत घ्यावी लागते. हिंदुस्तानांतील प्राचीन पद्धतीनें शेती करणाऱ्या नांगऱ्या शेतकऱ्याचें संघटना-कर्तृत्व, युद्धशस्त्रें व युद्धकला हीं जागतिक प्रमाणावर व्यापारधंदा, संघटना व युद्धें करणाऱ्या व पुढें यंत्रें, शास्त्रें यांत निष्णात झालेल्या पाश्चिमात्यांपुढें पराभूत झालीं हें स्वाभाविक असेंच घडलें. आज जर्मनी हा इंग्लंड-फ्रान्स यांसारख्या राष्ट्रांना भारी झाला आहे याचें कारण तरी यंत्रकला, शस्त्रकला व शास्त्रीय ज्ञान यांत जर्मनीनें प्रचंड प्रगति केली हेंच होय.

## शस्त्रसुधारणा व धनोत्पादनप्रकार

अर्थात् शस्त्रास्त्रांचा हा मुद्दा आणखी थोडें खोल शिरून समजून घेतला पाहिजे. ज्याचें हत्यार श्रेष्ठ तोच सर्वत्र विजयी होतो व त्याची संस्कृति प्रभावी होते, हें मत अनेक पाश्चात्य शास्त्रज्ञांनीं व आपल्या इकडे राजवाड्यांनीं मांडलें आहे. दाशरथि रामास राक्षसांवर विजय मिळाला याचें कारण राक्षसांपेक्षां रामाचीं हत्यारें श्रेष्ठ हें होय असें राजवाडे म्हणत असून मराठ्यांचा पराभव इंग्रजांच्या लांब पल्ल्याच्या तोफांनीं झाला असें राजवाडे म्हणतात. जर्मनीचा आजचा विजय अधिक कार्यक्षम शस्त्रास्त्रांनींच होत असल्याचें आपणांस माहीत आहेच.

येथें असा प्रश्न उद्भवतो कीं मराठ्यांनीं लांब पल्ल्याच्या तोफा ओतल्या असत्या तर ते इंग्रजांचा पराभव करूं शकले असते; पण मग मराठ्यांनीं लांब पल्ल्याच्या तोफा कां ओतल्या नाहींत? मराठ्यांना लांब पल्ल्याच्या तोफा ओतणेंच अशक्य होतें हें या

प्रश्नाचें उत्तर आहे. मराठ्यांचे व मोगलांचे शेतकरी ज्या वेळीं खेड्यांतले लहान लहान धंदे, आणि मागसलेल्या शेतीचे जिवापाड कष्ट करून विहिरींतल्या बेडकाप्रमाणें आपल्या संकुचित जगांत दुर्बलतेनें राहात होते, त्या वेळीं युरोपचीं जहाजें जगाच्या सर्व बंदरांत नांगरत होतीं, मालाची ने-आण करीत होतीं, मोठमोठ्या सडकांनीं व्यापार खूप चालू झाला होता, भांडवलशाहीनें धनाचें केन्द्रीकरण केलें होतें व त्याची एकसारखी वाढ होत होती. खाणींतलें लोखंड शुद्ध करणें, त्याचे पत्रे करून जहाजें बांधणें, ही कला वाढली. परमुलुख-संचारासाठीं युद्धकला वाढविणें अवश्य झालें आणि जहाजांचा पत्रा तयार करण्याच्या कलेबरोबरच त्याच धातूच्या तोफा गाळण्याची कलाही पाश्चात्यांनीं संपादिली. सांगण्याचा मुद्दा हा आहे कीं, तोफा गाळण्याची कला ही पाश्चात्यांच्या अंगीं एकटी अथवा सुटी आलेली नव्हती. व्यापारधंद्यासाठीं जहाजें करावीं लागलीं, त्यासाठीं लोखंडाच्या खाणी उपसाव्या लागल्या, पोलादाचा धंदा निघाला आणि त्यांतच व्यापारधंद्याच्या संरक्षणार्थ युद्धाची गरज म्हणूनच ज्या तोफा गाळण्यांत आल्या त्या मराठ्यांवर डागून त्यांचा इंग्रजांनीं पराभव केला. मराठ्यांचा आर्थिक उत्पादनप्रकार मागसलेला होता. जहाजांसाठीं पोलादाचा धंदा त्यांना काढावा लागला नाहीं. अर्थात् पोलादाचा धंदाच नसल्यानें लांब पल्ल्याच्या तोफा गाळणें त्यांना शक्य नव्हतें. आज जर्मनीचीं शस्त्रास्त्रें इंग्लंड-फ्रान्सपेक्षां सरस आहेत याचें कारण गेल्या वीस वर्षांत जर्मनीनें सर्व प्रकारची आपली धनोत्पादन-शक्ति इंग्लंड-फ्रान्सपेक्षां वाढविलेली असून, त्याच क्रमांत शस्त्र-निर्माणशक्ति व युद्धकलाही वाढविली हें आहे. आणि, जर्मनीच्या आर्थिक उत्कर्षाचें साधन म्हणूनच जर्मनींत शस्त्रकलेची व युद्धकलेची वाढ करण्यांत आली हें लक्षांत ठेवलें पाहिजे. युद्ध-

कलेच्या वाढीचें मूळही याप्रमाणें आर्थिक उत्पादनकलेंत असतें. जोंवर चरितार्थाची सामुग्री ही जीवनांतील झगड्याचें प्रधान अंग आहे तोंवर सर्व मानवी खटाटोपाचा मूलाधार आर्थिक उत्पादन हाच राहणार हें उघड आहे.

यांत्रिक-आर्थिक उत्पादन हा जसा युद्धकला इत्यादींचा मूलाधार तसाच या यांत्रिक उत्पादनाचा मूलाधार भांडवलशाही हा आहे. कारण भांडवलशाही नसती तर यांत्रिक उत्पादन सुरूच झालें नसतें. दोन हजार वर्षांपूर्वी अलेक्झांड्रिया येथें एक शास्त्रीय प्रयोगशाळा होती. तेथील शास्त्रज्ञ हीरो यानें वाफेचें एंजिन तयार केलें होतें. पण त्या वेळीं त्याचा उपयोग होण्यास आर्थिक उत्पादनाची अनुकूलता नव्हती. पुढें अठराव्या शतकाच्या अखेरीस जेम्स वॅटनें वाफेच्या एंजिनाचा शोध लावला त्या वेळीं हस्तव्यवसायांचें केंद्रीकरण करून भांडवलशाही भरभराटलेली होती. जगभर जहाजें व माल यांची जा-ये चालू होती. पक्क्या सडकांनीं देशांतल्या देशांत माल व माणसें यांची वाहतूक वाढली होती. राज्यशासनांत शिस्त आली होती आणि या सर्व कारणांमुळें रोज नवे नवे बाजार उत्पन्न होऊन भांडवलदारांना ते नफ्याची ओढ लावीत होते. अशा परिस्थितींत वाफेचीं एंजिनें निर्माण होतांच तीं या भांडवलदारांनीं आपल्या धनोत्पादनकार्यास जुंपलीं. गुलामांना उत्पादनकार्यास स्वयंप्रेरणा नव्हती. चाबकाच्या भीतीनेंच गुलाम श्रम करीत. तसेंच भांडवलशाहीच्या काळीं मजूर स्वतःच्या प्रेरणेनें श्रम करीत नसून मजुरीच्या आशेनें श्रम करीत. स्वतः कारखानदारही नफ्याच्या आशेनेंच धंदा वाढवीत होता. पण अनेक मजुरांना जमवून व त्यांना हत्यारें पुरवून, मालाला बाजार दाखवून, यंत्रें वापरून, भांडवलाच्या बँका काढून व हजारों लोकांचें थोडेंथोडें भांडवल जमवून संयुक्त भांडवलाच्या कंपन्या काढून व

जगभर व्यापारवाढीसाठीं साम्राज्यें स्थापून भांडवलदारांनीं खाजगी नफ्याच्या बुद्धीनेंच जागतिक अर्थोत्पादनाची प्रचंड संघटना केली. धनोत्पादनाचे कामीं मानवजातीस भरभराटीस आणलें; पण गुलामगिरी व सरंजामशाही यांनीं ज्याप्रमाणें आपापल्या काळीं धनोत्पादनकार्याचा वेग वाढविला आणि पुढें हें धनोत्पादन-कार्य सुधारण्याचें त्यांचें सामर्थ्य संपतांच, गुलामगिरी मरून सरंजाम-शाही आणि सरंजामशाही मरून भांडवलशाही उदयास आली त्या-प्रमाणें भांडवलशाहीचें कार्य संपून आतां समाजशाही म्हणजे समाज-सत्ता निर्माण करण्याची गरज उत्पन्न झाली आहे असें मार्क्स म्हणतो. धनलोभी भांडवलदारांच्या प्रयत्नानें जागतिक धनोत्पादन-कार्याची संघटना होऊन माणसाचें धनोत्पादन-सामर्थ्य वाढलें खरें; पण जोंपर्यंत भांडवलदारास वाढत्या प्रमाणांत नफा मिळत राहील तोंवरच हें कार्य तो करीत राहील आणि या कामीं अडथळा झाल्यास माणसाचें उत्पादनसामर्थ्य कमी करील, जागतिक उत्पा-दनसंघटना मोडील, इतकेंच नव्हे तर धनलोभापायीं मानवजाति व संपत्ति यांचा संहार केल्याखेरीज हा भांडवलदार राहणार नाहीं असा अनुभव भांडवलशाहीच्या जन्मापासून आला आहे.

इंग्लंडांत प्रथम यांत्रिक भांडवलशाही सुरू झाली तेव्हां मजुरांची पिळवणूक व छळ भांडवलदारांनीं एवढ्या भयंकर प्रमाणांत केली, कीं त्या वेळचीं तीं वर्णनें वाचून अंगावर शहारे येतात. त्यानंतर हिंदुस्तानसारख्या मागसलेल्या प्रदेशांत मालविक्रीसाठीं भांडवलदारांनीं मोर्चा वळविला व तरवारीच्या साह्यानें देशभर रक्ताचे सडे शिंपून सत्तेचे बाजार व साम्राज्यें स्थापन केलीं. भांड-वलदारांच्या या यांत्रिक मालाशीं चढाओढ करण्यांत चीन, हिंदु-स्थान यांसारख्या मागसलेल्या देशांतील लक्षावधि हस्तव्यवसायी

लोक घरादारासुद्धां देशोधडीस लागले. जग जिंकण्याच्या या हव्यासांत भांडवलदार राष्ट्रांनीं आपसांत भयानक युद्धें माजवून खाटकानें मेंढरें कापावीं त्याप्रमाणें 'सुधारलेल्या' या माणसांनीं सुधारलेल्या माणसांच्या कत्तली केल्या. आतां जवळ जवळ साम्राज्यशाही युद्धें व त्यासाठीं शस्त्रास्त्रनिर्मिति हाच 'धनोत्पादन-प्रकार' (!) म्हणून पुढारलेल्या राष्ट्रांत रूढ झाला आहे. अतिप्राचीन काळीं एका माणसानें मारलेली शिकार हिसकून घेण्यासाठीं दुसऱ्यानें त्याच्याशीं लढावें हा रूढ असलेला प्रघात रानटी मानला जाऊन, दोघांनीं मिळून परस्परसाहाय्यानें दोनच काय पण अनेक शिकारी करणें शक्य आहे व हाच सुधारलेला मार्ग होय असें मानलें जाऊं लागलें होतें. पण त्यानंतरच्या हजारों वर्षांनीं आज भांडवलदार राष्ट्रें पुन्हा रानटी प्रघातांचें पुनरुज्जीवन करीत आहेत. दोन राष्ट्रांच्या सहकार्यानें धनोत्पादन वाढविण्याऐवजीं एकमेकांस मारून मानवजातीचा व धनाचा विध्वंस करीत आहेत. खरोखर धनोत्पादन वाढविण्याची गरज आतां कमी झाली आहे असें नाहीं. खायला अन्न नाहीं, अंगावर वस्त्र नाहीं, आश्रयाला चांगलेंसें घरदार नाहीं, निरोगी हवा नाहीं, संस्कृति, शिक्षण यांची सोय नाहीं, अशा अवस्थेंत लक्षावधि स्त्रीपुरुषांचीं खिल्लारें, पोरें पाठीस बांधून शस्त्रास्त्रांच्या धडधडाटानें बावरलेलीं अशीं मरणाच्या दारांत उभीं आहेत. या सर्वांना भोग्य धनाची गरज असतां तें उत्पन्न करण्याऐवजीं अथवा आहे तें धन वाटून टाकण्याऐवजीं त्याच्या विध्वंसाचीं साधनें निर्माण करण्यासाठीं मानवी श्रम खर्च करण्यांत येत असून, प्रत्यक्ष विध्वंसाचें काम स्वदेशभक्तीच्या आणि ईश्वराच्या नांवानें चाललें आहे; पण यांत स्वदेश नाहीं, ईश्वर नाहीं—कांहीं नाहीं. खाजगी नफ्यांचा लोभ हाच या सर्वांच्या बुडाशीं आहे.

सर्व विद्यमान साम्राज्यवादी राष्ट्रांनीं जगाचे बाजार काबीज केल्यानें आतां समुद्र मागें हटवून, शंभर मजली इमले उठवून, पृथ्वीची कितीहि ओढाताण करून, बाजार अधिक वाढत नाहींत. जास्तींत जास्त नफा मिळविण्यासाठीं कमींत कमी मजुरीवर जगांतील मजुरांना राबविल्यानें या मजुरांची खरेदीशक्ति कमी होते. यामुळें माल पडून राहून माल संभाळण्याच्या जागा, रखवाली वगैरे खर्च वाढतो म्हणून कापसाचीं पिकलेलीं शेतें जमिनींत परत तशींच नांगरून टाकलीं जात आहेत, कारखाने बंद करण्यांत येत आहेत आणि मजुरीचे दर आणखी आणखी कमी केले जात आहेत. नवीन पुढें येणाऱ्या भांडवलदार राष्ट्रांना नफ्याची व मुलखाची हाव उत्पन्न होत असल्यानें जुन्या भांडवलदार राष्ट्रांचीं नव्या भांडवलदार राष्ट्रांशीं युद्धें होत आहेत. मानवोन्नति करण्याची भांडवलशाहीची शक्ति संपली असा याचा अर्थ आहे. यापुढें धनोत्पादनसाधनावरील खाजगी मालकी नष्ट करून म्हणजे भांडवलशाहीचा अंत करून धनोत्पादनसाधनें सार्वजनिक मालकीचीं करणें व समाजहितासाठीं त्यांचा वापर करणें—म्हणजेच समाजवाद स्थापणें हाच मार्क्सच्या मतें मानवोन्नतीचा मार्ग आहे.

# मार्क्स आणि हेगेल : : ५

मार्क्सचा हा भौतिकवाद म्हणजे भौतिक व मुख्यतः आर्थिक दृष्टीनें इतिहासाचा उलगडा करून घेण्याची पद्धति होय. या पद्धतीनें इतिहासाचा उलगडा मार्क्स कसा करतो याचा येथवर गोषवारा सांगितला. ही विचारपद्धति मार्क्स व एन्जल्स या दोघांनींच प्रथम मांडली आहे. पण दोघेहि या विचाराचे बाबतींत हेगेल या जर्मन तत्त्वज्ञाचें ऋण मान्य करतात आणि उलट त्याची सर्व विचारसरणी आपण उलटीची सुलटी केली असेंहि म्हणतात. मार्क्सनें हेगेलचें घेतलेलें हें ऋण कोणतें व त्याचें रूपांतर त्यानें केलें तें काय, हें समजल्यावांचून मार्क्सच्या भौतिकवादाची माहिती पूर्ण झाली असें मानण्याचा प्रघात नाहीं; म्हणून तो विषय येथें संक्षेपतः देतों.

## मार्क्स व हेगेल यांचे मतभेद

मार्क्स स्वतः हेगेलचें ऋण कबूल करतो, पण त्याचे हेगेलशीं असलेले मतभेद अगदीं मूलग्राही आहेत. हेगेलचें तत्त्वज्ञान धार्मिक स्वरूपाचें आहे. ईश्वर हा जगाचा आधार हें त्याचें मुख्य सूत्र आहे. "माणूस व सृष्टि यांच्या उत्पत्तीपूर्वी ईश्वर आपल्या अनाद्यनंत चिद्घन स्वरूपांत असतो. तो कसा असतो हें दाखविणें हेंच आपल्या तत्त्वज्ञानाचें कार्य आहे" असें हेगेल म्हणतो. पण ख्रिस्ती पुराणांत जी तर्कशुद्धता नव्हती ती घालून त्यानें हें 'धर्मशास्त्र' बनविलें. सत्तत्त्व व नामरूपात्मक पसारा, अव्यक्त मन व व्यक्त सृष्टि, मी आणि जगत्, सदसद्विवेक-बुद्धि आणि सृष्टिधर्म यांत विरोध नसून एकाच विकासी अवस्थेचीं

हीं अनंत रूपें आहेत असें तो म्हणतो. 'बहुस्यां' (आपण पुष्कळ व्हावें) अशी ज्याप्रमाणें श्वेताश्वतरोपनिषदांतल्या ब्रह्मानें इच्छा केली व मागाहून सृष्टिपसारा सुरू झाला, त्याप्रमाणें ईश्वरेच्छा ('वुइल') प्रथम होती तींतून सर्व विश्व क्रमाक्रमानें अवतरलें असें हेगेल सांगतो. मार्क्स-ला हेगेलच्या या विचारसरणीचा केवळ तिटकारा आहे. सर्व कर्तृत्व ईश्वरेच्छेचा परिपाक आहे म्हटलें म्हणजे मनुष्य-कर्तृत्वाला जागाच राहात नाहीं. दुसरी गोष्ट म्हणजे सृष्टींत द्वंद्व, विरोध नाहींच म्हटलें म्हणजे अमुक एक वाईट आहे, तें बदललें पाहिजे ही विचार-सरणी स्वीकारतांच येत नाहीं. म्हणून हेगेलची विचारपद्धति लव्हाळ्याप्रमाणें येईल त्या परिस्थितीस मान तुकविण्यास लावणारी आहे, माणसाला शोभणारी नव्हे, असें मार्क्सचें मत दिसतें.

ईश्वराची इच्छा सृष्टींत जें जें घडवून आणीत आहे व मानवी जीवनांत ज्या अनेक अवस्था तिनें निर्माण केल्या आहेत, त्या सर्व तर्कशुद्ध आणि 'आधीं फूल, मग फळ' अशा अनुक्रमप्राप्त असल्यानें, जें घडतें तें सर्व चांगलें अथवा अपरिहार्य असतें असें हेगेल दाखवी. याच क्रमांत जर्मनींत जी अनियंत्रित राजाची सत्ता उत्पन्न झाली ती ईश्वरी इच्छेचा परिपाक आहे असें हेगेल सुचवितो. हेगेलच्या या मताची चेष्टा करतांना मार्क्स म्हणतो, " 'राजाच्या इच्छेनें सर्व गोष्टी घडतात' असें राजाचें सरळ वर्णन करण्यापेक्षां 'ईश्वरी इच्छेचें प्रतीक म्हणजे राजा' असें हेगेल सांगतो. पहिलें विधान ही अनुभवसिद्ध घटना आहे. पण दुसऱ्या विधानानें ही अनुभवसिद्ध घटना गूढ तत्त्वज्ञानांत झाकून टाकली आहे." राज्य-संस्था ही ईश्वरेच्छेचें परमोच्च स्वरूप असें हेगेल मानी. उलट, धनिक-

वर्गाची सत्ता गाजविण्याचें हत्यार म्हणजे राज्य असा मार्क्सचा सिद्धान्त होता.

## हेगेलचें मार्क्सनें घेतलेलें ऋण

हेगेल व मार्क्स यांमधील हा विरोध मूलग्राही असूनही हेगेलचें ऋण आपण कां कबूल करतों हें 'कॅपिटल'च्या प्रस्तावनेंत मार्क्सनें पुढीलप्रमाणें सांगितलें आहे. मार्क्स लिहितो, " मी जाहीरपणें हेगेल या सामर्थ्यसंपन्न तत्त्वज्ञाचा स्वतःला शिष्य मानतों. 'कॅपिटल'मध्यें मूल्यसिद्धान्तावरील प्रकरणांत हेगेलची विशिष्ट अशी परिभाषा मीं वापरली आहे. हेगेलनें 'डायलेक्टिक' (म्हणजे विरोधविकासात्मक) विचारपद्धति गूढ करून सांगितली खरी; पण एकंदरीनें या पद्धतीची मांडणी त्यानेंच पहिल्यानें सर्वंकषपणें व हेतुपूर्वक अशी केली आहे. त्याची विरोध-विकासपद्धति 'खालीं डोकें वर पाय' अशी उभी आहे. तुम्हांला जर त्या गूढत्वाच्या कवचींतलें वास्तवात्मक खोबरें हवें असेल, तर तुम्हीं 'तिला डोकें वर पाय खालीं' अशी उभी केली पाहिजे. या गूढतेमुळें जर्मनींत ही पद्धति मोठी प्रतिष्ठा पावली. कारण चालू परिस्थिति हीच उत्तम असें तीमुळें ठरत होतें. म्हणून अनियंत्रित राज्यसत्ता व भरभराटणारे भांडवलदार या दोघांनाही ती हवीशी वाटली; पण तिचें वास्तववादी स्वरूप जर लक्षांत घेतलें, तर भांडवलदार व त्यांचे तत्त्ववेत्ते यांना ती अतिशय तिरस्कार्य वाटेल. कारण तिच्या व्यापक स्वरूपांत सद्यःस्थितीचें समर्थन होतें तसाच तिचा विनाशही शक्य व समर्थनीय ठरतो. प्रत्येक ऐतिहासिक घटना प्रवाही आहे व म्हणून कोणत्याही विद्यमान परिस्थितीचा जसा विचार या पद्धतींत होतो त्याचप्रमाणें सध्यांची अवस्था ही अल्पकालीन आहे याचाही विचार होतो. या विरोधविकास-विचार-

पद्धतीवर कोणत्याही शब्दप्रामाण्याचा पगडा बसत नाहीं. ती पूर्ण विवेचक आणि क्रांतिकारक आहे."

## व्यक्ति आणि समाज

हेगेलच्या या विरोधविकासात्मक विचारपद्धतीचें वैशिष्ट्य काय व आपण ती कां पत्करली हें मार्क्सनें या उताऱ्यांत बरेंच स्पष्ट सांगितलें आहे. भांडवलदार वर्गाचें इंग्लंड–फ्रान्समध्यें जें व्यक्तिवादी तत्त्वज्ञान होतें त्यावर हेगेलच्या तत्त्वज्ञानानें हल्ला केला. व्यक्तिस्वातंत्र्य हा भांडवलशाही तत्त्वज्ञानाचा मुख्य आधार होता, व्यक्ति हा समाजाचा आधार, व्यक्तीसाठीं समाज-घटना आहे, समाजांत व्यक्तीव्यक्तींनीं स्वार्थबुद्धीनें केलेल्या चढाओढीनेंच समाजाची प्रगति होते, व्यक्तीच्या हिताच्या आड समाजबंधनें येतील तर तीं झुकारून देण्याचा हक्क व्यक्तीस आहे, वगैरे....ही ब्रिटिश-फ्रेंच भांडवलशाही तत्त्वज्ञांची विचारसरणी होती. उलट हेगेल हा व्यक्तीला स्वतंत्र अस्तित्व असूं शकतें हें मान्यच करीत नाहीं. समाज आहे म्हणून व्यक्ति आहे; समाजहिताहून भिन्न असे हक्क व्यक्तीला असूंच शकत नाहींत. व्यक्तीव्यक्तींच्या हक्कांच्या भूमिकेवर समाजरचना करणें गैर असून एकंदर समाजाच्या हिताच्या दृष्टीनेंच समाजरचना केली पाहिजे. त्यांत ज्या व्यक्तीस जो हक्काचा व कर्तव्याचा वांटा उचलावा लागेल तो त्याचें कल्याण साधणारा असेल असेंच मानलें पाहिजे. मार्क्सनें हेगेलची ही विचारसरणी विवेचकपद्धतीनें मांडून मान्य केली आहे. "मनुष्य जगांत जन्माला येतो तो कांहीं आपलें प्रतिबिंब पाहण्यासाठीं आरसा घेऊन येत नाहीं. दुसरीं माणसें भोंवतालीं पाहतो व आपल्या स्वरूपाची त्याला ओळख होते." "माणसाला 'अहं' अशी जी जाणीव होते ती कांहीं केवळ आत्म्याचा

हुंकार नव्हे. आत्म्यावर जड द्रव्यांचें किटाळ पसरलेलें आहे. त्याला आवाजाचें व गतिमान् अशा हवेच्या लाटांचें स्वरूप येतें. तोच हुंकार होय. थोडक्यांत यालाच आपण बोलणें म्हणतों. बोलणें हें सामाजिक व्यवहाराच्या गरजेंतून निर्माण होतें.'' मानव व्यक्ति या समाजांत अशा परस्परावलंबी असतां भांडवलदारांनीं भांडवलशाही उत्पादन हें वैयक्तिक आहे असें मानून समुदायानें उत्पन्न केलेल्या धनावर वैयक्तिक मालकी स्थापली, त्यामुळें भांडवलशाही उत्पादनांत अनर्थ उद्भवला; पण उत्पादन हें सामुदायिक आणि सर्व समाजाचें आहे हें लक्षांत घेऊन सामुदायिक हितबुद्धीनें धनोत्पादन होईल तर हे अनर्थ टळतील व धनाचा समाजासाठीं उपयोग होईल असें मार्क्सनें प्रतिपादिलें आहे.

## ख्रिस्ताच्या शिकवणुकीस विरोध

खरें बोलावें, जगांतील सर्व प्राणि-मात्रांवर प्रेम करावें, स्वत:च्या सदसद्विवेक बुद्धीप्रमाणें चालावें वगैरे ख्रिस्त, रूसो इत्यादींच्या शिकवणुकीस हेगेल व मार्क्स या दोघांचाहि सारखाच विरोध होता. पण दोघांचींहि विरोधाचीं कारणें वेगवेगळीं होतीं. 'हीं तत्त्वें क्रांतिकारक असून राज्यसंस्थेची कदर त्यानें मोडली जाते' हें हेगेलच्या विरोधाचें कारण होतें; तर हीं तत्त्वें प्रतिक्रांतिकारक आहेत म्हणून मार्क्स त्यांना विरोध करीत होता. हेगेल म्हणे, नैतिक आदेश हे त्रिकालाबाधित असूं शकत नाहींत. आधीं समाजबंधनें निर्माण झालेलीं असतात त्यांस अनुकूल असेच नैतिक आदेश निर्माण झाले पाहिजेत. "ज्या माणसांची आपली ओळख नाहीं, ज्यांच्याशीं आपला कांहींहि संबंध पोंचत नाहीं अशाही माणसावर प्रेम करण्याची कल्पना केवळ भंपक आहे.'' ख्रिस्ताच्या शिकवणीसंबंधानें हेगेल म्हणतो, "भांडवलशाही समाज-

घटनेच्या, मालकी हक्काच्या, आत्मसंरक्षणाच्या मूलभूत भूमिकेशींच ख्रिस्ताच्या शिकवणुकीचा विरोध आहे.....ख्रिस्ताच्या शिकवणुकी-अनुसार जगूं पाहणाऱ्या राज्याच्या चिंधड्या होतील."

ख्रिस्ताच्या शिकवणुकीस हेगेलेचा विरोध होता तो राज्यसंस्थेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें होता, तर मार्क्सचा विरोध वर्गीय दृष्टीनें होता. समाजसंघटनेस नीतितत्त्व हा मुख्य आधार असतो हें मार्क्सला अमान्य नाहीं. 'कॅपिटल' ग्रंथभर त्याची तक्रार आहे ती 'मजुरांनीं केलेल्या श्रमाचें फळ त्यांना न मिळतां भांडवलदारांना मिळते ही अनीति होय' याच स्वरूपाची आहे. ही लूट आहे, हा दरवडा आहे असें मार्क्स म्हणतो. पण हें तो फक्त मजुरांच्या दृष्टीनें बोलतो, भांडवलदारांचा ही 'लूट' मिळविण्याचा ऐतिहासिक हक्क तो अमान्य करीत नाहीं. आणि मग दोन न्याय्य हक्कांचा विरोध जेथें आला तेथें बलानेंच निर्णय घेतला पाहिजे असा सिद्धान्त मार्क्स मांडतो. मजुराला भांडवलदारावर अथवा भांडवल-दाराला मजुरावर प्रेम करा असें तो सांगत नाहीं. मजुरांनीं आपले हक्क झगडून हस्तगत केले पाहिजेत हा त्यांचा नैतिक हक्कच आहे असें तो म्हणतो. नैतिक तत्त्वें कोणतींच त्रिकालाबाधित नसतात. 'प्रेम करा' 'स्वार्थत्याग करा' ही शिकवण सर्वत्र सारखीच खरी नव्हे. मजुरांनीं भांडवलदारासाठीं स्वार्थत्याग न करतां आपला स्वार्थ प्रस्थापित केला पाहिजेच. पण कामगार-संघटनेचे बाबतींत मजुरानें स्वार्थत्याग करणें योग्य ठरेल. उलट कामगार हा भांडवलदारावर प्रेम करूं लागेल तर स्वतःच्या वर्गीय हिताचा द्रोह त्यास करावा लागून तें त्याचें वर्तन प्रतिगामी ठरेल. त्रिकालाबाधित नीतितत्त्वें हीं मार्क्सच्या मतें बहुतेक वेळीं पोकळ, निष्फळ व खोटीं ठरतात. खाजगी मालकी ही केव्हांही चोरी आहे असें प्रुधाँ हा फ्रेंच तत्त्वज्ञ म्हणे. मार्क्स त्यास

उत्तर देतो कीं, सर्वच वेळीं खाजगी मालकी ही चोरी आहे हें म्हणणें खरें नाहीं. सरंजामशाहीचा पाडाव करून भांडवलदारांनीं धनोत्पादन-साधनांत जी विलक्षण क्रांति केली ती भांडवलदारांना खाजगी नफ्याची ओढ नसती तर त्यांनीं केली नसती. या दृष्टीनें खाजगी मालकीनें मानवजातीच्या प्रगतीस मोठीच मदत केली आहे हें कबूल करावें लागतें. पण हा प्रगतिकारक गुण आतां भांडवलशाहींत उरला नसल्यानें यापुढें मात्र धनोत्पादन साधनावरील खाजगी मालकी ही चोरी होईल.

## स्थिर कांहींही नाहीं

सृष्टि व मानवी जग यांची कोणतीही अवस्था स्थिर नाहीं हें हेगेलचें मत मार्क्सला विशेष महत्त्वाचें वाटलें. बदल होतो तो ईश्वरेच्छेनें होतो असें हेगेल म्हणे तर तो आर्थिक उत्पादन-प्रकारानें होतो असें मार्क्सचें मत होतें. पण सरंजामशाहीचा नाश होऊन व्यक्ति-स्वातंत्र्य, व्यवसायस्वातंत्र्य यांची सुप्रभात सुरू झाली या आनंदांत भांडवलशाहीचें तत्त्वज्ञ गर्क होते आणि बहुसंख्य समाजाच्या पिळणुकीनें आपल्या तिजोऱ्या कायमच्या भरून वाहत राहणार अशा आशेनें भांडवलदार हुराळलेले होते. पण दोघांचीं हीं सुखस्वप्नें खोटीं असून गुलामगिरी आली आणि गेली, सरंजामशाही आली आणि गेली, त्याच क्रमांत भांडवलशाही आली ती जाईल व बहुसंख्य समाजाची चालू असलेली पिळणूक धनोत्पादन भरपूर होऊं लागून थांबेल असें आश्वासन मार्क्स अखिल जगांतील बहुसंख्य समाजास देत आहे. स्वतः हेगेल आपल्या तत्त्वज्ञानाचें क्रांतिकारकत्व, त्याच्या-वेळची जर्मन राज्यसत्ताही नाश होणार आहे या दृष्टीनें, कबूल करीत नव्हता. पण हेगेलनें एकदां क्रांतिकारक विचारसरणी मांडल्यानंतर ती अमुक ठिकाणीं थांबावी म्हटल्यानें थांबू शकत नाहीं, त्यानें मानव-

समाज क्रांति-पथावर चालत आला आहे हें सिद्ध केलें हीच हेगेलची मोठी कामगिरी होय असें मार्क्सचें म्हणणें आहे.

## हेगेलचा ‘ विरोध-विकास ’

मार्क्सच्या हेगेलसंबंधींच्या वरील उताऱ्यांत ‘डायलेक्टिक’चा म्हणजे विरोध-विकासपद्धतीचा जो उल्लेख आला आहे त्याचा येथें थोडासा खुलासा करूं. ‘ डायलेक्टिक’ हा शब्द पूर्वी ग्रीक तत्त्वज्ञांच्या वादविवाद-पद्धतीस लावला जाई. सत्य तत्त्व कोणतें हें समजून परस्पर-विरुद्ध मतवाद्यांनीं वकिली पद्धतीनें एक-मेकांच्या युक्तिवादास प्रति-युक्तिवाद भिडवावे म्हणजे चकमकींतून विस्तव पडतो त्याप्रमाणें विरोधी युक्तिवादांतून अखेर सत्यनिष्पत्ति होते असें ग्रीक तत्त्वज्ञांचें मत होतें. या वादपद्धतीस ‘वादे ‘डायलेक्टिक’ अथवा ‘विरोधविकास-पद्धति’ असें नांव होतें. वादे जायते तत्त्वबोधः’ असें वचन आपल्या इकडेहि रूढ आहे. सृष्टीचा विकास कांहींसा अशा विरोधी तत्त्वांनीं झाला, असें हेगेलचें म्हणणें आहे. कोणतेंही एक तत्त्व निर्माण होऊन अतिरेकाला गेलें कीं, त्याची प्रतिक्रिया त्याच्याच गर्भांत सुरू होऊन विरोधी तत्त्व जन्माला येतें. या विरोधीतत्त्वांत मूळच्या तत्त्वांतील कांहीं भाग स्वीकारलेला असतो व नवीन भरही असते. असें हें नवें तत्त्व जुन्याचा संहार करून वाढत जातें व पुन्हा त्याचा अतिरेक होऊन तद्विरोधी पण उच्चतर भूमिकेचें नवें तत्त्व जन्मास येतें. हा विकासक्रम कधींच थांबत नाहीं. एका काळीं गुलामगिरीचें तत्त्व अमलांत होतें त्याचा अतिरेक होऊन हळूहळू गुलामांना कांहींसें स्वातंत्र्य मिळालें व तें सरंजामदारांचे भू-दास होऊन सरंजामशाही उत्पन्न झाली. तिचा पुनः अतिरेक होऊन ही अर्धवट गुलामगिरीची भूदास-पद्धति नष्ट होत गेली व खाजगी नफा आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांवर आधारलेली

भांडवलशाही सुरू झाली. या खाजगी मालकीच्या तत्त्वाचाहि आतां अतिरेक झाला आहे. खाजगी मालकीचें तत्त्व जगद्वंद्य ठरून प्रत्यक्ष व्यवहारांत शेंकडा १० खाजगी मालकांनीं सर्व समाजाची संपत्ति खिशांत घातली आहे, तर बाकीच्या ९० ना खाजगी मालकीचें स्वातंत्र्य देण्यांत आलें असून प्रत्यक्ष मालकीची वस्तु अशी खिशांत कांहींही नाहीं. यामुळें आतां खाजगी मालकी नष्ट होऊन सामाजिक मालकीचें म्हणजे समाजवादाचें तत्त्व पुढें येणें क्रमप्राप्त आहे असें हेगेलच्या विचारसरणीवरून सिद्ध होतें. हेगेल स्वतः मात्र खाजगी मालकीच्या पलीकडे आपल्या तत्त्वाचा विकास होणार असल्याचें बोलत नव्हता.

## मार्क्सचा विरोध-विकास

मार्क्सला हा विकासक्रम मान्य आहे; पण हा विकास अमूर्त अशा 'इच्छे'नें ( वुइल ) घडत असतो असें जें हेगेलचें म्हणणें आहे तें मार्क्सला मान्य नाहीं. आत्मा अथवा इच्छा म्हणजे ईश्वरेच्छा अमूर्तपणें कांहीं करूं शकते अथवा अस्तित्वांत असते हेंच मार्क्सला मान्य नाहीं. मानवी जगांत हेगेल म्हणतो तसे पालट होतात खरे. पण ते अमूर्त अशा 'इच्छा' देवीकडून केले जात नसून माणसाच्या हेतुपूर्वक प्रयत्नानें हे पालट घडून येतात असें मार्क्स सांगतो. अमुक एका तत्त्वाचा अतिरेक होतो ह्या हेगेलच्या म्हणण्याचा अर्थ 'मानवविकासाला तें तत्त्व पूर्वीं उपयोगी होतें पण आतां अडथळा करूं लागतें' असा असतो. हीं तत्त्वें मुख्यतः धनोत्पादनाचा खटाटोप माणसें करीत असतांना त्यास उपकारक अशा प्रकारें उत्पन्न होतात असें मार्क्स सांगतो. शेती, शिकार व युद्धें करून मानवसमाज एका काळीं राहत असे. त्यावेळीं बरेंचसें व्यक्ति-स्वातंत्र्य होतें, पण लोकसंख्येच्या वाढीनें जास्ती जास्ती धनाची

गरज वाटूं लागली. व्यक्तीस धाकदपटशा दाखवून त्यास त्याची गरज भागून उरेल इतकें धन निर्माण होण्याची शक्यता उत्पन्न झाली. तेव्हां युद्धांत शत्रूचे पकडलेले कैदी गुलाम करून चाबकाच्या धाकानें त्यांना राबविण्याचा उत्पादनप्रकार रूढ झाला. या क्रमानें कांहीं काळ धनोत्पादन वाढत गेलें. पुढें गुलामांना उत्पादनकला चांगली अवगत होऊन ती त्यांच्या अंगवळणीं पडली. आणि त्यांना त्यांनीं उत्पन्न केलेल्या धनाचा वांटा मिळेल तर अधिक धनोत्पादनासाठीं चाबकाच्या धाकापेक्षां धनलोभानेंच ते अधिक कष्ट करतील व कौशल्य वापरतील अशी शक्यता उत्पन्न झाली. अधिकाधिक नापीक जमिनी वापरांत येऊन त्यावर सक्तीनें व भयानें केलेल्या श्रमापेक्षां लोभानें व उत्साहानें केलेले श्रम अधिक फलदायी होतील असें दिसूं लागलें. अर्थात् अशा स्थितींत गुलामगिरी चालू ठेवण्यानें उत्पादनाच्या प्रगतीस अडथळा येऊं लागला व गुलामगिरीची बेडी तोडून टाकण्यांत आली. पुढें सरंजामशाहींतील भूदास-पद्धतीनें शेतीची सुधारणा झाली. धान्याची निपज वाढल्यानें व्यापाराची प्रगति झाली. व्यापारी-वर्ग धनवान् व बलवान् झाला. पैशास महत्त्व आलें. धनाची मागणी वाढूं लागली. शेतीची सुधारणा होऊं लागली; तेव्हां सरंजामदारांपैकीं कित्येकांनीं शेतकऱ्यांस काढून टाकून स्वतः शेती सुरू केली. व्यापारी वर्ग भांडवलदार-कारखानदार झाला. त्याचीही मजुरांची गरज वाढली आणि भूदासांना शेतीस बांधून टाकणारें कायद्याचें दावें तोडून टाकण्यांत आलें. भांडवलदार—कारखानदारांनीं प्रथम हस्तव्यवसायी कारखानदारी सुरू केली. पुढें यांत्रिक उत्पादन सुरू झालें. उत्पादन वाढत चाललें, नवे नवे मुलूख भांडवलदारांनीं पादाक्रांत केले. सर्व जगभर यांत्रिक उत्पादन सुरू झालें. पण आतां भांडवलदारवर्ग स्वतःस

फायदा होत नाहीं, म्हणून धनोत्पादन शक्तीस अडवून ठेवीत आहे अथवा शस्त्रनिर्मिती, युद्धें यांसारख्या वाममार्गीत वापरीत आहे म्हणून आतां भांडवलशाहीचें विकासकार्य संपुष्टांत आलें असून तिचा नाश करणें व समाजवादाची स्थापना करणें हें क्रमप्राप्त आहे असें मार्क्स सांगतो.

सृष्टींतील अमूर्त इच्छाशक्तींतून विरोध-विकासानें भौतिक जग उत्पन्न झालें असें हेगेल म्हणतो. उलट भौतिक गुणधर्मांनीं मानवी मन, संस्कृति, तत्त्वज्ञान वगैरे सर्व होतात असें मार्क्स सांगतो. याचाच अर्थ मार्क्सनें विरोधविकासवाद 'पाय खालीं डोकें वर' असा उभा केला असा आहे.

## विरोध-विकासांतील त्रिपुटी

ही विरोधविकासपद्धति फक्त मानवविकासासच नव्हे तर सर्व सृष्टीच्या विकासास लावण्याचा प्रयत्न एन्जल्स व हेगेल या दोघांनीं केला आहे. हेगेलनें यासंबंधानें एक त्रिपुटी बसविलेली आहे. थेसिस् (योग), ॲन्टीथेसिस् (प्रतियोग), सिन्थेसिस् (संयोग) ही ती त्रिपुटी होय. या तीन पायऱ्यांनीं हा विकास होत असतो असें हेगेलचें मत आहे. तीन पायऱ्यांनीं होणाऱ्या या विकासाची आकृति काढायची तर, लेनिनच्या मतें, वाटोळ्या जिन्याच्या आकाराची काढावी लागेल. त्याची पहिली पायरी हा योग, तीवरून पुढें चढता चढता पहिल्या पायरीच्या समोर वरील बाजूस येणारी पायरी ती प्रतियोग आणि याच क्रमानें आणखी वर चालल्यास 'प्रतियोग' पायरीच्या समोर म्हणजे 'योग' पायरीच्या वरील बाजूस येणारी पायरी ती संयोग. एंजल्सनें मनुष्येतर सृष्टीस हा त्रिपुटिक्रम लावतांना बीजांकुराचें उदाहरण दिलें आहे. बीज हा योग; हें बीज जमिनींत रुजतें, नाश पावतें, त्यापासून वृक्ष उत्पन्न होतो. वृक्ष हा प्रतियोग. या वृक्षाला पानें,

फळें, फुलें येऊन मूळच्या बीजासारखीं अनेक बीजें येतात. हीं बीजें म्हणजे संयोग. या उदाहरणांत विनाशास महत्त्व आहे. बीज हा जो योग त्याच्या विनाशांतून ( निगेशन ) वृक्ष निर्माण होतो आणि वृक्षांतून बीज निर्माण झालें कीं तितक्या प्रमाणांत वृक्ष विनाश पावतो. ( निगेशन ऑफ निगेशन ). अनेकदां अशी बीजप्रसूति झाल्यावर वृक्ष पूर्णपणें विनाश पावतो. वृक्षास 'प्रतियोग' ( बीजाचा ) विनाश अथवा 'अभाव' म्हणतात. नंतर वृक्षास येणाऱ्या बीजास विनाशाचा विनाश अथवा अभावाचा अभाव असें म्हणतात. भांडवलशाहीस हा त्रिपुटिक्रम लावून दाखवितांना 'कॅपिटल'मध्यें मार्क्स लिहितो, " भांडवलशाहींतील संपत्तीची वांटणी करण्याची जी पद्धति तिनें भांडवलशाहीची मालकी निर्माण होते. भांडवलशाहीपूर्वींच्या हस्तव्यवसायपद्धतींतील मालकी ( थेसिस् ) त्या वेळच्या उत्पादन-साधनांचा जो मालक त्यानें श्रम करून माल निर्माण करण्यावर म्हणजे त्याच्या श्रमांवर अवलंबून असे. या मालकीचा विनाश ( निगेशन ) म्हणजे भांडवलशाही मालकी होय. या भांडवलशाही मालकीचा विनाश (विनाशाचा नाश) कालांतरानें होत असतो. या तिसऱ्या अवस्थेंत श्रम करणाऱ्याची खाजगी मालकी पुन: त्याच्या हत्यारावर म्हणजे यंत्रें वगैरे उत्पादनसाधनांवर निर्माण होत नाहीं. भांडवलशाहीच्या अमदानींत सहकारितेनें संपत्ति निर्माण करण्याची जी पद्धति पडली त्या भूमिकेवर सहकारितेनें उत्पादन चालू राहून जमीन व इतर धनोत्पादन-साधनें खाजगी मालकींत राहतात व भोग्यसंपत्ति मात्र उत्पादकाला मिळते."

हा विरोधविकास सहज पटण्याजोगा आहे हें मागें दिलेल्या ऐतिहासिक विकासावरून कळून येईल. पण हा त्रिपुटिक्रम कांहींसा आग्रही स्वरूपाचा आहे. एन्जल्सनें तो बऱ्याच आग्रहानें स्वीकारलेला

आहे. तथापि मार्क्सनें कोठेंच विशेष जोर देऊन तो प्रतिपादिलेला नाहीं. हेगेलबद्दलच्या अत्यादरानें त्यानें त्यावर फारसा हल्लाही केलेला नाहीं. पण स्वतः मार्क्सची लेखनपद्धति विरोधविकास अथवा ही त्रिपुटी यांचें सव्यापसव्य वरचेवर न सांगतां विरोधविकासी भौतिकक्रम मांडीत जाणें ही आहे. कम्युनिस्ट मॅनिफेस्टोंत-हा विरोधविकासी भौतिकक्रमच सांगितला आहे. पण 'डायलेक्टिक्', 'थेसिस्', 'ॲन्टिथेसिस्', 'सिन्थेसिस्' यांचा त्यांत उल्लेखही नाहीं. आणि 'कॅपिटल'मधील मांडणी ही विरोध-विकासपद्धतीची असतांही डायलेक्टिक्चा उल्लेख अगदीं क्वचित् आलेला आहे. ही डायलेक्टिक अथवा विरोध-विकास-पद्धति मनुष्येतर सृष्टीस लावण्याचाही आग्रह मार्क्सनें धरलेला नाहीं. अर्थात् सृष्टींत सर्वत्र विरोधविकास दिसतो हें एन्जल्स व हेगेल यांचें निरीक्षण पुष्कळ खरें दिसतें.

---

## उपसंहार : : : ६

### हा दैववाद नव्हे

हेगेलच्या विरोध-विकासात्मक भाववादास मार्क्सनें विरोध-विकासात्मक भौतिकवादाचें स्वरूप दिलें तरी त्यांत एक प्रकारची ऐतिहासिक नियति कायम आहे; म्हणजे माणसाची इच्छा असो नसो, त्याचें कर्तृत्व अवतरो न अवतरो, अमुक एक प्रकारानें विकास हा होत राहायचाच असें ठरलें तर ही एक दैववादाचीच आवृत्ति नव्हे का अशी शंका येते. एन्जल्स सर्वच सृष्टीला विरोध-विकास-क्रम लावतो त्यामुळें ही शंका दुणावते. कारण चंद्र, सूर्य, तारे

यांची उत्पत्ति-स्थिति-गति-लय या सर्व गोष्टी जर विरोध-विकासानें होणार आणि तसाच मानवी क्रम असेल तर चंद्र, सूर्य, तारे यांच्या जीवनक्रमांत माणूस हात घालूं शकत नाहीं, नुसता त्याचा प्रेक्षक असतो, तसाच मानवी ज़ीवनांत तो प्रेक्षक राहावा काय? दैववादी माणूस 'तुका म्हणे उगी राहावें, जें जें होईल तें तें पाहावें' या मंत्राचा अवलंब करतो तसें करणें मार्क्सला अभिप्रेत आहे काय? या प्रश्नास 'नाहीं नाहीं' असें मार्क्सचें स्पष्ट उत्तर आहे. किंबहुना मनुष्य-कर्तृत्वावर भर देणें हेंच मार्क्सच्या साऱ्या शिकवणुकीचें वैशिष्ट्य आहे. 'तत्त्वज्ञांनीं आजवर जग कसें आहे तें सांगितलें पण माणसाचें खरें कार्य जग बदलणें हें आहे' असें मार्क्स म्हणतो; यावरून मनुष्य-कर्तृत्वावर त्यास मुख्य भर द्यावयाचा आहे हें स्पष्ट होतें.

तरीसुद्धां विरोध-विकासाचा नियतिक्रम मार्क्स सांगतो त्याला एक विशेष अर्थ आहे. मनुष्याच्या अंत:करणांतील अहंकार त्यास 'मी हें करूं शकेन', 'तें करूं शकेन', 'मी सर्वकर्तृत्वसमर्थ आहें' असें सांगत असतो. पक्षी अंतराळांत उडालेले पाहून मुलें त्याप्रमाणें उडी मारून अधांत्री होण्याचा प्रयत्न करतात; पुराणांतील सर्व कथांत इच्छामात्रेंकरून थोर महात्म्यांना कांहींही करतां येतें असेंच सांगितलेलें असतें; साधुसंतांनीं मेलेलीं माणसें इच्छामात्रें करून उठविलीं, ख्रिस्तानें गल्लोगल्लीं फिरतांना पावलो-पावलीं चमत्कार केले, ज्ञानोबानें रेडा बोलविला, तुकोबा सदेह वैकुंठास गेला वगैरे हजारों, लाखों कथा 'मी सर्वतंत्रस्वतंत्र आहें' या माणसाला होणाऱ्या अंत:प्रेरणेचें समाधान करण्याच्या ईर्ष्येतून निघाल्या आहेत. ही एक प्रकारची आत्मवंचना होती. तिनें निष्क्रियता व दैववाद यांसच उत्तेजन मिळालें. तिनें माणसास

चमत्काराचे मार्गें लावून मानवसमाजाची फसवणूक केली. यांतून मानवसमाजास बाहेर काढणारा भौतिकवाद पुढें आला. त्यानें पदार्थधर्म हें निश्चित आहेत, कार्य-कारण-भावबद्ध आहेत, तद्विरुद्ध वर्तन करणें म्हणजे चमत्कार करून दाखविणें, ही गोष्ट अशक्य आहे असें मत प्रतिपादिलें. जड पदार्थ (म्हणजेच 'मॅटर') यांस विशिष्ट गुणधर्म असतात, अर्थात् सृष्टि जडधर्मांनीं बद्ध आहे, असें जें मत त्यास 'जडवाद', 'भौतिकवाद', 'मटीरिॲलिझम्' म्हणण्यांत येऊं लागलें. 'मटीरिॲलिझम्' ऊर्फ 'भौतिकवाद' याचें हें वर्णन बरोबर असेल तर गीतेंतील तत्त्वज्ञान 'गुणपरिणामवादी' म्हणजे 'भौतिकवादी' आहे असें मला वाटतें. पाश्चात्य 'भौतिकवादी' ईश्वर मानीत नाहींत, आणि गीता ईश्वर मानते तो निर्गुण, निराकार, निष्क्रिय असा मानते; पण हा फरक माझ्या मतें निवळ शाब्दिक आहे.

## मार्क्सची विशिष्ट भूमिका

पण मार्क्सनें व गीतेनेंही या निर्भेळ भौतिकवादाहून आपली भूमिका थोडी वेगळी ठेवली आहे. वर सांगितलेला भौतिकवाद हा फ्रेंच भौतिकवाद म्हणून प्रसिद्ध आहे. हाहि एक प्रकारचा दैववादच होय असें मार्क्स म्हणतो. सृष्टीचे गुणधर्म जर निश्चित आहेत तर त्यांच्या गति चंद्र-सूर्याप्रमाणें मानवाचे बाबतींतहि निश्चित आहेत. अर्थात् मनुष्याला चंद्र-सूर्याकडे जसें नुसतें पाहत बसावें लागतें तसेंच मानवी व्यवहाराकडेहि नुसतें पाहत बसावें लागणें हें या फ्रेंच भौतिकवादाप्रमाणें अपरिहार्य आहे. पण मानवी व्यवहार असा चालत नाहीं. जडसृष्टींत जसा विरोधविकासक्रम आहे तसा तो, जडसृष्टीचाच एक विभाग असणारा जो माणूस त्याच्या जगांतहि आहेच. पण माणसानें त्यांत आपला हस्तक्षेप करून

त्याचा वेग, दिशा वगैरेबाबत त्याचें नियंत्रण केलें आहे असें मार्क्स म्हणतो. या मर्यादित अर्थानें मार्क्स भौतिकवादी आहे. सृष्टि नियमबद्ध आहे असें मानणें व ते नियम समजून घेणें याचा उपयोग माणसाला प्रयत्नाची दिशा ठरवितांना होतो. वस्तु जितकी अधिक जड तितकी ती अधिक जलद पृथ्वीकडे आकर्षिली जाते, पाणी समपातळींत राहतें हें गुणधर्म समजून येऊनच माणसानें कालवे खणले, घरें बांधलीं, विमानें उडविलीं. हे गुणधर्म दृढ आहेत असें मानलेंच नसतें अथवा या दृढ गुणधर्मापुढें आपण हतबल आहों म्हणून कपाळास हात लावून तो बसला असता तर माणूस बसल्या जागीं उपाशीं मेला असता. पण सृष्टिधर्म समजून घेऊन व त्याच्या ज्ञानाच्या बळावर सृष्टिक्रमांत हस्तक्षेप करून मनुष्य सृष्टीचा स्वामी झाला आहे. या सृष्टिधर्माशीं झगडतांना मानवी समाज-घटनाही विशिष्ट क्रमानें घडत व बदलत असते, या समाजघटनेंत एक विशिष्ट ऐतिहासिक क्रम उत्पन्न होतो. तो क्रम विरोधविकासात्मक आहे असें मार्क्सचें म्हणणें आहे. म्हणून ‘ विरोध विकासात्मक ऐतिहासिक भौतिकवाद ’ (डायलेक्टिकल ॲन्ड हिस्टॉरिकल मटीरिॲलिझम् ) असें मार्क्सच्या या विचारसरणीचें समग्र नांव आहे. ( या नांवाचा प्रस्तुत पुस्तकांतील सर्व विवेचनावरून खुलासा होणार आहे. ) भांडवलशाहीचें जगांतील कार्य संपलें असून आतां समाजवाद आला पाहिजे असें जेव्हां मार्क्स सांगतो तेव्हांही तो हा इतिहासक्रम काय आहे तेवढेंच सांगतो. हा क्रम उलटविण्याचा प्रयत्न भांडवलदार करीत असून त्यामुळें युद्धें व विध्वंस मानवजातीवर कोसळत आहे; तेव्हां दलितवर्गानें या भांडवलदारवर्गास संघटित विरोध करून व इतिहासक्रमाचें चाक स्वतांच्या हातानें योग्य दिशेकडे म्हणजे समाज़वादाकडे फिरवून

इतिहासक्रमाचें पक्क असें गोड फळ दलितवर्गानें पदरांत पाडून घ्यावें असें मार्क्सचें सांगणें आहे. केवळ माणसाच्या लहरी इच्छेनें कांहींही होत नसून जडधर्म, भौतिकधर्म माणसानें लक्षांत घेतलेच पाहिजेत असें जें मार्क्सचें मत त्या अर्थानें मार्क्सचें मत हा 'भौतिकवाद' म्हणजे 'मटीरिॲलिझम्' होय. पण मनुष्यकर्तृत्वावर मार्क्सचा मुख्य भर असल्यानें मार्क्सवाद हा कर्तृत्ववाद अथवा कर्मयोग होय असें माझें मत आहे.

गीतेंत मनुष्यकर्तृत्व व सृष्टिधर्म ऊर्फ गुण-परिणाम यांच्या संयोगानें माणसाला कर्म करतां येतें असें म्हटलें आहे. ईश्वर कांहींहि करीत नाहीं खरा; पण जीवात्मा शरीरी असतो व तो कर्तृत्ववान् असून 'अधिष्ठान', 'विविध साधनें', 'विविध चेष्टा' व कित्येक अज्ञात गोष्टी ( दैव ) यांच्या बलावर माणूस ( कर्ता ) शरीरवाङ्मनानें सर्व कर्में करतो असें गीता सांगते. फ्रेंच जडवादांत माणसाच्या कर्तृत्वाची भर जशी मार्क्सनें घातली तशीच सांख्यांच्या गुणपरिणामवादांत गीतेनेंहि मनुष्यकर्तृत्वाची भर घातली आहे.

## अनासक्ति आणि भौतिकवाद

'अनासक्ति' हें कर्मयोगाचें ठळक लक्षण असें टिळकांनीं व गीतेनेंहि म्हटलें आहे. पण कर्मफलाची इच्छा न धरतां कर्म करण्याची कल्पना 'पाण्यावर ताडण' करण्याप्रमाणें निष्फळ असून तीमुळें मनुष्यकर्तृत्वास प्रोत्साहन कधींच मिळणार नाहीं; व अर्थात् अनासक्ति हें कर्मयोगाचें लक्षण नव्हे तर संन्यासाचें लक्षण आहे असा कित्येकांचा गीता व टिळक या उभयतांवरही आक्षेप आहे. पण टिळक व गीता यांचें म्हणणें नीट समजून न घेतल्याचा हा परिणाम होय. 'अद्वेष्टा सर्वभूतानां' हें जें अनासक्त पुरुषाचें ठळक लक्षण तें खुद्द मार्क्सनें मान्य केलें आहे. भांडवलशाहीच्या दोषांची

जबाबदारी भांडवलदार व्यक्तीवर नाहीं व म्हणून व्यक्तिशः भांडवलदारांचा द्वेष आपण करीत नाहीं असें मार्क्स कॅपिटल्च्या प्रस्तावनेंत सुचवितो. सृष्टीची नियति काय आहे व तदनुसार मानवी प्रगति करून घेण्यासाठीं माणसाचें कर्तव्य कोणतें एवढें सांगणें हेंच मार्क्सचें जीवितकार्य होतें. पण कर्तव्याचरण करतांना यश आलें म्हणून हुरळून जाणें अथवा अपयश आलें म्हणून हताश होणें हें मार्क्सवादास संमत असणें शक्य नाहीं. माणसानें आपलें कर्तव्य केलें तरी सृष्टिधर्माची, इतिहासक्रमाची अनुकूलता जितपत असेल तितपतच माणसास यश येईल. अर्थात् या इतर गोष्टींची अनुकूलता असल्यानें यश आल्यास त्यांत माणसास गर्व बाळगतां येणार नाहीं. तसेंच या इतर गोष्टी प्रतिकूल असल्यानें अपयश आल्यास माणसाची त्यांत गुन्हेगारीही काहीं नसल्यानें त्यानें खेद मानण्याचेंही कारण नाहीं हें सयुक्तिक आहे. यालाच फलाबद्दल अनासक्ति बाळगणें, मुक्तसंग राहणें, असें गीतेंत म्हटलें आहे. "शरीर-वाङ्मनांनीं माणूस जें कर्म करतो तें अधिष्ठान, विविधकरण, विविध व्यवहार, अनेक अज्ञात गोष्टी व त्यांतच कर्म करणारा मनुष्य इतक्यांच्या संयोगानें होत असतें. अशा परिस्थितींत आपण एकटाच सदर कर्माचा कर्ता असें जो समजतो तो मूढमति आहे, त्याला कांहींही कळत नाहीं. उलट ज्याला ही परिस्थिति माहीत असल्यानें कर्तृत्वाचा अहंकार नसतो त्याच्या हातून सर्व जगाची हत्या घडली तरी त्या हत्येचा दोष त्याला लागत नाहीं" (१८,१४-१७) असें गीता सांगते. फलाविषयींची अनासक्ति गीतेंत जी सांगितली आहे ती या प्रकारें सोपपत्तिक आहे. अशा अनासक्त माणसानेंहि कर्म करतांना 'धृति व उत्साह' धारण करूनच कर्म केलें पाहिजे असें गीता म्हणते. (१८,२६).

श्रीकृष्णासारखे थोर पुरुष अशा अनासक्तीनें व उत्साहानें कर्म करीत होते इतकेंच नव्हे तर ज्या लेनिन, टिळक, गांधी यांनींहि इतिहासकालांत दुर्धर प्रसंगांना अत्यंत शांत चित्तानें तोंड दिलें त्यांचे ठिकाणीं गीतेची ही अनासक्ति बाणली असली पाहिजे हें उघड आहे. यशानें हीं माणसें कधीं हुरळून नाहींत अथवा अपयशानें खचून जात नाहींत. लेनिन व गांधी यांच्या चरित्रांत हे गुण उत्कटत्वानें दिसून येतात आणि टिळकांच्याही अंगीं फार मोठ्या प्रमाणांत हे गुण प्रगट झालेले होते. मार्क्सवाद्यांचा म्हणजे कम्युनिस्टांचा मार्ग इतर सर्वांपेक्षां खडतर असल्यानें त्यांना धृति व उत्साह यांनीं युक्त अशा या अनासक्तीची अतिशय गरज आहे. अर्थात् या गुणांत पूर्णावस्था अशी असूं शकणार नाहीं.

## भौतिकवाद आणि धर्म

मार्क्सपंथीय आधिभौतिकवाद्यांची धर्मासंबंधीं कोणती भूमिका असते ? हा सर्वत्र विचारला जाणारा प्रश्न आहे. पण धर्म याचा अर्थ कोण काय करील त्यावर या प्रश्नाचें उत्तर अवलंबून आहे. सत्यनारायण केल्यानें पुत्रोत्पत्ति होते अशी श्रद्धा असणें याला धर्म म्हणायचें असेल तर गीतेला व मार्क्सला दोघांनाही हा धर्म मान्य नाहीं. कारण गुणपरिणामवादावर दोघांचीही विचारसरणी आधारलेली आहे. चमत्कारावर दोघांचीही भिस्त नाहीं. सृष्टींतील सर्व गुणधर्म माणसास कळलेले नसतील; पण ज्याचे गुणधर्म माहीत नाहींत तो चमत्कार असें मार्क्सवादी मानीत नाहींत. तें अज्ञात क्षेत्र आहे म्हणून तो सोडून देतो अथवा जाणण्याचा प्रयत्न करतो. हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती वगैरे धर्मांत जें चमत्काराचें अंग आहे तें मार्क्सवाद्यांस अमान्य आहे. पण हिंदुधर्माचें प्रधान अंग चमत्कार हें नसून हिंदुधर्मशास्त्र हें समाजरचना-

शास्त्र आहे असें सगळ्या स्मृतिग्रंथांवरून दिसतें. वेद आणि उपनिषदें हीं इतिहास, व्यवहार व तत्त्वचर्चा यांनींच भरलेलीं आहेत. त्यांचा ऐतिहासिक दृष्टीनेंच विचार करणें योग्य आहे. हिंदुधर्मग्रंथ हे धर्मसंप्रदायसंस्थापक नसून अखिल जगाला, त्यावेळीं त्यांना योग्य वाटलें तें समाजरचनाशास्त्र त्यांनीं सांगितलें असें मला वाटतें. 'धर्मात् अर्थश्च कामश्च' या व्यासाच्या वचनाचा हाच अर्थ आहे. कम्युनिस्टही आज जगाला समाजरचनाशास्त्रच शिकवीत आहेत.

धर्म याचा अर्थ स्वतांच्या ध्येयासाठीं स्वार्थत्याग करणें, मानवजातीच्या कल्याणासाठीं झटणें असा मानला तर कम्युनिझम् हाच एक धर्म ठरेल. कारण मानवजातीच्या अभ्युन्नतीसाठीं झटणें हेंच कम्युनिस्टांचें ध्येय आहे. पण त्याचा मार्ग दलितवर्गातर्फे त्यास पिळणाऱ्या वर्गाशीं झगडणें हा आहे. हल्लींच्या विषम समाजांत शत्रूवर प्रीति करून त्याचें कल्याण करायचें म्हटलें तर त्यायोगें दलितवर्गाचाच द्रोह होतो. गांधी, ख्रिस्त व इतर साधुसंत यांच्या विश्वबंधुत्वाच्या व सर्वभूतहिताच्या कल्पनेनें समाजांतील मूळची विषमता लक्षांत न घेतां सर्वांना सारखें वागविलें जातें, यामुळें विषमता अधिक वाढत जाऊन दुर्बलांवर अधिक अन्याय होतो.

## गांधीवाद व भौतिकवाद

गांधीवाद व मार्क्सवाद यांमध्यें धनोत्पादनाचे कामीं यंत्रशक्तीचा वापर करावा कीं नाहीं आणि लढ्याचे कामीं शस्त्राचा व सक्तीचा वापर करावा कीं नाहीं या मुद्द्यावर तीव्र मतभेद आहे. गांधींच्या विचारसरणीचें सूक्ष्म अवलोकन केल्यास पहिल्या मुद्द्याचाही दुसऱ्यांतच अंतर्भाव करावा लागतो. कारण यंत्रानें धनोत्पादनाचें केन्द्रीकरण होऊन संपत्तीचें केन्द्रीकरण होतें. यामुळें बहुसंख्य समाज दरिद्री व गुलाम होतो. म्हणून धनोत्पादनसाधनें सार्वजनिक

मालकीचीं करावीं असें मार्क्सवादी म्हणतात, तर धनोत्पादन-साधनें पूर्वी जीं हस्तव्यवसायाचीं व वैयक्तिक होतीं तींच पुन्हा सुरू करावीं असें गांधीवाद्यांचें मत असतें. प्रचंड यांत्रिक साधनांचे खाजगी मालक खुषीनें आपलीं यंत्रें जनतेस देऊन टाकणार नाहींत. आणि त्यांच्यापासून तीं शस्त्रबलानें व सक्तीनें घेणें हा अत्याचार होतो असें गांधीवाद्यांचें मत असतें. म्हणजे वाद मिटविण्यासाठीं शस्त्र व सक्ती वापरावी कीं नाहीं एवढाच मुद्दा शिल्लक राहतो.

याचें उत्तर निवळ तात्त्विक दृष्ट्या देणें निरुपयोगी असून तें व्यावहारिक दृष्ट्याच दिलें पाहिजे. प्रत्यक्ष व्यवहाराचा प्रश्न आला कीं, 'एकाद्या लहान मुलाचा खून करण्यास प्रवृत्त झालेल्या आततायी माणसास शस्त्रबलानें मागें हटविणें क्रमप्राप्त ठरूं शकेल' ही गोष्ट गांधी कबूल करतात. गांधींना निःशस्त्रप्रतिकाराचा देखावा बराचसा करतां आला आहे याचें कारण ब्रिटिश राज्यकर्त्यांचें धोरण त्यास अनुकूल होतें हें आहे. विशिष्ट परिस्थितींत निःशस्त्रप्रतिकार कांहीं मर्यादेपर्यंत चालू शकतो एवढेंच त्यावरून सिद्ध होतें, पण गांधींच्या अर्थाचा अनत्याचार काँग्रेसमंत्र्यांना आपल्या अमदानींत आणि काँग्रेस वर्किंग कमिटीस राष्ट्ररक्षणाचे बाबतींत अशक्य वाटला असें दिसून आलें असून गेल्या वीस वर्षांत निर्भेळ अहिंसावादाच्या प्रशंसेसाठीं जी निष्कारण कागदशाईची उधळपट्टी झाली ती आतां निवळ कचरा झाली आहे. व्यावहारिक सत्य हेंच सत्य. निवळ तात्त्विक सत्य हें सत्य नसून ती फसवणूक होय. गांधींचा अनासक्तीचा आग्रह मात्र रास्त आहे.

## मार्क्सवादाची मर्यादा

आर्थिक उत्पादन-प्रकार मानवी जीवन नियंत्रित करतो, हा भौतिकवादाचा प्रमुख सिद्धान्त होय. याची मर्यादा किती?

निरनिराळ्या व्यक्तींचे स्वभाव, चालीरीति, रूढि या सर्वांत इतकी विलक्षण तफावत दिसून येते कीं तीं सर्व आर्थिक उत्पादन-साधनांच्या एकाच सांच्यांत बसविणें चुकीचें होईल. पण अशीं तीं बसविण्याचा आग्रह मार्क्सनें व एन्जल्सनें केलेला नाहीं. आर्थिक उत्पादन-साधनांच्या नियंतृत्वाची मर्यादा थोड्याशा सारासार विचारानें कोणालाही समजून येईल. आगगाड्या, तारायंत्रें, छापण्याची कला इत्यादि साधनांवांचून एका मोठ्या राष्ट्रांत प्रातिनिधिक लोकशाही नांदणें शक्य आहे का? चरितार्थसंपत्ति माणसास कांहींशी बऱ्या प्रमाणांत असल्यावांचून बौद्धिक शिक्षण व सांस्कृतिक उत्कर्ष अशक्य होतो. एकाद्या राष्ट्राची आर्थिक गळचेपी झाली कीं तेथें लोक अधिकाधिक गुलामी मनोवृत्तीचे तरी होत जातात अथवा तेथें युद्ध-प्रवृत्ति बळावत जाते. शेतीसारखा स्थिर स्वरूपाचा उत्पादन-प्रकार जेथें नसतो व एका मुलुखांतून दुसऱ्या मुलुखांत शिकारीसाठीं अथवा लूटमारीसाठीं ज्यांना भटकावें लागतें त्या समाजांत विवाहसंस्था स्थिर स्वरूपाची असूं शकत नाहीं. कारखान्यांत तरुण स्त्री-पुरुष स्वतंत्रपणें कामें करूं लागलीं, खानावळींत जेवूं लागलीं आणि बालसंगोपन-गृहांत मुलांना जोपासनेसाठीं पाठविणें अवश्य होऊं लागलें, कीं जुनी स्थिर स्वरूपाची म्हणजे खाजगी शेती व लहान उद्योगधंदे यांच्या काळांतली कुटुंबसंस्था नष्ट होते. धान्य अथवा इतर भोग्य संपत्ति वापरून संपवावी, नाहीं तर ती कुजून नासून नाहींशी होईल अशी परिस्थिति जेव्हां होती, जेव्हां आगगाड्या वगैरे वाहतुकीच्या साधनांनीं दूर देशीं नेऊन ती विकून त्याचा पैसा बँकेंत ठेवणें शक्य नव्हतें; शेतीला कष्ट करण्यास खूप माणसें लागत, त्याकाळीं मोठीं कुटुंबें एकत्र राहत. पण भोगून अथवा भोगण्यासाठीं काढून ठेवून उरलेली संपत्ति विकून पैसा बँकेंत ठेवतां येऊं

लागला, शेतीसाठीं वगैरे जरूर लागेल: तेव्हां मजूर मिळतात, कुटुंबियांना नेहमीं पोसत राहण्याची जरूरी नाहीं अशी परिस्थिति निर्माण झाली, त्याबरोबर मोठी कुटुंबसंस्था मोडत चालली, नात्यांतलीं पिकलीं व कोंवळीं पानेंही गळून पडूं लागलीं, आप्तेष्टांचा पसारा नकोसा वाटूं लागला व नवरा-बायको आणि, दोनच उशीरा व अंतरा-अंतरानें झालेलीं मुलें एवढा आटोपशीर संसार बँकबुकाच्या ऊबदार आश्रयाखालीं सुखाचा वाटूं लागला. आधिभौतिक शोध लागूं लागले तशी चमत्कारांवरील भिस्त कमी झाली. अशीं अनेक उदाहरणें ज्यांचीं त्यांनीं मनांत आणून समजून घेतलीं तर मार्क्सचा आशय सहज समजून येईल. आर्थिक उत्पादनप्रकाराची परिस्थिति ही एकंदर मानवी जीवनाचा साचाच असतो असें मार्क्सचें म्हणणें नाहीं, ती एक महत्त्वाची भूमिका आहे व जीवन-नियंत्रणाचें बरेंच काम ती करते इतकेंच मार्क्सचें म्हणणें आहे. उलट राजकीय व धार्मिक कल्पना, रूढि, परंपरा, संस्कृति या सर्वांचा प्रत्याघात आर्थिक उत्पादन-प्रकारावर व एकंदर आर्थिक परिस्थितीवर होत असतोच. ( परिशिष्ट ३ पहा )

REFBK-0005980

मराठी ग्रं... संग्रह शाखा
दा. क्र. ५८०

# परिशिष्ट

मार्क्सच्या या भौतिकवादाचें सामान्य स्वरूप व त्याच्या मर्यादा संक्षेपानें कळून येण्यासाठीं मार्क्सचे दोन व एन्जल्सचा एक असे तीन उतारे येथें देतों.

## ( १ )

### मार्क्स—'क्रिटिक ऑफ पोलिटिकल इकॉनमी', प्रस्तावना

" सामुदायिकपणें चरितार्थसंपत्ति निर्माण करीत असतां, माणसामाणसांत कांहीं निश्चित स्वरूपाचीं नातीं आवश्यकतया निर्माण होतात. त्यांत माणसांच्या इच्छेचा अथवा अनिच्छेचा कांहींही संबंध नसतो. कारण माणसाच्या उत्पादनशक्तीचा विकास ज्या दर्जास पोंचलेला असतो त्या दर्जास आवश्यक व अनुरूप असेच हे संबंध असतात. चारितार्थसंपत्ति निर्मिण्यासाठीं म्हणजे धनोत्पादनासाठीं जे हे संबंध–उत्पादनसंबंध—निर्माण होतात त्या सर्व संबंधांची बेरीज हीच समाजाची आर्थिक संघटना म्हणून संबोधिली जाते. याच भूमिकेवर न्याय व राज्य यांची संघटना उभारली जाते. आणि या आर्थिक संघटनेचें जें रूप तें स्वतःचें रूप अशी त्या समाजास जाणीव होत असते. सामान्यतः असें म्हणतां येईल, कीं धनोत्पादनाचा जो प्रकार अस्तित्वांत असेल तोच सामाजिक, राजकीय व बौद्धिक जीवनाच्या क्रियांना तदनुरूप वळण देत असतो. आपण मूळचें अमुकच प्रकारचे आहों अशा जाणीवेनें तसें असण्यासाठीं समाज झटतात म्हणून त्यांना अमुक एक विशिष्ट रूप आलेलें असतें असें नव्हे; वस्तुस्थिति याच्या उलट असते. समाज जसे घडलेले असतात तसे ते घडले म्हणजे आपण तसें आहों अशी जाणीव त्यांना उत्पन्न होते. समाजाच्या धनोत्पादनशक्तींचा विकास होत असतां एक वेळ अशी येते, कीं ज्या उत्पादनसंबंधांत या शक्तींचा आजवर विकास झालेला असतो, त्याच प्रचलित उत्पादनसंबंधांशीं म्हणजे, कायद्याच्या भाषेंत बोलावयाचें तर, धनोत्पादनसाधनांच्या मालकीच्या पद्धतीशीं या विकासी

उत्पादनशक्तींचा विरोध उत्पन्न होतो. जे प्रचलित उत्पादनसंबंध आजवर उत्पादनशक्तीच्या विकासाचेंच स्वरूप असतात तेच आतां त्या विकासी शक्तीच्या पायांत बेड्या ठोकतात; आणि मग एक सामाजिक क्रांतीचा कालखंड सुरू होतो, आर्थिक संघटनेचा पाया बदलतो व त्याच्यावरील ( न्यायपद्धति व राज्यपद्धति यांची ) संघटना कमीअधिक वेगानें बदलते. असे पालट घडत असतां त्यांतील आधिभौतिक व आध्यात्मिक (बौद्धिक व मानसिक) पालट आपण भिन्नपणें ध्यानांत घेतले पाहिजेत. आधिभौतिक पालट होतात ते धनोत्पादनपद्धतीच्या आर्थिक परिस्थितींत होत असतात. भौतिकशास्त्रांतील निर्णयाप्रमाणें हेही अचूकपणें सांगतां येतात. यालाच विकास असें म्हणतां येईल. राजकीय, धार्मिक, न्यायविषयक, कलाबुद्धिविषयक, तत्त्वज्ञानविषयक, थोडक्यांत म्हणजे आध्यात्मिक स्वरूपाचे जे पालट होतात, त्यांचीं जुनीं स्वरूपें व नवीं स्वरूपें यांतील विरोधांची माणसास जाणीव होऊन व जुन्या स्वरूपांशीं झगडून माणसें नवीं स्वरूपें प्राप्त करून घेतात. या झगड्यास वर्गलढ्याचें, क्रांतीचें स्वरूप येतें.

" एकाद्या व्यक्तीच्या स्वतांसंबंधींच्या मतावरून आपण त्या व्यक्तीबद्दल आपलें मत बनवीत नाहीं; त्याप्रमाणेंच संक्रमणकाळीं कोणत्याही समाजास स्वतांस जें हवें असें वाटत असतें त्यावरून त्या संक्रमणाचें स्वरूप अजमावतां येत नाहीं. उलट आपणांस जें हवें असे त्या समाजास वाटत असतें तें त्यास कां हवें असें वाटतें याचा खुलासा त्याच्या भौतिक जीवनांत जे विरोध उत्पन्न झालेले असतात त्यांवरून—विकासी उत्पादनशक्ति व प्रचलित उत्पादनसंबंध यांत अनुभवास येणाऱ्या विरोधांवरून करून घ्यावयाचा असतो. एकाद्या समाजाचें स्वरूप कोणतेंहि असो, त्याच्या उत्पादनशक्तींचा ज्यांत विकास होणें शक्य आहे त्या सर्वांचा विकास होण्याचें कार्य संपल्यावांचून तो समाज नष्ट होत नाहीं. जुन्या समाजसंस्थेच्या गर्भांत नव्या व उच्च दर्जाच्या समाजव्यवस्थेस आवश्यक अशी भौतिक परिस्थिति परिपक्व होईपर्यंत नवी व उच्च दर्जाची समाजव्यवस्था स्थापिली जाणें शक्य नसतें; म्हणून जीं ध्येयें प्राप्त करून घेणें माणसांना शक्य असतें व ज्यांच्या प्राप्तीसाठीं जरूर असणाऱ्या कर्तृत्वाचें शिक्षण माणसांना मिळालेलें असतें, अशावांचून अन्य ध्येयें सिद्ध करण्याच्या मागें माणसें कधींच लागत नाहींत. सूक्ष्म परीक्षणान्तीं असें

दिसून येईल, कीं विकासी उत्पादनशक्ति व प्रचलित उत्पादनसंबंध यांचा विरोध नष्ट करण्याची भौतिक अनुकूलता उत्पन्न होईपर्यंत अथवा ही अनुकूलता चांगली वाढीस लागेपर्यंत हा झगडाच उत्पन्न होत नाहीं."

( २ )

## मार्क्स—कॅपिटल, खंड १ ला.

" एक भांडवलवाला दुसऱ्या पुष्कळशा भांडवलवाल्या बांधवांना चढाओढींत लोळवितो; अशा प्रकारें थोड्या भांडवलवाल्यांकडून पुष्कळ भांडबलवाल्यांस कफल्लक केलें जाऊन संपत्तीचें केन्द्रीकरण थोड्याथोडयांच्या हातीं होत असतां, संपत्त्युत्पादनाचें कार्य वाढत्या प्रमाणांत मजुरांच्या सहकारितेनें होऊं लागतें. त्याचबरोबर संपत्त्युत्पादनाचीं उपकरणें अधिकाअधिक शास्त्रशुद्ध केलीं जातात. जमिनीची मशागत अधिकाअधिक पद्धतशीरपणें होऊं लागते. मजुरांचीं हत्यारें, सहकारितेनेंच तीं वापरतां येतील असें रूप धारण करूं लागतात. सामुदायिक श्रमामुळें संपत्त्युत्पादनसाधनांची काटकसर होते. जगाच्या बाजारांत जगांतील सर्व माणसें खेचलीं जातात आणि म्हणून भांडवलशाही वाढत्या प्रमाणांत आंतरराष्ट्रीय स्वरूप धारण करते. उत्पादनसाधनें अधिकाधिक कार्यक्षम होत असतां चढाओढीच्या बळावर थोडे भांडवलवाले इतरांस पराभूत करून भांडवलशाही समाजांतले सर्व फायदे गिळंकृत करतात. अशा प्रकारें या भांडवलशाही सुलतानांची संख्या कमी कमी होत असतां दुसऱ्या बाजूस दारिद्र्य, जुलूम, गुलामगिरी, अधःपात व पिळवणूक हींहि वाढत असतात; पण त्याचबरोबर कामगारवर्गाचा संतापहि तीव्र होत असतो. या वर्गाची संख्या वाढत असते, त्यांच्यांत शिस्त उत्पन्न होत असते. भांडवलशाहीच्या विशिष्ट उत्पादनप्रकारांमुळेंच त्यांच्यांत ही संघटना निर्माण होत असते. भांडवलाच्या केन्द्रीकरणामुळें जी उत्पादनपद्धति सुधारत गेली तिची वाढ यापुढें त्याच भांडवलाच्या अतिकेन्द्रीकरणाच्या अडसरापुढें खुंटते. धनोत्पादनसाधनांचें केन्द्रीकरण व संपत्तीचें सामुदायिक उत्पादन या दोहोंची वाढ इतकी पुष्कळ होते, कीं यापुढें भांडवलशाहीच्या कवचांत तीं मावूं शकत नाहींत; म्हणून मग तें कवच फुटतें. भांडवलशाही मालकी पद्धतीच्या

मृत्यूची घंटा वाजूं लागते. ज्यांनीं जगास कफल्लक केलें तेच शेवटीं कफल्लक होतात."

( ३ )

**एन्जल्स**—

जे. ब्लोच यांस पाठविलेल्या पत्रांत एन्जल्स लिहितो, "ऐतिहासिक भौतिकवादाच्या सिद्धांताप्रमाणें खऱ्या जीवनाचें उत्पादन व पुनरुत्पादन हा इतिहासाचा फक्त अखेरचा (इन् दि लास्ट इन्स्टन्स) निर्णायक घटक असतो. मार्क्स अथवा मीं कोणीही याहून अधिक म्हटलेलें नाहीं. आर्थिक घटक हा एकच मानवी जीवनाचा निर्णायक आहे असें जो सांगतो तो आमच्या सिद्धान्तास निरर्थक अव्यक्त व अशक्य करून टाकतो. आर्थिक परिस्थिति ही भूमिका आहे. पण या भूमिकेवर राजकीय संघटना, वर्गलढे...कायदे आणि समाजांत चालू असलेल्या झगड्यांचें झगडणाऱ्यांच्या मेंदूवर परिणाम होऊन त्यांतून उत्पन्न होणाऱ्या राजकीय, न्यायविषयक, तत्त्वज्ञानविषयक, धार्मिक प्रतिक्रिया व त्यांचें ओतीव सिद्धान्तांत होणारें रूपांतर, या सर्वांचें वजन ऐतिहासिक झगड्यावर पडत असतेंच; आणि त्यामुळें पुष्कळ बाबतींत त्या झगड्यांचें स्वरूपही ठरत असतें. या सर्व घटकांचे एकमेकांवर आघात-प्रत्याघात होत असतात... ( कित्येक वस्तु आणि घटना यांमध्यें घुसत असतात, त्या सिद्धही करतां येत नाहींत इतक्या दूरदूरच्या असतात व म्हणून त्या नाहींत असें आम्ही धरून चालतों. ) या सर्व झगड्यांतून अखेर आर्थिक खटाटोपाची चळवळ नियामक या नात्यानें शिल्लक राहिलेली दिसून येते. माणूस स्वतःच इतिहास घडवितो. पण तो घडविण्याचे पूर्वी पूर्वपरिस्थिति व समजुती यांचें अधिष्ठान त्यास निश्चित असें मिळतें तेंच पत्करावें लागतें. या अधिष्ठानांत आर्थिक परिस्थिति अंतर्भूत होत असून ती फक्त अखेर निर्णायक असते; पण राजकीय, धार्मिक परिस्थिति व समजुती, इतकेंच काय, पण माणसाच्या मनास पिशाच्चासारख्या ग्रासणाऱ्या परंपरागत रूढि व भावना यांचाही अधिष्ठानांत व नियामकांत समावेश होतो; फक्त त्या अखेर नियामक नव्हत इतकेंच."

५८८०

# संसारांतील गुन्हेगारी म्हणजेच विमा न उतरणें !

जवाहिर, बहादुर, किसान, दामदुप्पट वगैरे अनेक
नावीन्यपूर्ण आकर्षक योजना !

हजारीं त्रैवार्षिक

## ७५ रु. गॅरंटीड बोनसची योजना

संस्था नवी, पण
विमेदारांच्या फायद्याच्या दृष्टीनें पूर्ण जुनी.
हप्ते फारच माफक, व्यवस्था चोख व अत्यंत
काटकसरीची. संचालक-मंडळ निःस्वार्थी,
वजनदार व प्रातिनिधिक

एजंटांना भरपूर कमिशन व शिवाय
वृद्धापकाळीं पेन्शन !

— एजन्सीसाठीं आजच लिहा —

जी. जी. सौंदणकर,
मॅ. डायरेक्टर,

## सह्याद्रि इन्शु. कं. लि., नासिक

# चित्तरंजन-मालेंत गेल्या तीन वर्षांत प्रसिद्ध झालेल्या
# रहस्यमय संपूर्ण ३६ कादंबऱ्या फक्त ७ रुपयांत

पृष्ठसंख्या ४५०० चे वर : फक्त कांहीं सेट्स शिल्लक आहेत.

१ आकाशांतील हिरे
२ रुमालांचें रहस्य
३ बहुरूपी गुन्हेगार
४ सैतानी शोध
५ रुपेरी ताईत
६ काळा एक्का
७ बिसोबा लफंगे
८ पडळींतील रहस्य
९ भुयारांतील समंध
१० ठगींचा नायनाट
११ गरुडनाक्या
१२ बेछूट लफंग्या
१३ खिडकींतील पुतळा
१४ भूतमहाल
१५ नवलाखी झटका
१६ वीरराव धंपाटे
१७ घंट्यांचे खून
१८ बुरखेवाला
१९ डॉक्टर भयंकर
२० कालकूट
२१ आर्यभुवनांतील खून
२२ जपानी डॉक्टरचें रहस्य
२३ सफेत डाकू
२४ खुनी खबरदार
२५ कोकेनची टोळी
२६ दोन चित्रें
२७ खुनी मंगळसूत्र
२८ सतींचें उच्चाटन
२९ कालकूटाचा नवा अवतार
३० राक्षसी खून
३१ वकिलाचें रहस्य
३२ न केलेला खून
३३ फुलगांवचें रहस्य
३४ बगलबच्चा
३५ तोतया कालकूट
३६ त्याचें रहस्य

१२ कादंबऱ्यांकरितां ३ रुपये पाठवावे. २४ कादंबऱ्यांकरितां ५ रुपये पाठवावे. एका कादंबरीकरितां ५ आण्यांचीं तिकिटें पाठवावीं.

इतर प्रकाशनाचे माहितीकरितां आमचा संपूर्ण कॅटलॉग मागवा.

प्रकाशक—यशवंत गोपाळ जोशी, ६२३/१५ सदाशिव, पुणें २.

मुंबई एजंट :

परचुरे पुराणिक आणि मंडळी व तुकाराम पुंडलिक शेठ्ये, माधवबाग, मुंबई.